


‘एसएनडीटी’ने आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन केंद्र निर्माण करावे/ पान २

लोकांचे दैनिक

# लोकशाही वार्ता

epaper.lokshahivarta.in


देशाच्या संरक्षण उत्पादनात १६ टक्के वाढ / पान ३

नागपूर। वर्धा। चंद्रपूर। गडचिरोली। भंडारा। गोंदिया। अमरावती। यवतमाळ । अकोला। वाशीम। बुलडाणा-खामगाव जिल्ह्यात वितरित होणारे दैनिक

वर्ष-१५, अंक - १११, पृष्ठे : ८ + गुडमॉर्निंग, किंमत ५.०० रुपये | नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४ | RNI No. MAHMAR/2010/35482 | अग्रलेख - संरक्षण उत्पादनात झेप ******


## मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत!

### ईडब्ल्यूएस, एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थिनींना मिळणार लाभ

**वृत्तसंस्था/मुंबई**

महायुती सरकारने आपल्या शेवटच्या अर्थसंकल्पात अनेक लोकप्रिय घोषणा केल्या आहेत. खास महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. यानंतर आता राज्य सरकारने ईडब्ल्यूएस, एसईबीसी आणि ओबीसी विद्यार्थिनींसाठी मोठी घोषणा केली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग(एसईबीसी) आणि इतर मागास प्रवर्गातील(ओबीसी) मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कात ५० टक्के सूट होती. आता या शुल्कात सरकारने १०० टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्या १०० टक्के सूट देण्याच्या निर्णयाने विद्यार्थिनींना मोठा दिलासा मिळाला आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या ओबीसी मुलींना फी माफी देण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवारांनी यंदाच्या बजेटमध्ये केली. केवळ मेडिकलच नाही तर अभियांत्रिकी, फार्मसी, मॅनेजमेंट, लॉ अशा विविध शाखांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लाखो विद्यार्थिनी याचा फायदा होणार आहे. शनिवारी तो जाहीर झाल्यानंतर याबाबतचा जीआर निघणार आहे.

### दुधाला ३५ रुपयांचा भाव - विखे पाटील

राज्यातील दूध उत्पादक शेतक-यांना दिलासा देताना गायीच्या दुधाला प्रतिलिटर ३५ रुपये दर देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याची माहिती विधानसभेत पशुसंवर्धन, दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. यात दुधाला प्रतिलिटर ३० रुपये स्थायीभाव तर शासनाकडून ५ रुपये अनुदान देण्यात येणार आहे. राज्यातील दूध उत्पाक शेतक-यांना स्थायी भाव देतानाच दूध भुकटी निर्यातीस प्रोत्साहन मिळावे, यासाठी सुद्धा शासनाकडून प्रतिकिलो ३० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचंही विखे पाटील यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटी तसंच बटरचे दर कमी झाल्यानं त्याचा परिणाम राज्यातील दूध खरेदी दरावर झाला होता. यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आले होते.

राज्यभरातीलईडब्ल्यूएस, एसईबीसी आणि ओबीसी संवर्गातील मुलींना उच्च शिक्षणात १०० टक्के फी सवलतीचा लाभ घेता येणार आहे. दरम्यान, अर्थसंकल्पातल्या घोषणांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येत आहे. गरजू महिलांना रोजगारासाठी पिंक ई रिक्षा उपलब्ध करून देणे, शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय, काजू उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान, नवीन पर्यटन धोरणासह इतर अनेक विषयावर सरकार सकारात्मकतेने विचार करीत आहे.

## ब्रिटनमध्ये सत्तांतर

### पंतप्रधान मोदींकडून स्टार्मर यांचे अभिनंदन



**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

ब्रिटनमध्ये १४ वर्षानंतर लेबर पक्षाने पुन्हा एकदा सत्ता मिळवली आहे. शुक्रवारी जाहीर झालेल्या निकालात लेबर पक्षाने बहुमताचा आकडा गाठला आहे. लेबर पक्षाच्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षाचे नेते कीअर स्टार्मर यांचे अभिनंदन केले. लेबर पक्षाने आतापर्यंत ६५० पैकी ४०० पेक्षा अधिक जागा मिळवल्या आहेत. निवडणुकीदरम्यान मजूर पक्षाचे नेतृत्व करणारे कीअर स्टार्मर हे ब्रिटनचे पुढील पंतप्रधान असण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सद्वारे कीअर स्टार्मर यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदींनी एक्सद्वारे लिहिले की, कीअर स्टार्मर यांचे यूकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उल्लेखनीय विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. सर्व क्षेत्रांमध्ये भारत-यूके सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी, परस्पर विकास आणि समृद्धी वाढवण्यासाठी मी आपल्या सकारात्मक आणि रचनात्मक सहकार्याची अपेक्षा करतो, असेही पंतप्रधान मोदींनी लिहीले आहे. यासोबतच ब्रिटनचे मावळते पंतप्रधान ऋषी सुनक यांचेही पंतप्रधान मोदींनी एक्सवरुन आभार मानले आहेत.

### आज महाकवी कालिदास दिन



### विनम्र अभिवादन



प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांची आज जयंती

## विधान परिषद निवडणूक अटळ; १२ जुलै रोजी मतदान

### प्रत्येक उमेदवाराला पहिल्या पसंतीची २३ मते गरजेची

**वृत्तसंस्था/मुंबई**

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ अर्ज दाखल झाले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शुक्रवार शेवटचा दिवस होता. मात्र कोणत्याही उमेदवाराने उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. त्यामुळे विधान परिषदेची निवडणूक आता अटळ आहे. या चुरशीच्या निवडणुकीत कोणाचा गेम होणार आणि कोण विधान परिषद गाठणार याची उत्सुकता आता वाढली आहे.

विधान परिषदेसाठी भाजपने ५, शिवसेना शिंदे गटाने २, राष्ट्रवादी अजित पवार गटाने २, तर काँग्रेस, शरद पवार आणि शिवसेना ठाकरे गटाने प्रत्येकी १ उमेदवार रिंगणात उतरवले आहे. या जागांसाठी १२ 



जुलैला मतदान होणार असून त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. शुक्रवारी, ५ जुलैला दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. मात्र या कालावधीत एकानेही उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. त्यामुळे ही निवडणूक होणार हे आता निश्चित झाले आहे. विजयी होण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला पहिल्या पसंतीची २३ मते गरजेची आहेत. भाजपचे पाच, काँग्रेस, शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार गट यांचा प्रत्येक एक उमेदवार संख्या बळानुसार सहज जिंकू शकतो. तर राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट यांना आपला उमेदवार जिंकून आणण्यासाठी मतांची जुळवा जुळव करावी लागणार आहे. तर शिंदे आणि अजित पवारांनाही आपल्या दुसऱ्या उमेदवारासाठी मतांची जुळवाजूळव करावी लागेल. या निवडणुकीत महायुतीचे ९ उमेदवार तर महाविकास आघाडीचे ३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

या निवडणुकीत कोणता पक्ष २३ मतांचा कोटा आपल्या उमेदवाराला देणार यावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत. संख्या बळानुसार भाजपचे पाचही उमेदवार सहज विजयी होवू शकतात. तर काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांनाही कोणती अडचण नाही. काँग्रेसची अतिरिक्त मते मिलिंद नार्वेकरांच्या पारड्यात जाणार की जयंत पाटलांच्या यावर या दोघांचेही भवितव्य अवलंबून राहाणार आहे. शिवाय एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांनाही आपल्या दुसऱ्या उमेदवारासाठी मतांची बेगमी करावी लागेल.

## भाजपकडून प्रभारींची नेमणूक

### विनोद तावडेंकडे बिहार; तर जावडेकरांकडे केरळची जबाबदारी

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारतीय जनता पक्षाने विविध राज्यांसाठी प्रभारी आणि सहप्रभारींची नेमणूक केली आहे. यामध्ये महाराष्ट्राचा समावेश नाही. मात्र महाराष्ट्रातील नेते विनोद तावडे यांच्याकडे बिहार, प्रकाश जावडेकर यांच्याकडे केरळ, डॉ. अजित गोपछडे यांच्याकडे मणिपूर या राज्यांचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. देशातील लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर भाजपने पुन्हा एकदा संघटनेकडे लक्ष द्यायला सुरुवात केली आहे.




पुढील काही महिन्यात महाराष्ट्रासह चार राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत. विधानसभा निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये भाजपने यापूर्वीच निवडणूक प्रभारी आणि सहप्रभारी जाहीर केले आहेत. यानुसार महाराष्ट्राचे प्रभारी केंद्रीय मंत्री भुपेंद्र यादव तर सहप्रभारी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आहेत. अंदमान आणि निकोबारचे प्रभारी म्हणून रघुनाथ कुलकर्णी, अरुणाचल प्रदेश, प्रभारी- अशोक सिंघल, बिहार, प्रभारी- विनोद तावडे, सहप्रभारी- दीपक प्रकाश, छत्तीसगड, प्रभारी- नितीन नवीन, दादरा नगर हवेली, प्रभारी- दुष्यंत पटेल, गोवा, प्रभारी- आशिष सुद, हरियाणा, प्रभारी- सतीश पुनिया, सहप्रभारी- सुरेंद्रसिंह नागर, हिमाचल प्रदेश, प्रभारी- श्रीकांत शर्मा, सहप्रभारी- संजय टंडन, जम्मू काश्मीर,उत्तर पूर्वेकडील राज्य संयोजक- डॉ. संबित पात्रा तर सहसंयोजक व्ही. मुरलीधरण हे असतील.

### दृष्टिक्षेप

### अमरनाथ यात्रेनंतर जम्मू काश्मीरमध्ये निवडणूक

**नवी दिल्ली** : जम्मू काश्मीरमधून कलम ३७० आणि कलम ३५ (ए) हटवल्यानंतर ते केंद्रशासित राज्य करण्यात आले. या घटनेला आता पाच वर्षे झाली आहेत व तेथील जनता आता विधानसभा निवडणूक होण्याची वाट पाहते आहे. त्यांच्यासाठी एक चांगली बातमी असल्याचे संकेत आहेत. सध्या सुरू असलेली अमरनाथ यात्रा संपल्यानंतर विधानसभा निवडणूक घेतली जाण्याची बातमी समोर येते आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्यांनी निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे संकेतही दिले आहेत. भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची एक महत्वाची बैठक झाली. त्यात जम्मू काश्मीरमधील अनेक नेतेही सहभागी झाले होते. भाजप राज्यातील सर्व ९० जागांवर स्वबळावर निवडणूक लढवू शकते आणि निवडणुकीच्या अगोदर कोणाशी आघाडी करण्याची गरज नसल्याचे या नेत्यांनी सांगितले.

### आग्रा येथे अग्निवीर जवानाची आत्महत्या

**नवी दिल्ली** : आग्रामधील शहागंज येथील अरीसार टेक्निशियन एरियामध्ये मंगळवारी रात्री दीड वाजताच्या सुमारास अग्निवीर जवानाने बंदूकीने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. हवाई दलाच्या संकुलात घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. २२ वर्षीय श्रीकांत कुमार चौधरी असे या अग्निवीर जवानांचे नाव आहे. ते मूळचे बलियामधील नारायणपूरचे रहिवासी होते. त्यांचे आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस तपास करत आहे. दरम्यान, त्यांचे गंगा नदीच्या हुकुमछापरा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी हवाई दलाने त्यांना गार्ड ऑफ ऑनर दिला. दरम्यान, अग्निवीर जवान श्रीकांत चौधरी यांची दीड वर्षांपूर्वी अग्निवीर योजनेंतर्गत सेंट्री पदावर भरती झाली होती.

## विश्वविजेत्या भारतीय संघाला अकरा कोटींचे पारितोषिक - मुख्यमंत्री

### विधिमंडळात कर्णधार रोहित शर्मासह सहकाऱ्यांचा विशेष सन्मान

**वृत्तसंस्था/मुंबई**

भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केले आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून, कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी अशी कामगिरी केली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वविजेत्या भारतीय संघावर कौतुकाची उधळण केली. तसेच भारतीय संघासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने अकरा कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक जाहीर केले. मुंबई महानगर प्रदेशात भविष्यात भव्य 



आणि आधुनिक असे स्टेडियम उभारण्यास गती देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मासह, त्याचे सहकारी सुर्यकूमार यादव, यशस्वी जयस्वाल, शिवम् दुबे, प्रशिक्षक पारस म्हाब्रे, संघ व्यवस्थापक अरूण कानडे यांचा आज विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात विशेष सत्कार करण्यात आला. खचाखच भरलेले हे मध्यवर्ती सभागृह आज क्रिकेटच्या जल्लोषाने दणाणून गेले. भारतीय राष्ट्रध्वज उंचावून सभागृहात भारत माता की जय आणि वंदे मातरम् च्या घोषणाही घुमल्या. ...हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा, हुकला तो संपला या क्रिकेटमधीलच विक्रमादित्य लिटल मास्टर सुनील गावस्कर यांच्या आवाजातील गाण्याने आणि हिंदी चित्रपट चक दे इंडिया..! च्या जल्लोषी सुरांनी सभागृह सुरवातीपासूनच निनादून गेले. यातच टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि सहका-यांचे आगमन होताच सभागृहातील घोषणा आणखी टिपेला पोहोचल्या. या विशेष समारंभास विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह दोन्ही सभागृहातील सदस्य, क्रीडाप्रेमी आदी उपस्थित होते.

## भारतीय लष्कराला मिळाल्या ३५ हजार एके २०३ रायफल

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

इंडो-रशियन रायफल्स प्रायव्हेट लिमिटेड (आयआरआरपीएल), भारत आणि रशिया यांच्यातील संयुक्त उपक्रमाने भारतीय सैन्याला ३५ हजार एके २०३ असॉल्ट रायफल्स दिल्या आहेत.

मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अंतर्गत २०२१ मध्ये त्यांचे उत्पादन सुरू करण्यात आले. या रायफलचे वैशिष्ट्य म्हणजे ती १ मिनिटात ७०० राउंड फायर करू शकते, वजनाने हलकी आहे आणि कधीही जाम होत नाही. लष्कराशिवाय भारतातील सुरक्षा यंत्रणांनाही एके २०३ असॉल्ट रायफलने सुसज्ज केले जाईल. याशिवाय आयआरआरपीएल ही रायफल इतर देशांनाही निर्यात करू शकेल. भारतीय लष्कर १९९६ पासून इन्सास रायफल वापरत आहे. सध्या तिन्ही सैन्यांकडे सुमारे ७ ते ८ लाख इन्सास आहेत. इन्सासच्या तुलनेत ही रायफल लहान, हलकी आणि जास्त मारक आहे. एके २०३ चे वजन ३.८ किलो आहे. तर इंसास रायफलचे वजन मॅगझिन आणि संगीन नसतानाही ४.१५ किलो आहे.

## दोन सख्ख्या चुलत बहिणींचा एकाचवेळी मृत्यू

**लोकशाही वार्ता/धामणगाव रेल्वे**

धामनगाव तालुक्यातील विरूळ रोंघे येथील रहिवासी असलेल्या दोन बहिणींना गुरुवार, ४ जुलै रोजी हगवण लागली असता त्यांना खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार केला. प्रकृती ठीक असल्याने रात्रीला घरी आणले. मात्र, पहाटे दोन्ही सख्ख्या चुलत बहिणींचा दहा मिनिटांच्या फरकाने मृत्यू झाल्याने संपूर्ण विरूळ रोंघे गाव हळहळले आहे. आरोग्य, महसूल, पोलिस प्रशासन या घटनेमागील शोध घेत आहे. दरम्यान, अन्नातून झालेल्या विषबाधामुळे हा प्रकार 



घडला असावा, असा निष्कर्ष आरोग्य विभागाने काढला आहे. नंदिनी प्रवीण साव (वय १०), चैताली राजेश साव (वय ११) अशा मृत्यू झालेल्या दोन्ही सख्ख्या चुलत बहिणींचे नाव आहे.

चैताली ही गावातील माधवराव वानखडे विद्यालयात इयत्ता पाचवी शिक्षण घेत होती तर नंदिनी प्राथमिक मराठी जि.प. शाळेत इयत्ता चौथा वर्गात होती. नंदिनी गुरुवारी शाळेत गेली नाही तर चैताली ही नेहमीप्रमाणे सकाळ सत्रात असलेल्या शाळेत गेली होती. दुपारी दोघी बहिणी एकत्र खेळल्या. मात्र, अचानकपणे दोघींनाही पोटात दुखणे, ताप व हगवण लागल्याने धामणगाव रेल्वे येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले.

दोघींची प्रकृती ठीक असल्याने त्यांना घरी नेण्यात आले. मात्र, अचानक रात्री दोघींची प्रकृती बिघडली व पहाटे नंदिनी व चैताली यांच्या अवघ्या दहा मिनिटांच्या फरकाने मृत्यू झाला.

### विषारी वायूमुळे चौघांचा मृत्यू

**कोरबा** : छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्यातील कटघोरा पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या जुराली गावात विहिरीतील विषारी वायूमुळे शुक्रवारी चौघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. यासंदर्भात स्थानिक पोलिसांनी सांगितले की, गावातील जहारू पटेल (वय ६०) हे बागेत काम करत असताना विहिरीत पडले. याबाबत माहिती मिळताच त्यांची मुलगी सपिना पटेल (वय १६) हिने वडिलांना वाचवण्यासाठी विहिरीत उडी घेतली. यानंतर शिवचरण उर्फ कालीराम पटेल (४५) आणि मनबोध पटेल (५७) हेही विहिरीत उतरले, मात्र या सर्वांचा मृत्यू झाला.

## हाथरस दुर्घटनेची चौकशी निवृत्त न्यायमूर्तींद्वारे करावी

### सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

**नवी दिल्ली** : उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये सत्संगादरम्यान चेंगराचेंगरीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. या घटनेची चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली व्हावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलीय. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात या याचिकेवर लवकर सुनावणी घेण्याची मागणी करणारा उल्लेख करण्यात आला. मुख्य न्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना या प्रकरणाची माहिती द्यावी, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाच्या सूचनेनंतर याचिकाकर्त्याने मुख्य न्यायमूर्तींना मेलही पाठवून लवकर सुनावणीची मागणी केली आहे. हाथरस दुर्घटनेची चौकशी करणारी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती स्थापन करावी, असे या मेलमध्ये म्हटले आहे.

### नीट पीजीची नवी तारीख जाहीर

**नवी दिल्ली** : नीट पीजी २०२४ परीक्षेची नवीन तारीख आता जाहीर करण्यात आली आहे. ही परीक्षा आता ११ ऑगस्ट रोजी दोन सत्रामध्ये घेतली जाणार आहे. याबाबतची अधिसूचना एनबीईएमएसकडून जारी करण्यात आली आहे. यासंदर्भातील एक परिपत्रकही जारी करण्यात आले आहे. नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सने राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट पीजी २०२४ या परीक्षेची तारीख जाहीर केली आहे.

### सोने चांदी

| | |
|---|---|
| सोने | ७२,५००/- |
| चांदी | ९२,५००/- |

* जीएसटी व अन्य कर अतिरिक्त

### तापमान

| शहर | कमाल / किमान |
|---|---|
| नागपूर | ३०.९ / २३.६ |
| वाशीम | ३२.० / २२.० |
| अकोला | ३६.४ / २६.४ |
| बुलडाणा | ३१.० / २४.४ |
| अमरावती | ३१.८ / २५.१ |
| यवतमाळ | ३२.२ / २६.० |
| वर्धा | ३३.० / २६.२ |
| चंद्रपूर | ३५.२ / २३.० |
| गडचिरोली | ३०.६ / २३.८ |
| भंडारा | ३०.२ / २३.२ |
| गोंदिया | ३०.५ / २३.६ |

## जेवणातून २८ जणांना विषबाधा

**लोकशाही वार्ता/गडचिरोली**

नामकरणाच्या कार्यक्रमात बनविलेल्या मांसाहारी जेवणात विष टाकल्याने २८ जणांना बाधा झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. यात पाच चिमुकल्यांचा समावेश असून सर्वांवर उपचार सुरु आहेत. ही घटना धानोरा तालुक्यातील शेवटच्या टोकावरील छत्तीसगड सीमेवरच्या झाडापापडा ग्रामपंचायत अंतर्गत रोपीनगट्टा येथील आहे. रोपीनगट्टा येथील सुरगू मुरा टेकाम यांच्या नातीनच्या नामकरण विधीचा कार्यक्रम ४ जुलैला आयोजित केला होता.

यानिमित्ताने टेकाम परिवाराने खास मांसाहारी जेवणाचा बेत आखला होता. मात्र, पहिल्या पंगतीत जेवण केलेल्यांना १५ मिनिटांतच उलट्या, मळमळ, डोकेदुखी असा त्रास व्हायला सुरुवात झाली. त्यानंतर एकच गोंधळ उडाला. दुसरी पंगत थांबविण्यात आली.

प्रकृती अत्यवस्थ झालेल्या सर्व १८ जणांना पेंढरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे प्रथमोपचार केल्यानंतर २२ जणांना जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले असून सहा जणांना छत्तीसगड राज्यातील पाखांजूर येथे हलविण्यात आले आहे. यातील तिघांची प्रकृती अत्यवस्थ असून त्याच्यावर उपचार सुरु आहे.

घटनास्थळ नक्षलप्रभावित भागात असल्याने घटनेची माहिती शुक्रवारी मिळाली. सुरक्षा यंत्रणा दक्ष झाली असून पेंढरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून अन्न व औषध प्रशासन विभागाला पाचारण करुन अन्न नमुने घेण्याचे काम सुरु आहे. पक्ष्यांना मारण्यासाठीचे विषारी द्रव मांसाहरी जेवणात टाकल्याचा प्राथमिक अंदाज असून ते कोणी टाकले, कशासाठी टाकले हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. यासंदर्भात पेंढरी पोलिसांशी संपर्क होऊ शकला नाही.

## रुग्णवाहिका सेवेमुळे एक कोटी रुग्णांना लाभ

**वृत्तसंस्था/मुंबई**

आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत डायल १०८ ही रुग्णवाहिका सेवा अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या या सेवेने राज्यातील नागरिकांची आरोग्य सेवा करीत तब्बल १० वर्ष पूर्ण केले आहे. या १० वर्षाच्या कालावधीत १०८ रुग्णवाहिकेची सेवा रूग्णांना जीवनदान देणारी ठरली आहे. अशा या संजीवनी देणा-या रुग्णवाहिका सेवेने राज्यात १ कोटी ३ हजार ४४६ रुग्णांची विनामूल्य आरोग्य सेवा केली आहे.

कुणी आजारी असेल, अपघात 



झाला असेल किंवा वैद्यकीय सेवेची मदत असेल तर १०८ रुग्णवाहिका सेवेसाठी तत्पर असते. आपत्कालीन आरोग्य सेवांसाठी एक-शून्य-आठ हा विनामूल्य दूरध्वनी क्रमांक आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, सार्वजनिक आरोग्य विभाग व भारत विकास ग्रुपच्या (बीव्हीजी इंडिया) संयुक्त विद्यमाने ही सेवा अव्याहतपणे राज्यात ठिकठिकाणी चालविण्यात येत आहे. महाराष्ट्रात या सेवेची सुरुवात जानेवारी २०१४ मध्ये झाली. राज्यात सध्या ९३७ रुग्णवाहिका असून सर्व रूग्णवाहिकेत पल्स ऑक्सिमीटर, मेडिकल ऑक्सिजन यंत्रणा सज्ज आहे.

ही देशातील अविरत २४तास डॉक्टर व अत्यावश्यक वैद्यकीय सुविधेसह असणारी एकमेव यंत्रणा आहे. राज्यात १०८ रुग्णवाहिकेमध्ये ४० हजार २१३ प्रसुती करण्यात येऊन त्यांना सुखरूप सोडण्यात आले आहे. तसेच ४ हजार ३४ रूग्णांना कृत्रिम श्वासोच्छवास (व्हेंटीलेटर) ची सुविधा देण्यात येऊन त्यांचे प्राण वाचविण्यात आले आहे.

राज्यात कोणत्याही ठिकाणावरून मोबाईल अथवा दुरध्वनीवरून १०८ क्रमांक डायल करताच वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना विनामूल्य आणि वेळेत रूग्णवाहिका सेवा देण्यात येते.

सेवा सुरू झाली तेव्हापासून, जून २०२४ पर्यंत अपघाती घटनांमध्ये रूग्णवाहिकेमधून ५ लाख २२ हजार ६८२ रूग्णांना उपचारासाठी रूग्णालयात पोहचविण्यात आले आहे.

# ‘एसएनडीटी’ने आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन केंद्र निर्माण करावे

## राज्यपाल रमेश बैस यांची सूचना


**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर आहे. देश-विदेशातील लोक या शहराला भेट देत असतात. महर्षी कर्वे यांनी महिलांसाठी स्थापन केलेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने आपली आंतरराष्ट्रीय स्तरावर दृश्यता वाढवण्यासाठी एक प्रदर्शन केंद्र तसेच विद्यार्थ्यांसाठी आउटरीच सेंटर निर्माण करावे, अशी सूचना राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी येथे केली. अश्या प्रकारच्या प्रदर्शन केंद्रामुळे मुंबईला येणा-या महत्त्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अतिथींना विद्यापीठाची महती व संशोधन, गृह विज्ञान, क्रीडा व इतर क्षेत्रातील उपलब्धी समजण्यास मदत होईल, असे राज्यपालांनी सांगितले.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा १०९ वा स्थापना दिवस राज्यपाल बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी विद्यापीठाच्या महर्षी कर्वे शैक्षणिक परिसर, मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. भारतरत्न महर्षी कर्वे यांनी सन १९१६ साली याच दिवशी विद्यापीठाची स्थापना केली होती.

यावेळी विषमुक्त शेती व देशी बियाणांच्या जतनासाठी कार्य करणा-या पद्मश्री राहीबाई पोपेरे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ उज्वला चक्रदेव, प्रकुलगुरु डॉ. रुबी ओझा, कुलसचिव विकास नांदवडेकर, माजी कुलगुरु रूपा शाह व चंद्रा कृष्णमूर्ती, सुधीर ठाकरसी, अधिष्ठाता, अध्यापक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

महर्षी कर्वे यांनी महिला सक्षमीकरणाच्या कायार्ला सुरुवात केली त्यावेळी देश पारतंत्र्यात होता. भारतीय समाज अंधश्रद्धा आणि रूढी



परंपरांमध्ये गुरफटला होता. महिला साक्षरतेचे प्रमाण नगण्य होते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कर्वे आणि इतर द्रष्ट्या व्यक्तींनी केलेल्या कायार्मुळे देशात महिला शिक्षण तसेच सक्षमीकरणाचे कार्य शक्य झाले असे सांगताना महिला विद्यापीठाने श्रेष्ठ १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करावे असे आवाहन राज्यपालांनी केले.

### राहीबाई पोपेरे यांच्या संदेशाने विद्यार्थिनी भारावल्या

आपण शाळेची पायरी चढलो नाही, परंतु निसर्गाची शाळा शिकलो. सेंद्रिय शेती करून व देशी वाण घराघरातून पोहोचवणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सीड बँक तयार केली. बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण केले. माती वाचवली तर पिढ्या वाचतील असे सांगून विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे ज्ञान ज्ञावे परंतु निसर्गाचेदेखील ज्ञान घ्यावे असे राहीबाई पोपेरे यांनी यावेळी बोलताना सांगितले. सेंद्रिय शेतीला चालना देऊन विषमुक्त अन्न तयार झाले पाहिजे. या कार्यात विद्यापीठांनी देखील हे काम हाती घेतले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्था, व्यवसाय, कॉर्पोरेट तसेच विद्यापीठांमध्ये महिला नेतृत्वस्थानी आहेत. नागरी सेवा, पोलीस सेवा आणि सशस्त्र दलांमध्ये देखील महिलांची टक्केवारी सातत्याने वाढत आहे. भारताच्या स्टार्टअप क्रांतीमध्ये देखील महिला उद्योजक आघाडीवर आहेत. परंतु विकसित राष्ट्रांच्या तुलनेत देशातील कार्यबलामध्ये महिलांचा सहभाग कमी आहे. महिलांना कौशल्ये प्रदान करून आणि त्यांची सध्याची कौशल्ये उन्नत करून श्रमशक्तीमध्ये त्यांचा सहभाग वाढवावा, असे राज्यपालांनी सांगितले. उच्च शिक्षणात सकल नोंदणीचे गुणोत्तर ५० इतके साध्य करण्याचे दृष्टीने विद्यापीठाने शाळांमध्ये जाऊन भावी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे तसेच त्यासाठी समाज माध्यमांचा उपयोग करावा, अशी सूचना राज्यपालांनी केली.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवा

## महिला, बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, तहसीलदार, तलाठी, पर्यवेक्षिका, वार्ड अधिकारी या घटकांकडून प्रभावीपणे काम करुन घ्यावे, अशा सूचना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात शुक्रवारी मंत्रालयात मंत्री कु.तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीला महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ.अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पवार उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून राज्यातील सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी,



सर्व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, व इतर संबधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना सर्व समाजातील शेवटच्या महिलापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी अंगणावाडी केंद्रात या योजनेचे परिपूर्ण, माहितीचे फलक लावावेत, जेणेकरुन सर्व महिलांना योजनेसंदभार्तील पात्र-अपात्रतेचे निकष समजतील, अशा पद्धतीने नियोजन करुन घ्यावे. तसेच ऑफलाईन फार्म भरुन घेताना कुठल्याही प्रकारचे पैसे घेवू नयेत, याबाबतच्या सूचना विभागाकडून देण्यात याव्यात. तालुका गावपातळीवर प्रत्येक अंगणवाडी सेविकांचा व्हॉटस्अप ग्रुप तयार करुन त्या ग्रुपवर या योजनेची सविस्तर माहिती द्यावी. प्रत्येक अंगणवाडी सेविकेला प्रत्येकी फॉर्म मागे 50 रुपये मानधन मिळणार आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची फसवणूक किंवा पैसे मागण्याचा प्रकार घडणार नाही याची दक्षताही घेण्यात घ्यावी, असेही मंत्री तटकरे यांनी यावेळी सांगितले.

गावस्तरावर तसेच तालुकास्तरावर संबंधित घटकांचे सहकार्य घेवून ही योजना यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

## पंढरपूर येथील नामसंकीर्तन सभागृहाचे बांधकाम पूर्ण

**सोलापूर :** पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने येथील श्री संत तनपुरे महाराज मठाच्या लगत भव्य असे नामसंकीर्तन सभागृह बांधण्यात येत आहे. जून २०१८ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या नामसंकीर्तन सभागृहाचे बाह्य बांधकाम पूर्ण झाले असून अंतर्गत सजावट, वातानुकूलन, एरिया डेव्हलपमेंट आदी कामे सुरू आहेत. तब्बल ६ वर्षे झाली तरी सभागृहाचे काम अद्यापही अपूर्ण असल्याने शासनाने सभागृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून त्याचे लोकार्पण करावे अशी मागणी वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी व पंढरीतील स्थानिक नाट्य कलावंतानी केली आहे. यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या प्रयत्नातून शासनाने ४० कोटी रुपये खर्चाच्या नामसंकीर्तन सभागृहास मंजुरी दिली होती.

# यंदाच्या हंगामात विकसित देशांना ३३९७ टन आंब्याची निर्यात

**वृत्तसंस्था/पुणे**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुंबईतील वाशी येथील तीन आणि बारामती (जि. पुणे) येथील एका निर्यात सुविधा केंद्रांवरून यंदाच्या हंगामात विकसित देशांना ५५.८९ कोटी रुपये मूल्याच्या ३३९७ टन आंब्याची निर्यात झाली आहे. पणन मंडळाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, ब्रिटन, युरोपसह आग्नेय आशियातील देशांना कोकणातील हापूस, मराठवाड्यातील केशर आणि कर्नाटकातील बैगनपल्ली या आंब्यांची मोठ्या प्रमाणावर निर्यात



झाली.

भारतातून दरवर्षी सरासरी सुमारे २५ हजार टनांपर्यंत आंब्याची निर्यात होते. त्यामध्ये महाराष्ट्रामधील हापूस, केशर, राजापुरी, अन्य राज्यांतून बैगनपल्ली, हिमायत, दशेरी, चौसा आदी जातींचा प्रामुख्याने समावेश असतो. पणन मंडळाच्या वतीने समुद्रमार्गे तसेच हवाईमार्गे नियार्तीसाठीच्या त्या-त्या देशांच्या मागणीनुसार प्रक्रिया करून आंबा निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. परदेशी बाजारपेठेमध्ये अत्यंत चांगल्या पॅकिंगमध्ये एकसारखा आंबा निर्यात करणे आवश्यक असते. त्याचबरोबर आंब्यावर कोणत्याही प्रकारच्या रोग व किडीचा प्रदुर्भाव नसणे, फळांची प्रत चांगली असणे, फळांवर डाग नसणे, ओरखडे नसणे गरजेचे असते.

# श्री विठ्ठल-रुक्मिणीचे मेघडंबरीमध्ये विसावलेले रूप अधिकच विलोभनीय

**वृत्तसंस्था/सोलापूर**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील गाभायार्तील श्री विठ्ठल-रुक्मिणीभोवती सागवानी लाकडाची, चांदीने मढवलेली मेघडंबरी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत बसविण्यात आली. मेघडंबरीत विसावलेले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे रूप अधिकच विलोभनीय दिसत आहे.पुरातत्त्व खात्याच्या अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरच्या श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात जतन, संवर्धन आणि मजबुतीकरणाचे काम सुरू आहे.

या कामादरम्यान श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती भोवती असणारी मेघडंबरी काढून ठेवण्यात आली होती. सध्या गाभायार्तील काम मार्गी लागले असून, आता दोन्ही मूर्तींभोवती नव्याने सागवानी लाकडांची, चांदीने मढवलेली मेघडंबरी बसवण्यात आली.

नवीन सागवानी लाकडाची मेघडंबरी श्री संत कबीर महाराज मठ व फडातर्फे ह.भ.प. विष्णू महाराज कबीर यांनी दान दिली आहे. श्री विठ्ठल मूतीभोवतीची १६० किलो वजनाची, तर श्री रुक्मिणीमातेभोवतीची ११०किलो वजनाची मेघडंबरी आहे. यासाठी ३०लाख ५० हजार रुपये खर्च आला आहे.

ही सागवानी लाकडाची मेघडंबरी घडविण्याचे काम गेल्या कित्येक दिवसांपासून पंढरीत सुरू होते. या मेघडंबरीला चांदीने मढविण्यासाठी एका दानशूर भक्ताने दोन कोटी रुपये किमंतीची २२५किलो चांदी दिली आहे. ही चांदी लाकडी मेघडंबरीवर मढविण्यात आली आहे. यासाठी तीन दिवसांचा कालावधी लागला.

## समाजकल्याण विभागामार्फत स्टॅन्ड अप इंडिया योजना

**पुणे :** समाजकल्याण विभागामार्फत केंद्र शासनाची स्टॅन्ड अप इंडिया ही योजना राबविण्यात येत असून अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवगार्तील नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्टॅन्ड अप योजनेअंतर्गत राज्यातील अनुसूचित जातीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजकांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के स्वहिस्सा रकमेपैकी जास्तीत जास्त १५ टक्के मार्जीन मनी वितरीत करण्यात येते.१० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टॅन्ड अप योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित १५ टक्के अनुदान देण्यात येते.

# ऐन पावसाळ्यात फेरीवाल्यांवर सुरू असलेली कारवाई तत्काळ थांबवा

## नाना पटोले यांची मागणी

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबईसह राज्यातील इतर शहरात अंदाजे ३० लाख फेरीवाले आहेत पण त्यांच्यासाठी ठोस धोरण नसल्याने आजही ते त्यांच्या हक्कांपासून वंचित आहेत. २०१४ साली लोकसभेने फेरीवाल्यांसदर्भात कायदा केला व सर्व राज्याने तशाप्रकारे फेरीवाला धोरण आखणे अपेक्षित होते परंतु १० वर्षानंतरही राज्यात फेरीवाल्यांसाठी ठोस धोरण नाही. केवळ योजना नसल्याने फेरीवाल्यांना अमानुष वागणूक मिळते, त्यांचे साहित्य जप्त केले. सरकारने फेरीवाल्यांबद्दल ठोस धोरण आखावे तोपर्यंत सध्या पावसाळ्यात होत असलेली कारवाई तात्काळ थांबवावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. फेरीवाल्यांच्या मुद्द्यांवर विधिमंडळात बोलताना नाना पटोले म्हणाले की, मुंबईसह राज्यातील इतर शहरातील फेरीवाल्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. पावसाळा सुरू असताना त्यांच्यावर कारवाई केली जाते हे अन्यायकारक आहे. ३० लाख कुटुंबाचा हा प्रश्न आहे, त्यांना कायदेशीर अधिकार देऊन सन्मानाने जगता याले पाहिजे. यासाठी राज्यात जोपर्यंत फेरीवाल्यांना कायदेशीर संरक्षण मिळत नाही तोपर्यंत ही कारवाई थांबवण्याचे निर्देश सरकारला द्यावेत, असे नाना पटोले म्हणाले.

**योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश देऊ - ॲड. नार्वेकर**

विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर म्हणाले की, केंद्र सरकारने फेरीवाला कायदा करून १० वर्षे झाली तरी राज्यात अद्याप ठोस धोरण नाही, त्यासंदर्भातील कमिट्या झालेल्या नाहीत, फेरीवाल्यांची परिस्थिती अवघड झालेली आहे.

# अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीक स्पर्धा

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यातील प्रयोगशील शेतक-यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव करण्यासाठी राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळित धान्य पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. खरीप हंगाम सन २०२४ पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतक-यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी केले आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, सुर्यफूल या ११ पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पीकस्पधेर्साठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख मूग व उडीद पिकासाठी ३१ जुलै तर भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग व सुर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट आहे. स्पधेर्साठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र राहीत. शुल्क सर्वसाधारण गटासाठी ३०० रुपये व आदिवासी गटासाठी १५० रुपये राहील.

# टीम इंडियाच्या सत्कारावरून विधान परिषदेत खडाजंगी

**वृत्तसंस्था/मुंबई**

टीम इंडियाचा विजयी जल्लोष मुंबईत पाहण्यास मिळाला. आपल्या भारतीय क्रिकेट संघाने १७ वर्षांनी टी २० विश्वचषक जिंकला. त्याचे जोरदार सेलिब्रेशन मुंबईत करण्यात आले. मात्र या खेळाडूंच्या सत्काराचे जे पोस्टर आहे त्या पोस्टरवरुन शुक्रवारी विधानपरिषदेत सत्ताधारी विरुद्ध विरोधक अशी खडाजंगी पाहण्यास मिळाली. प्रश्नोत्तराच्या तासांत काँग्रेस आमदार यांनी पोस्टरचा मुद्दा उपस्थित केला. भाई जगताप म्हणाले, टीम इंडियाच्या सत्काराचे जे पोस्टर आहे टीम इंडियाच्या खेळाडूचे नाव किंवा फोटो काहीही नाही. फक्त मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांचे फोटो आहेत. विधानसभेसाठी हा विषय अभिमानाचाच आहे. सगळ्यांना बोलवा आपण सगळे टीम इंडियाचे स्वागत करु. मात्र एखादी लिग जिंकल्याप्रमाणे हे असे पोस्टर दाखवले जात आहे. हे पोस्टर मी मुद्दाम दाखवत आहे, असे भाई जगताप म्हणाले. त्यानंतर अनिल परब यांनीही त्यांचे म्हणणे मांडले.

भारताने विश्वचषक जिंकला आहे ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे. तसेच आपल्या विधिमंडळाने टीम इंडियाचा सत्कार करण्यास ठरवले आहे. विरोधकही या सभागृहाचे सदस्य आहेत. आम्हाला या सत्कारापासून दूर का ठेवलं जातं आहे आम्ही भारताचे नागरिक नाही का जो कार्यक्रम सरकारने आयोजित केला आहे तो विधिमंडळाला अवगत असला पाहिजे इतकीच आमची मागणी आहे. जगज्जेत्यांचे आपण स्वागत करत आहोत. ही चांगलीच गोष्ट आहे, आम्हा विरोधी पक्षातल्या नेत्यांना तुम्ही अशा टोकावर नेऊन ठेवले की अशा चांगल्या कार्यक्रमातही आम्ही येऊ शकत नाही. हे काही बरोबर नाही. सगळ्यांना निमंत्रण द्या, सोनेरी क्षणांचा आम्हाला भागीदार होऊ द्या इतकेच आमचे म्हणणे आहे. असे अनिल परब म्हणाले. त्यानंतर विधान परिषदेचे नेते प्रवीण दरेकर यांनी या दोन्ही नेत्यांना उत्तर दिले. भाई जगताप आणि अनिल परब यांचा मुद्दा रास्त आहे. सत्कार सोहळ्याचे निमंत्रण सर्वपक्षीय नेत्यांना दिले पाहिजे. आमचा जो अभिमान आहे तोच त्यांच्यासाठीही अभिमानाचा क्षण आहे.

## महानेट योजना गतीने पूर्ण करणार - तानाजी सावंत

**मुंबई :** महाआयटी कडून राज्यातील २६ जिल्ह्यांची १५३ तालुक्यातील सुमारे १२ हजार ५१३ ग्रामपंचायतींना फायबर ऑप्टिकल केबल नेटवर्कचा वापर करून हायस्पीड इंटरनेट कनेक्टिव्हिटी देण्यासाठी पारदर्शकतेने अंमलबजावणी करण्यात येत असून हे काम गतीने पूर्ण करण्यात येईल, असे मंत्री प्रा.डॉ तानाजी सावंत यांनी विधानपरिषदेत उत्तर देताना सांगितले. माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या ह्यमहानेटह्णचे काम वेळेत होण्याबाबत विधानपरिषद सदस्य सत्यजित तांबे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. मंत्री प्रा.डॉ. सावंत म्हणाले की, महानेट ही योजना राज्यात निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. हे काम करताना काही अडचणी आल्यास त्यावर मार्ग काढून कामे पूर्ण केली जात आहेत. गावात काम करताना स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेतले जात आहे. राज्यात महानेटअंतर्गत ९ हजार ९११ ग्रामपंचायतीमध्ये राऊटर बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. ५६ हजार ०६७ किलो मीटर फायबर ऑप्टिकल केबल टाकण्याच्या उद्दिष्टपैकी ५० हजार ४९९ म्हणजेच ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. महाआयटी मार्फत शासनाच्या ३८ विभागांच्या ४५ सेवांचा नागरिकांना ऑनलाईन लाभ घेता येत आहे.

# माकपने आघाडीकडे केली राज्यातील दहा विधानसभा मतदारसंघांची मागणी

**वृत्तसंस्था/सोलापूर**

महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाने आघाडीकडे राज्यातील दहा विधानसभा मतदारसंघांची मागणी केली असून याबाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतील, अशी माहिती माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी पत्रकारांना दिली. दत्त नगर येथील माकप कार्यालयात वोट दो और नोट भी दो ही अभियान सुरू करण्यात आली. या वेळी आडम यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निधी संकलन करण्यासाठी माकपचे कार्यकर्ते आता घरोघरी जातील. वोट सोबत आता नोटहीमागतील. ही पक्षाची जुनीच परंपरा असल्याची माहिती यावेळी आडम यांनी दिली.


लोकसभा निवडणुकीत माकपने काँग्रेसचा प्रचार केला. त्यांना साथ दिली. काँग्रेसकडे आम्ही महाविकास आघाडीतून शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची मागणी केली. काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार यांची भेट घेतली. दोघेही सकारात्मक आहेत. आता शहर मध्य बाबत स्थानिक नेत्यांनी देखील शब्द पाळावा, अशी भूमिका माजी आमदार नरसय्या आडम यांनी मांडली.

# सौर उर्जा योजना प्रशिक्षणासाठी शास्त्रज्ञ व शेतकरी जबलपूरला रवाना

**वृत्तसंस्था/अहमदनगर**

महात्मा फुले कृषी विद्यापीठातर्फे शास्त्रज्ञ व शेतकर्यांसाठी सौर उर्जा सिंचन योजना या विषयावर तीन दिवसांच्या क्षमता विकास प्रशिक्षणासाठी जबलपूर-मध्यप्रदेश येथे बोरलॉग इंन्स्टिट्यूट ऑफ साउथ एशिया (बीसा) या संस्थेत २० शास्त्रज्ञ व १२ शेतकरी असे एकूण ३२ प्रशिक्षणार्थींची दुसरी तुकडी रवाना झाली आहे.

या तीन दिवसाच्या प्रशिक्षणात बोरलॉग इन्स्टिट्युटचे प्रमुख डॉ.रवी गोपालसिंग व त्यांचे सहकारी डॉ.प्रभात कनुजे आणि डॉ.विवेक सिंग हे प्रशिक्षण देणार



आहेत.महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.पी.जी.पाटील यांचे सुचनेनुसार व माजी संशोधन संचालक डॉ.सुनिल गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील शास्त्रज्ञ व शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी जाणार्या या दुसर्या तुक डीच्या बसला कृषि अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख व आंतरविद्याशाखा जलव्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.मुकुंद शिंदे यांनी निरोप दिला.यावेळी डॉ.मुकुंद शिंदे म्हणाले की या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या सिंचन पध्दतींमध्ये केलेला सोलरचा उपयोग या संबंधीचा अभ्यास करता येणार आहे.तसेच सौर उजेर्चा सिंचन पध्दतींमध्ये होणार्या वापराविषयी जागृती होणार आहे.या कार्यक्रमाप्रसंगी जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे सह योगी प्राध्यापक डॉ. सुनील कदम व संशोधन सहयोगी डॉ.शुभांगी घाडगे उपस्थित होते.

# कॅन्सरग्रस्त महिलेला २५व्या आठवड्यात गर्भपाताची परवानगी

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई उच्च न्यायालयाने कॅन्सरने पीडित असलेल्या महिलेला गर्भपात करण्याची परवानगी दिली आहे. ही महिला २५ आठवड्यांची गर्भवती आहे. संबंधित महिलेला कॅन्सरचे उपचार घेता यावेत यासाठी उच्च न्यायालयाने ही परवानगी दिली आहे.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि नीला गोखले यांनी हा निर्णय दिला आहे. ही महिला गरोदर असतानाच तिला स्वादुपिंडाचा कॅन्सर झाल्याचे निदान झाले असल्याचे न्यायमूर्तींनी नमूद केले आहे. तसेच गर्भपात केला तर मातेच्या जीवाला धोका नसल्याचा वैद्यकीय अहवाल डॉक्टरांनी दिला होता, हा मुद्दा न्यायालयाने विचारात घेतला.

न्यायमूर्तींनी म्हटले, याचिकाकर्त्या महिलेला पुनरुत्पादन अधिकार आणि त्याबद्दलचे स्वातंत्र्य आहे. तिचा तिच्या शरीरावर अधिकार आहे, आणि निवडीचा अधिकार आहे. या स्थितीत टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे मेडिकल बोर्ड आणि याचिकाकर्ती महिला हिच्याकडे असलेले पर्याय लक्षात घेता आम्ही गर्भपाताची परवानगी देत आहोत.

# जेजुरीकरांनी केले माउलींचे भव्य स्वागत

**वृत्तसंस्था/पुणे**

टाळ मृदंगाचा गजर आणि हरिनामाचा जयघोष करत पंढरीला निघालेला संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा लाखो वारक-यांसमवेत मल्हारीनगरी जेजुरीच्या कुशीत विसावला. भंडाऱ्याची मुक्त उधळण करीत जेजुरीकरांनी माउलींचे भव्य स्वागत केले.

सोपानदेवांच्या सासवडनगरीत दोन दिवसांची विश्रांती घेऊन सकाळी पावणेआठच्या सुमारास माउलींच्या पालखी सोहळ्याने निरोप घेतला.

माउलींना हद्दीपर्यंत सोडविण्यासाठी सासवडवासीयांनी गर्दी केली होती. ठिकठिकाणी रांगोळीच्या पायघड्या घातल्या होत्या. ग्रामस्थांनी खांद्यावर पालखी घेऊन रथामध्ये विराजमान केली आणि सोहळा पुढे चालू लागला. दिंड्या-दिंड्यांमधून काकड्याचे अभंग रंगू लागले. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता.

# पिकांच्या हमीभावात सुसूत्रता येणार- कृषिमंत्री मुंडे

**वृत्तसंस्था/मुंबई**

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे जी पाच राज्य विविध पिकांच्या हमीभावाच्या किमतींची शिफारस करतात, त्यामध्ये महाराष्ट्र देखील एक प्रमुख राज्य असून वेगवेगळ्या राज्यांनी विविध पिकांना सुचवलेल्या किमतींमध्ये असलेल्या तफावतीमुळे ब-याचदा हमीभावामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत येते. त्यामुळे हमीभाव सुचवताना सर्व राज्यांची सुसूत्रता व एक वाक्यता असावी असे आपण नुकत्याच केंद्रीय कृषी मूल्य आयोगाच्या बैठकीमध्ये प्रस्तावित केले असून याचीही अंमलबजावणी याच वर्षीपासून होणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, उत्तरामध्ये धनंजय मुंडे यांनी यावर्षी सरासरी पावसाच्या तुलनेमध्ये राज्यात झालेली पेरणी, बी-बियाणे, खते, कीटकनाशके यांची उपलब्धता, विविध शासकीय योजनांमधील लाभार्थ्यांची आकडेवारी, त्याद्वारे विविध योजनांसाठी खर्च करण्यात आलेला निधी, तसेच अगदी राज्य शासनाच्या कृषी हेल्पलाइनच्या व्हाट्सअप



क्रमांकावर आलेल्या तक्रारींच्या निवारणाची आकडेवारी सुद्धा सभागृहामध्ये सांगितली. तर धनंजय मुंडे यांनी संत तुकारामांच्या ह्यबरे केले देवा कुणबी झालो। नाही तर दंभेची असतो मेलो ह्ण या अभंगवाणीने आपल्या उत्तराचा समारोप करत आपण सर्व लोकप्रतिनिधी शेतक-यांची मुले आहोत व सर्वांच्या सहकार्यातून आपण शेतक-यांच्या हितासाठी काम करू अशी माहिती दिली. दरम्यान, २०२० मध्ये कडक लॉक डाऊन तसेच त्या काळात झालेली अतिवृष्टी अशा परिस्थितीमध्ये ऑफलाइन पद्धतीने झालेल्या पीक विमा प्रस्तावांच्या संदर्भात केंद्र स्तरावरील अपील तसेच काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून केंद्र स्तरावरील प्रकरणे अपिलात काढून तसेच न्यायालयातील प्रकरणांच्या बाबतीत शेतक-यांच्या बाजूने निर्णय व्हावा या दृष्टीने शासनाच्या मार्फत वकील देऊन सदर प्रकरणे देखील शक्य तितक्या लवकर निकाली काढण्यात येतील.


तसेच जुन्या पीक विम्याच्या संदर्भात ज्या ज्या लोकप्रतिनिधींनी स्वतंत्र तक्रारी केल्या आहेत, अधिवेशन संपताच त्या संदर्भात स्वतंत्र बैठका घेऊन याबाबतही तातडीने निकाल घेऊन संबंधित कंपन्यांना पीक विमा देण्यास भाग पाडले जाईल, असेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले.

लोकांचे दैनिक
# लोकशाही वार्ता



# देशाच्या संरक्षण उत्पादनात १६ टक्के वाढ

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची माहिती : पंतप्रधान मोदी यांनी केले अभिनंदन



### भारताची संरक्षण निर्यात वाढली

केंद्र सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३५ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीसह १ लाख ७५ हजार कोटी रुपयांचे स्वदेशी संरक्षण उत्पादन साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तर, सरकारने २०२३-२४ या आर्थिक वर्षात २१ हजार कोटी रुपयांची संरक्षण निर्यात केली होती, जी मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ३२.५ टक्क्यांनी अधिक आहे.

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

मागील काही वर्षांपासून भारताच्या मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. या वाढीमुळे भारताची निर्यात क्षमतादेखील वाढली आहे. यात डिफेन्स क्षेत्राचाही मोठा वाटा आहे. स्वतः संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ही माहिती दिली आहे. राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी (५ जुलै) सांगितले की, भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात २०२३-२४ या आर्थिक वर्षात १६.८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे संरक्षण उत्पादनाचे एकूण मूल्य १.२६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्टमध्ये म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मेक इन इंडिया सातत्याने नवनवीन विक्रम करत आहे. भारताने २०२३-२४ मध्ये संरक्षण उत्पादनाच्या मूल्यात आतापर्यंतची सर्वाधिक वाढ नोंदवली आहे. २०२३-२४मध्ये संरक्षण उत्पादनांचे मूल्य १ लाख २६ हजार ८८७ कोटी रुपयांवर पोहोचले असून, हा आकडा मागील आर्थिक वर्षातील उत्पादन मूल्याच्या तुलनेत १६.८ टक्के अधिक आहे. या यशाबद्दल राजनाथ सिंह यांनी सार्वजनिक क्षेत्रातील (पीएसयू) आणि खाजगी क्षेत्राचे अभिनंदन केले. ते म्हणाले, डीपीएसयू, इतर संरक्षण पीएसयू आणि खाजगी क्षेत्रासह आमच्या संरक्षण उद्योगाचे अभिनंदन. भारताला एक आघाडीचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे, अशी पोस्ट त्यांनी केली. राजनाथ सिंह यांची पोस्ट रिशेअर करत पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा अतिशय उत्साहवर्धक विकास आहे. या कार्यक्रमात योगदान दिलेल्या सर्वांचे अभिनंदन करतो. क्षमता आणखी वाढवण्यासाठी आणि भारताला एक आघाडीचे जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून पुढे आणण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. यामुळे देशाची सुरक्षा यंत्रणा तर वाढेलच, पण आपल्याला आत्मनिर्भर बनवेल.

# अरविंद केजरीवाल तुरुंगात, संजय सिंह यांच्याकडे जबाबदारी

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**



आम आदमी पक्षाने राज्यसभा खासदार संजय सिंह यांची संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तुरुंगात गेल्यानंतर पक्षाची जबाबदारीही संजय सिंह यांच्याकडे आहे. आता यामध्ये आणखी भर पडली आहे. संजय सिंह यांच्या नियुक्तीनंतर त्यांनी पक्षाचे आणि मुख्यमंत्री केजरीवालांचे आभार मानले आहेत. ते म्हणाले की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रस्त्यापासून ते संसदेपर्यंत आवाज उठवण्याची संधी दिली. संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडीन. मुख्यमंत्री आणि पक्षाचा यासाठी अत्यंत आभारी आहे.

# हाथरस प्रकरणाचा मुख्य आरोपी 'हार्ट पेशंट'

## प्रकृती खराब असल्यामुळे नंतर चौकशी होणार

**वृत्तसंस्था/हाथरस**

उत्तर प्रदेशातील हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणातील मुख्य आरोपी देव प्रकाश मधुकर याच्या अटकेसाठी १ लाख रूपयांचा इनाम जाहीर केल्याबद्दल त्याचे वकील डॉ. ए. पी. सिंह यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. आपल्याला एफआयआरची प्रत मिळाली असून तपास संस्थांवर आपला पूर्ण विश्वास आहे. देव प्रकाश मधुकर हार्ट पेशंट आहे आणि त्याच्या कुटुंबातील एका सदस्याचाही दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती बरी झाल्यावर आम्ही त्याला पोलिस आणि एसआटीसमोर पुढील योग्य कारवाईसाठी हजर करू असे सिंह यांनी म्हटले आहे.

ए.पी. सिंह म्हणाले की देव प्रकाश मधुकरची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. आम्ही कोणतीही कायदेशीर कारवाई अथवा अन्य काही करणार नाही. दरम्यान, घटना घडली त्या दिवसापासून देव प्रकाश मधुकर घरी गेलेला नाही. त्याच्या कुटुंबातील सदस्यांनाही त्याचा ठावठिकाणा माहिती नाही. चेंगराचेंगरीची घटना झाल्यावर तो बेपत्ता झाल्याचे सांगितले जाते आहे व चेंगरीचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला आहे.

मधुकर याच्या शेजारी राहणाऱ्या लोकांच्या म्हणण्यानुसार तो ज्यूनिअर इंजिनिअर म्हणून काम करायचा आणि भोले बाबा नावाने ओळखल्या जाणाऱ्या सूरजपाल याचा कट्टर अनुयायी होता. गुरुवारी जेव्हा पोलिसांनी त्याला हुडकण्यासाठी त्याचे घर गाठले तेंव्हा तेथे मोठे कुलूप लागले होते. ज्या भागात त्याचे घर आहे ती एक दलित वस्ती आहे व तेथपर्यंत पोहोचण्यासाठी जेमतेम पाच मिनिटे लागतात. दरम्यान, चेंगराचेंगरीची घटना घडली त्या ठिकाणच्या नागरिकांमध्ये याबाबत वेगवेगळी मते आहेत. काही जणांच्या मते मधुकर याच्या चुकीमुळेच चेंगराचेंगरीची घटना घडली तर काही जणांचा असा दावा आहे की भोले बाबाला वाचवण्यासाठी मधुकरला मुख्य आरोपी करत बळीचा बकरा बनवला जात आहे. मधुकरचा बचाव करताना कायद्याचे शिक्षण घेत असलेला एक विद्यार्थी अखिलेश म्हणाला की सत्संगला येण्यासाठी मधुकर काही सगळ्या लोकांच्या घरी आमंत्रण द्यायला गेला नव्हता. तेथे जी गर्दी झाली होती ती बाबामुळे झाली होती व बाबा मात्र घटना घडल्यानंतर तेथून पसार झाला. तर एका महिलेने मात्र मधुकरच्या विरोधात आपले मत मांडले.

# राहुल गांधी यांनी घेतली हाथरस पीडितांची भेट

## पक्षातर्फे सहकार्य करण्याचे आश्वासन

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**



काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशातील हाथरस येथे झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. राहुल गांधी शुक्रवारी सकाळीच अलिगडमध्ये पोहोचले. त्यानंतर त्यांनी पिलखाना गावात लोकांची भेट घेतली. बैठकीनंतर पीडितेच्या कुटुंबाला पक्षाच्यावतीने मदत करणार असल्याचे आश्वासन राहुल गांधी यांनी यावेळी दिले.

यावेळी राहुल गांधी यांनी, आम्ही पक्षाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत तुम्हाला करू, असे पीडितांना आश्वासन दिले. त्यांनी अजून कोणती मदत करणार हे सांगितले नाही, पण संपूर्ण मदत करणार असल्याचे पीडितेच्या कुटुंबीयांनी सांगितले. काँग्रेसने सोशल मीडियावर लिहिले की, आज विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हाथरस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. हाथरसमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत १०० हून अधिक लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक लोक जखमी झाले आहेत. उत्तर प्रदेशातील हाथरस चेंगराचेंगरीच्या घटनेप्रकरणी आतापर्यंत सहा जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि सेवेकरीवर पोलिसांनी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. पोलिसांनी याबाबत माहिती दिली. अलिगड विभागाचे पोलिस महानिरीक्षक शलभ माथूर यांनी येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, हरिनारायण साकार विश्वहारी उर्फ ??भोले बाबा यांच्या सत्संगात झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी आतापर्यंत दोन महिला सेविकांना अटक करण्यात आली आहे. हातरसमधील सिकंदरराव परिसरातील फुलराई गावात आयोजित केलेल्या कारवाईत त्याच्यासह सहा जणांना अटक करण्यात आली आहे.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ५ जुलै रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात देशाच्या शूर सुपुत्रांना कीर्ती चक्र आणि शौर्य चक्राने सन्मानित केले. संरक्षण गुंतवणूक समारंभ (फेज-१) दरम्यान सशस्त्र दल, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश पोलिसांना १० कीर्ती चक्र (सात मरणोत्तर) आणि २६ शौर्य चक्र (सात मरणोत्तर) प्रदान केले. विशेष शौर्य, अदम्य साहस आणि कर्तव्याप्रती अत्यंत समर्पण दाखविल्याबद्दल हे पुरस्कार देण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अन्य मान्यवरांसमावेत सर्व पुरस्कार्थी.

# चंद्रशेखर आझाद यांचे मायावती अन् आकाश आनंद यांना आव्हान



**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

उत्तर प्रदेशातील नगीना लोकसभा मतदारसंघाचे खासदार चंद्रशेखर आझाद यांनी बहुजन समाज पक्षाच्या सुप्रीमो मायावती आणि पक्षाचे समन्वयक आकाश आनंद यांना मोठे आव्हान दिले आहे. बसपाला कमकुवत करत असल्याचा आरोपही नगीना खासदाराने फेटाळून लावला आहे.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत आझाद समाज पक्षाचे (कांशीराम) नेते आझाद म्हणाले की, मला शिवीगाळ करणे सर्वात सोपे आहे, परंतु माझे जीवन संघर्षांनी भरलेले आहे. मला छोटा माणूस म्हणणं सोपं आहे पण माझं जगणं अवघड आहे. मी स्वतः सर्व गरिबांच्या समस्या ऐकतो. भारतीय राजकारणात आज मी एकमेव अशी व्यक्ती आहे की ज्याने बुलेट घेतली आहे. मी हजारो प्रकरणांमध्ये लोकांना भेटलो आहे. त्याने (आकाश आनंद) मला जे काही सांगितले त्याबद्दल धन्यवाद. तो खूप तरुण आहे. त्यांची राजकारणात नवीन एंट्री झाली. कांशीराम आणि मायावती यांच्यात संघर्ष झाला तेव्हा त्यांचा अपमान झाला. बसपाला कमकुवत केल्याच्या आरोपावर चंद्रशेखर म्हणाले की, मी फक्त २ जागांवर निवडणूक लढवली होती. उरलेल्या ७८ जागांवर तुम्ही काय चमत्कार केला. बसपवाले म्हणतायत की मी वाटून घेतोय. मी ज्या जागेवर निवडणूक लढवतो, त्या जागेवर मी मतं कापतो, असं ते म्हणतात. पण बाकीचे काय करत आहात? बसपा कमकुवत होण्यामागचे कारण स्पष्ट करताना आझाद म्हणाले की, कांशीराम यांच्या काळात जमिनीवर आंदोलन झाले होते. लोकांचे ऐकले होते. आता कदाचित हे होत नसेल. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आझाद समाज पक्ष कांशीरामने यूपीमधील नगीना आणि डुमरियागंज या दोन जागांवर निवडणूक लढवली होती. यापैकी एक जागा जिंकली.

# काँग्रेस नेत्याच्या घरात होतोय काळी जादू?

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

केरळ काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि कन्नूरचे खासदार के. सुधाकरन यांच्या अधिकृत निवासस्थानी काळ्या जादूची सामग्री सापडल्याचा एक कथित व्हिडिओ गुरुवारी सोशल मीडियावर व्हायरल झाला. काही लोक खासदारांच्या निवासस्थानी पुरलेल्या काळ्या जादूच्या वस्तू बाहेर काढत असल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. या व्हिडिओमुळे सुधाकरन यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

या व्हायरल व्हिडिओबाबत के सुधाकरन म्हणतात की, हा व्हिडिओ जुना आहे. या व्हिडीओमुळे तो कोणत्याही प्रकारच्या धमकीला घाबरत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये ज्योतिषी दिसत आहेत, विशेष म्हणजे पक्षाच्या मुख्यालयातही असे साहित्य सापडले आहे. याबाबत सुधाकरन यांनी आपल्यालाही याबाबत माहिती मिळाल्याचे सांगितले आहे. दुसरीकडे उन्नीथनने या व्हिडिओवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. के सुधाकरन यांच्या घराचा जो व्हिडिओ व्हायरल होत आहे, ती व्यक्ती ज्योतिषी आहे. व्हिडिओमध्ये हा माणूस काही थेयम मूर्तींमधून राख आणि इतर रंगीत पावडर काढताना दिसत होता, ज्यांचा वापर काळ्या जादूच्या विधीसाठी केला जात होता. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये एका माणसाचा आवाज ऐकू येत आहे की, हे सर्व साहित्य काळ्या जादूसाठी आहे. हे तुमचे डोके फिरवेल. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच विविध प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

काँग्रेसचे विचारवंत चेरियन फिलिप यांनी फेसबुक पोस्ट लिहून म्हटले आहे की, या आधुनिक वैज्ञानिक युगात अंधश्रद्धा आणि काळ्या जादूवर विश्वास ठेवणारे आणि त्यांचे पालन करणारे लोक भ्याड आहेत. केरळ समाजाने अंधश्रद्धा आणि वाईट प्रथा नाकारल्याचं काँग्रेसच्या विचारवंतांनी म्हटलं आहे. जे अजूनही जादूटोणा आणि इतर गैरकृत्ये करतात ते फक्त गुन्हेगार आहेत.

# तरुणाने सापाचा दोनदा चावा घेतला, सापाचा झाला मृत्यू

**वृत्तसंस्था/पाटणा**

सापाने चावा घेतल्यानंतर माणसाचा मृत्यू होतो, हे आपण ऐकलं असेल. पण माणसाने चावा घेतल्यानंतर सापाचा मृत्यू व्हावा, हे खरं वाटणार नाही. पण बिहारमध्ये अशी एक घटना घडली आहे. बिहारच्या नवादा जिल्ह्यातील राजौली येथे एका रेल्वे कर्मचारी असलेल्या युवकाचा सापाने चावा घेतला. स्वतःचा जीव वाचविण्यासाठी तरुणानेही त्या सापाचा दोन वेळा चावा घेतला. त्यानंतर सापाचा मृत्यू झाला. ही बातमी पसरल्यानंतर आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. संतोष लोहार (३५) असे या रेल्वे कर्मचा-्याचे नाव आहे. राजौलीच्या जंगल परिसरात रेल्वे ट्रॅक टाकण्याचे काम सुरु असून संतोषही या कामासाठी इथे आला होता. मंगळवारी (२ जुलै) रात्री जेवण करून तो झोपला असताना सापाने त्याचा चावा घेतला. साप चावल्यामुळे जागा झालेला संतोषने सापाला पकडून त्याचा दोनदा चावा घेतला. असं केल्याने आपल्या शरीरातील विष पुन्हा सापाच्या शरीरात जाऊ शकते, अशी त्याची धारणा होती. सापाचा चावा घेतल्यानंतर सापाचा तिथेच मृत्यू झाला.

# आसाममध्ये पुरामुळे आतापर्यंत ५६ जणांचा मृत्यू

## १७ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा, काश्मीरमध्ये उष्णतेची लाट

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. उत्तराखंडमधील गंगोत्री-गोमुख ट्रॅकवरील चिरबासा ओढ्याला आलेल्या पुरामुळे त्यावर बांधलेला लाकडी पूल तुटला. या नाल्यात गुरुवारी दिल्लीतील सूरज आणि मोनू नावाचे दोन कावडधारी वाहून गेले.

गंगोत्रीपासून नऊ किलोमीटर अंतरावर ही घटना घडल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हिमनदी वितळल्याने ओढ्याच्या पाण्याची पातळी अचानक वाढली. उत्तरकाशीचे जिल्हा दंडाधिकारी मेहरबान सिंग बिश्त यांनी गंगोत्री राष्ट्रीय उद्यानाच्या उपसंचालकांना कानवाडी शोधून चिरबासा येथे नवीन पूल बांधण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचवेळी आसाममध्ये आलेल्या पुरामुळे गुरुवारी ८ जणांचा मृत्यू झाला, त्यामुळे आतापर्यंत मृतांची संख्या ५६ झाली आहे. २९ जिल्ह्यांतील २१.१३ लाख लोकांना पुराचा फटका बसला आहे. काझीरंगा राष्ट्रीय उद्यानातील पुरात बुडून आतापर्यंत एकूण ३१ प्राण्यांचा मृत्यू झाला आहे, तर ८२ प्राण्यांना पुरातून वाचवण्यात यश आले आहे. हवामान विभागाने जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, सिक्कीम, उत्तर पश्चिम बंगाल, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, आसाम, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम, महाराष्ट्र अशा १७ राज्यांमध्ये इशारा जारी केला आहे. गोव्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. हरियाणा, चंदीगड, दिल्ली, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड, राजस्थान, गुजरात, कर्नाटक, केरळ या ११ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांत देशाच्या वायव्य आणि ईशान्य राज्यांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे, देशात मान्सूनच्या पावसाची तूट ३० जून रोजी ११ टक्केवरून ४ जून रोजी केवळ ३ टक्के इतकी कमी झाली आहे. १ जूनपासून सुरू झालेल्या चार महिन्यांच्या पावसाळ्यात आतापर्यंत १९६.९ मिमी पावसाच्या तुलनेत १९०.६ मिमी पाऊस झाला आहे.

# सुरजीत कौरचा 'यू-टर्न'

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

पंजाबच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असलेला अकाली दल पक्ष राज्यात आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहे. त्याचवेळी दोनवेळा नगरसेवक राहिलेल्या सुरजीत कौर यांनी अनेक राजकीय पक्ष बदलल्याने अनेक चढउतार झाले. सकाळपर्यंत त्या अकाली दलाच्या उमेदवार होत्या. त्यानंतर त्या आम आदमी पक्षाच्या नेत्या झाल्या. हे सगळं करत असताना जालंधर पश्चिम पोटनिवडणुकीत लढण्यासाठी त्यांनी संध्याकाळपर्यंत अकाली दलात परतल्या. जालंधर पोटनिवडणुकीसाठी अकाली दलाच्या उमेदवार सुरजित कौर यांच्यासाठी मंगळवार हा गोंधळाचा दिवस होता. कारण १० जुलै रोजी होणाऱ्या जालंधर पश्चिम विधानसभा पोटनिवडणुकीपूर्वी त्या कठीण राजकीय क्षेत्रात उतरण्याचा प्रयत्न करत होत्या. दरम्यान, शिरोमणी अकाली दलातील सततच्या अंतर्गत संघर्षादरम्यान, दोन वेळा नगरसेवक राहिलेल्या कौर यांनी पक्षाच्या उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह 'तकडी' प्राप्त केले. त्याच वेळी शिरोमणी अकाली दलाने अधिकृतपणे सांगितले होते की, ते एससी-राखीव मतदारसंघात बहुजन समाज पक्षाला पाठिंबा देईल. तर, सुरजीत कौरच्या जवळीकतेमुळे एसएडीने तिच्याशी संबंध तोडले.

# इंफाळमध्ये निर्माणाधीन धार्मिक स्थळावर गोळीबार

## केंद्रीय दलाचे पथक तैनात : मणिपूरमध्ये १४ महिन्यांपासून सुरू आहे हिंसाचार

**वृत्तसंस्था/इंफाल**

मणिपूरमधील इंफाळमध्ये शुक्रवारी एका निर्माणाधीन धार्मिक स्थळाला हल्लेखोरांनी लक्ष्य केले. पॅलेस कंपाऊंडमधील धार्मिक स्थळावर रात्री १२. ३० च्या सुमारास हल्लेखोरांनी गोळीबार केला. या घटनेत सहभागी असलेल्यांची ओळख अद्याप पटलेली नाही.

गोळीबार झालेल्या धार्मिक स्थळाच्या सुरक्षेसाठी केंद्रीय दलाचे एक पथक तैनात करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या हल्ल्यात एकाही जवानाला इजा झाली नाही ही दिलासादायक बाब आहे. या घटनेनंतर परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी राज्यसभेत सांगितले होते की, मणिपूरमध्ये हिंसाचार सातत्याने कमी होत आहे. केंद्र आणि राज्य सरकार शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. ११ हजारहून अधिक एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. ५०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर दोन दिवसांनी राज्यात पुन्हा गोळीबाराची घटना घडली आहे. राज्यातील मैतेई आणि कुकी-झोमी जमातींमध्ये ३ मे २०२३ पासून तणाव सुरू आहे. या हिंसाचारात आतापर्यंत २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. ६५ हजारांहून अधिक लोकांनी घरे सोडून इतरत्र आश्रय घेतला आहे. मणिपूरचे लोक गेल्या १४ महिन्यांपासून शांतता प्रस्थापित होण्याची वाट पाहत आहेत. संपूर्ण मणिपूर दोन भागांमध्ये विभागले गेले आहे, मैतेई आणि कुकी. अनेक मैतेई स्त्रिया आपल्या गावाचे रक्षण करण्यासाठी रात्रभर जागे राहतात, तर कुकीबहुल भागात सरकारी काम काही महिन्यांपासून ठप्प आहे. मणिपूरमध्ये इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, बिष्णुपूर, कक्चिंग आणि थौबल व्हॅली प्रदेश असे ५ जिल्हे आहेत. या पाच जिल्ह्यांचा सीमावर्ती भाग अजूनही असुरक्षित आहे. इम्फाळ खोऱ्यात राहणाऱ्या लोकांना इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील फयेंग आणि सेकमाई भाग, इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील यिंगंगपोकपी भागाच्या पलीकडे जाण्यास मनाई आहे. त्याचप्रमाणे बिष्णुपूर जिल्ह्यातील फौगाकचाओ इखाई आणि थौबल जिल्ह्यातील येरीपोक परिसरात जाण्यास मनाई आहे. कुकी क्षेत्र या पलीकडे सुरू होते. येथील लोकांवर अनेकदा तुरळक हल्ले होतात.

# तेलंगणामध्ये काँग्रेसकडून चंद्रशेखर राव यांना धक्का

## खासदारानंतर ६ आमदारही फोडले

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**



चंद्रशेखर राव

तेलंगणामध्ये गतवर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समिती पक्षाचा अनपेक्षित आणि धक्कादायक पराभव झाला होता. तेव्हापासून त्यांच्या पक्षाला मोठ्या प्रमाणावर गळती लागली असून, अनेक नेते आणि लोकप्रतिनिधी पक्ष सोडत आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत बीआरएसला राज्यात एकही जागा जिंकता आली नव्हती. त्यानंतर आता राज्यातील सत्ताधारी असलेल्या काँग्रेसने बीआरएसला खिंडार पाडण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, बीआरएसच्या सहा विधान परिषदेतील आमदारांनी नुकताच पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

बीआरएसच्या या सहा आमदारांना गुरुवारी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी या आमदारांना काँग्रेसचे सदस्यत्व बहाल केले. के. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएसला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेसमध्ये आलेल्या सहा आमदारांमध्ये दांडे विठ्ठल, भानू प्रसाद राव, एम. एस. प्रभाकर, बोग्गरापू दयानंद, येग्गे मल्लेशम आणि बसवराजू सरैया यांचा समावेश आहे. काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यासाठी बीआरएसचे आमदार मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या निवासस्थानी आले तेव्हा काँग्रेसच्या तेलंगणाच्या प्रभारी दीपा दासमुंशी आणि इतर नेते उपस्थित होते. दरम्यान, मागच्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर बीआरएसचे सहा आमदार काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. तसेच आणखी काही आमदार सत्ताधारी पक्षात दाखल होऊ शकतात. दोन दिवसांपूर्वीही बीआरएसला मोठा धक्का बसला होता. तेव्हा बीआरएसचे दिग्गज नेते आणि राज्यसभा खासदार के. केशव राव काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. नवी दिल्लीमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसेच रेवंत रेड्डी यांच्या उपस्थितीत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.

# राशिभविष्य

**मेष**
आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी. जवळच्या व्यक्तीकडून फसवणूक संभवते. विचाराने रहावे.

**वृषभ**
घरगुती प्रश्न सुटतील. मुलांची चिंता सतावेल. स्थापत्य, कला क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील.

**मिथुन**
प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. उपजत कला-गुणांचा विकास होईल. प्रकृतीची काळजी घ्या.

**कर्क**
महत्त्वाच्या कामात अडचणी येतील. खर्चाचे प्रमाण वाढेल. व्यवसायात साधारण स्थिती राहील.

**सिंह**
कामांमध्ये दिलासा मिळेल. अचानक धनलाभ संभवतो. गुंतवणूक विचाराने करायला हवी.

**कन्या**
दिलासादायक घटना घडतील. नोकरीत कामाची प्रशंसा होईल. आत्मविश्वास वाढीस लागेल

**तुळ**
ओळखी नव्याने कामी येतील. कामानिमित्त छोटा-मोठा प्रवास घडेल. मुलांची प्रगती होईल.

**वृश्चिक**
आर्थिक व्यवहार लाभदायक ठरतील. जुनी येणी सहज वसूल होतील. कार्याचा विस्तार होईल.

**धनु**
महत्त्वाच्या संधी लाभणार आहेत. कौटुंबिक समाधान राहील. धार्मिक कार्याची संधी मिळेल.

**मकर**
महत्त्वाच्या घडामोडी घडतील. अचानक धनलाभाचे योग आहेत. सरकारी कामे मार्गी लागतील.

**कुंभ**
नोकरीत नव्या जबाबदारी येतील. इतरांकडून कौतुक होईल. व्यवसायात बदल सध्याच करू नये.

**मीन**
खर्च टाळावा. खरेदीचे व्यवहार लांबणीवर पडतील. स्थावर तसेच वाहनसौख्य लाभेल.

# बाळंतिणीची काळजी

**आरोग्यमंत्र**

बाळ आणि बाळंतिणीची काळजी घेणं ही अत्यंत आवश्यक बाब आहे. मात्र अलिकडे शेक-शेगडी घ्यावी की नाही याबाबत संभ्रम आढळतो. तो दूर करण्यासाठी काही बाबी जाणून घ्यायला हव्या. उदाहरणार्थ हल्ली वर्किंग वूमन्स शेक शेगडी घेण्यास नाखूष असतात. मात्र पुढे जाऊन त्यांना संधिवात, आमवात, हातापायांना मुंग्या येणं, अंग दुखणं, डोकं दुखणं आदी तक्रारींचा सामना करावा लागतो.


- गर्भ राहणं, तो रूजणं, त्याची योग्य वाढ होणं, योग्य त्या वेळेस प्रसूती, ती देखील सुलभ होणं यासाठीचे पूर्ण नियमन करणारा अपान वायू हा वायूचा प्रकार कंबरेच्या आणि कंबरेच्या खालील अवयवांचं नियंत्रण करतो. बाळंतपणानंतर बिघडलेला वात सुस्थितीत आणण्यासाठी शेक शेगडी घेणं गरजेचं असतं.
- वाताचा शीत आणि रूक्ष गुण मारण्यासाठी स्निग्ध तेलाचं मालिश आणि उष्ण स्वेद द्यावा लागतो. म्हणूनही शेक शेगडी आवश्यक ठरते.
- बाळंत स्त्रीने बाळंतपणाच्या सव्वा महिन्यानंतर दररोज वेदनारी तेल आणि तनुत्वक तेल एकत्र करून पूर्ण शरीरास मालिश करावं. नंतर आंघोळ करावी. आंघोळीच्या पाण्यात कडूलिंब, निर्गुडीचा पाला टाकावा. या पाण्याने आंघोळ केल्यामुळे ओटीपोट, पाठ, कंबर आणि पूर्ण शरीरातला वात कमी होतो.

# अमृतातले विष

नद्या, झरे पाहायला खूप छान वाटतं. झुळझुळत्या पाण्यात हात घालायला आपल्याला आवडतं. पण जगात असे काही जलाशय आहेत जिथलं पाणी विषारी मानलं जातं तर काही ठिकाणच्या पाण्याचं तापमान प्रचंड आहे. अशाच काही जलाशयांची ओळख करून घेऊया...

**महत्त्वपूर्ण काही**

- कॅरेबियन देश असलेल्या डॉमिनिकामध्ये द बॉयलिंग लेक नावाचा तलाव आहे. हा तलाव खूप धोकादायक आहे. या पाण्याचं तापमान १९४ अंश फॅरेनहाइट इतकं आहे. या पाण्यात माणूस भाजून निघू शकतो.
- स्पेनमधल्या रिओ टिंटो या तलावाच्या पाण्यात आम्लाचं प्रमाण बरंच जास्त आहे. या पाण्याचं तापमान मंगळ ग्रहाइतकं असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.
- टांझानियामध्ये लेक नॅट्रॉन आहे. इथलं पाणी प्रचंड उष्ण आहे. यात मीठ आणि सोडा यांचं मिश्रण आहे.
- मॉंटानामध्ये द बेकेर्ली पीट हे ठिकाण आहे. या पाण्यात आम्ल आणि बरीच रसायनं आहेत.
- इंडोनेशियातली सिटॅरम ही जगातली सर्वात प्रदूषित नदी आहे. यात बरीच रसायनं असल्याने ते पिण्यायोग्य नाही.



# स्मार्ट शॉपिंग

काही कारणाने घराच्या खिडक्या बदलण्याची वेळ आली तर सध्या बाजारात हाय-टेक आणि वैविध्यपूर्ण खिडक्यांचे प्रकार बघायला मिळत आहेत. बरेचजण ॲल्युमिनियम विंडोजना प्राधान्य देतात. मात्र कमी किंमत या एका सकारात्मक बाबीव्यतिरिक्त त्यात फारसं काही वेगळं बघायला मिळत नाही. अतिगरम अथवा अतिथंड तापमानात साह्यभूत ठरणारा कोणताही बदल ॲल्युमिनियमच्या खिडक्यांमुळे साध्य होत नाही. तसंच यामुळे बाहेरुन येणारा आवाजही प्रतिबंधित होत नाही. त्यामुळे अशा खिडक्या बसवायच्या का, याचा अवश्य पुनर्विचार करावा.



## दिनवेध

- १८३७ : प्राच्यविद्या संशोधक, संस्कृत पंडित डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा जन्म
- १८८१ : प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांचा जन्म.
- १८९७ : साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म.
- १९०१ : भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म.
- १९०५ : राष्ट्रसेविका समितीच्या संस्थापिका लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर यांचा जन्म
- १९३७ : इंग्लिश क्रिकेट खेळाडू टोनी लुईस यांचा जन्म
- १९४६ : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांचा जन्म
- १९४६ : अमेरिकन अभिनेता सिल्व्हेस्टर स्टॅलोनचा जन्म
- १९८६ : माजी उपपंतप्रधान जगजीवनराम यांचे निधन
- २००२ : उद्योगपती धीरुभाई अंबानी यांचे निधन.

**फोकस...**



धीरूभाई अंबानी (२८ डिसेंबर १९३२ - ६ जुलै २००२) हे भारतीय उद्योजक होते. गरिबीतून वर येऊन त्यांनी आपल्या चुलतभावासोबत रिलायन्स उद्योग समूह स्थापला. सार्वजनिक घोषित केलेली रिलायन्स कंपनी विस्तारत जाऊन २००७साली अंबानी कुटुंबीयांची मालमत्ता ६० अब्ज डॉलर झाली. धीरूभाई यांचा जन्म गुजरात राज्यातील सौराष्ट्रच्या जुनागढ जिल्ह्यातील चोरवाड या गावी झाला. त्यांचे वडील हिराचंद हे प्राथमिक शाळेत शिक्षक होते तर आई जमनाबेन या गृहिणी होत्या. धीरूभाई शिक्षणात सर्वसामान्य विद्यार्थी होते. त्यांचे इंग्रजीचे ज्ञान चांगले तर गणित कच्चे होते. १९४९ साली आपले १०वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून धीरूभाई नोकरीच्या शोधात एडन येथे गेले. तेथे बर्मा शेल कंपनीची उपकंपनी म्हणून काम करणाऱ्या कंपनीत धीरूभाई पेट्रोल पंपावर नोकरी करू लागले. ही कंपनी आंतरराष्ट्रीय कंपनीचा भाग असल्याने तेथे अनेक देशांचे व्यापारी येत असत. तेथेच धीरूभाई यांनी स्वतःची रिफायनरी स्थापन करावी, असे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली. धीरूभाई त्यांचे वडीलबंधू रमणिकलाल यांच्यासह एडनमध्ये राहत. गुजराती लोकांची आवडनिवड या दोघा भावांना माहीत असल्याने त्यांनी गुजराती खाद्यपदार्थ भारतातून मागवून ते पदार्थ एडनला विकण्यास सुरू केले. यामुळे ओळखी वाढत गेल्या आणि धीरूभाईंना प्रत्येकाकडून काहीतरी माहिती मिळत गेली. त्यामुळे त्यांना धंद्याचे गणित मांडता येऊ लागले. आपल्या हुशारी, मेहनत, चिकाटी या गुणांच्या जोरावर धीरूभाई कारकून ते सेल्स मॅनेजर या पायऱ्या चढून गेले. आपल्या कामापुरते अरबी भाषेवर प्रभुत्वही धीरूभाईंनी मिळविले होतेच. अनेक मित्रही जोडले. विवाहानंतर धीरूभाई आणि कोकिलाबेन यांनी एडनला संसार थाटला. लग्नानंतर तीन वर्षांनी मुकेश यांचा जन्म झाला. धीरूभाईंना आधीपासूनच दुसऱ्याची नोकरी करण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय असावा असे वाटत होते. आपला स्वतंत्र व्यवसाय भारतातच उभा करावा हेही धीरूभाईंनी पक्के केले. शेवटी ३१ डिसेंबर १९५८ला धीरूभाईंनी एडन कायमचे सोडून दिले आणि ते आपल्या कुटुंबीयांसह भारतात परतले. त्यांनी रिलायन्स कमर्शियल कॉर्पोरेशनची स्थापना केली आणि ते मसाले आणि रेयॉन कापडाचा व्यवसाय करू लागले. १९६६ साली धीरूभाई यांनी अत्याधुनिक टेक्स्टाईल मिलची सुरुवात केली. हे पाऊल त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. धीरूभाईंनी आपले कापड रशिया, सौदी अरेबिया, पोलंड, झांबिया, युगांडा इ. देशांमध्ये निर्यात करण्यास सुरुवात केली. १९७७ साली धीरूभाईंनी रिलायन्सचे रूपांतर पब्लिक लिमिटेड कंपनीत केले. लहान गुंतवणूकदारांकडून भागभांडवल गोळा करणारे धीरूभाई भारतातील पहिले उद्योगपती ठरले. १९७८ साली धीरूभाई कापड व्यवसायात पूर्णपणे उतरले. त्यांनी विमल या नावाने कापड विक्रीस सुरुवात केली. पुढे ते यशोशिखरावर चढले. ६ जुलै २००२ रोजी धीरूभाई यांचे निधन झाले.

- २००६ : भारत व तिबेटमधील नथु ला खिंड व्यापारास खुली.
- २०१३ : अभिनेता हृतिक रोशनच्या मेंदूवरील शस्त्रक्रिया यशस्वी.
- २०१७ : अनधिकृत इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहार झाल्यास तीन दिवसांच्या आत तक्रार दाखल करण्याची रिझर्व्ह बॅंकेची सूचना.

## हे गुणगुणा

जीवनगाणे गातच रहावे
झाले गेले विसरुनी जावे, पुढे-पुढे चालावे
जीवनगाणे गातच रहावे !

सात सुरांचा हा मेळा व्यापुन उरला विश्वाला
हृदये हलता वर-खाली ताल मिळे या गाण्याला
तुमच्या-माझ्या श्वासांमधुनी आकारा यावे
जीवनगाणे गातच रहावे !

चिमणाबाई हिरमुसली, गाल फुगवुनी का बसली?
सान बाहुली ही इवली, लटकी-लटकी का रुसली?
रुसली-रुसली खुदकन हसली, पापे किती घ्यावे !
जीवनगाणे गातच रहावे !

मातीमधुनी अंकुरली चैतन्याची दीपकळी
आनंदाने थरथरली कधी अंतरी गहिवरली
या मातीला या प्रीतीला हितगुज सांगावे
जीवनगाणे गातच रहावे !

**गीत - शांता शेळके**
**संगीत - राम-लक्ष्मण**
**स्वर - उषा मंगेशकर, महेंद्र कपूर**
**चित्रपट - आपली माणसं**

# पावसाळ्यातील पेहराव

**सल्ला मोलाचा**

कोणत्याही मोसमात योग्य प्रकारचे कपडे घालणं हे बाहेर जाणं-येणं, सुलभ हालचाली आणि कामकाजाच्या दृष्टीनं आत्यंतिक महत्त्वाचं ठरतं. पावसाळ्यातील पेहरावासाठी पॉलिस्टर कापडाचा जरूर वापर करावा. पॉलिस्टरचे कपडे चुरगाळत नाहीत. धुणं आणि वाळवणं या दृष्टीनेही ते सोयीचे असतात. सौम्य रंगाचे किंवा पेस्टल शेड्सचे कपडे वापरणं टाळा. फॉर्मल शर्ट आणि पँट आणि त्यावर क्लासिक ट्रेंच कोट हा पावसाळ्यासाठी सर्वच दृष्टींनी सोयीचा पेहराव ठरतो. ट्राऊजरचा विचार करताना गडद रंगाची निवड करा. या दिवसात जीन्स टाळा. त्यांच्यावर घाणेरडं पाणी वाळून डाग लगेच दिसतात आणि त्या जड बनतात.



भारतीय पोशाखामध्ये सलवार आणि पतियाळाऐवजी शॉर्ट कुर्ते आणि गडद लेगिन्स किंवा चुडीदारचा वापर करा. लांब दुपट्ट्याऐवजी नरम, सुती स्कार्फचा वापर करा. गडद काळा रंग हा पावसाळ्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. काळी लेगीन्स आणि वर वेगळ्या रंगाचं डिझाईन असलेला काळा कुर्ता आणि स्कार्फ हा पेहराव एकदम उठून दिसतो.

# एनडीएच्या विश्वात

**करिअरवाटा**

एनडीएत प्रवेश मिळवणं हे अनेकांचं स्वप्न असतं. प्रयत्नांती ते पूर्ण होतं. त्यामुळे सर्वप्रथम त्यादृष्टीने प्रयत्न करायला हवेत. इथे विद्यार्थ्यांना तीन वर्षे पदवीचा अभ्यासक्रम शिकवला जातो. त्याशिवाय लष्कराशी संबंधित असणारे विषयही शिकवले जातात. एनडीएचा अभ्यासक्रम पूर्ण करणारा विद्यार्थी नंतर त्या-त्या दलामध्ये परमनंट कमिशन्ड अधिकारी म्हणून दाखल होऊ शकतो.

एनडीएमधलं पदवीचं शिक्षण दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीशी संलग्न असतं. ही पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांपैकी पायदळातील अधिकाऱ्यांना डेहराडूनच्या इंडियन मिलिटरी अकादमीमध्ये एक वर्षाचं प्रशिक्षण घ्यावं लागतं. नौदलाशी संबंधित विद्यार्थ्यांना कोचीन इथल्या आयएनएस कृष्णा तळावर प्रशिक्षण घ्यावं लागतं आणि वायूदलात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना हैदराबादेत एअरफोर्स ट्रेनिंग अकॅडमीमध्ये ट्रेनिंग घ्यावं लागतं. ते पूर्ण झाल्यानंतरच त्यांची कमिशन्ड अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. लष्करात अधिकारी होण्यासाठी केवळ एनडीए हाच मार्ग नाही, तर कोणतीही पदवी घेतल्यानंतर चेन्नई येथील ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी या संस्थेची परीक्षा देऊनही लष्करात अधिकारी म्हणून भरती होता येतं.

## खेचाखेची

**मराठीच्या सरांना बोलव!**

एका मुलीचा पाय घसरतो आणि
ती पाण्यात पडते.
**मुलगी:** मला वाचवा... मला वाचवा!
**मुलगा:** थांब! मी आत्ता रस्सी टाकतो.
**मुलगी:** टाकतो नाही रे,
फेकतो म्हणावं आणि रस्सी नाही दोरी म्हणावं.
**मुलगा:** असं कर,
तुझ्या मराठीच्या सरांना बोलव. मी जातो.

## पंचांग

**शनिवार, ६ जुलै २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६
आषाढ शु. १, नक्षत्र : पुनर्वसू
चंद्रराशी : मिथुन, व्याघात योग
सूर्योदय : ६.०९, सूर्यास्त : ७.१८

## फॉरवर्ड्स

प्रेमी जीव एकमेकांचे अंतरंग
वाचत असतात.
मुडे मुडे से हैं किताब-ए-इश्क के पन्ने,
वो कौन शख्स हैं जो हमें हमारे बाद पढता हैं


# किती काळ वापरणार प्रसाधने?

**जाणून घ्या**

कोणतंही सौंदर्यप्रसाधन वापरण्यायोग्य असण्याचा ठराविक काळ असतो. त्यानंतर त्याचा वापर थांबवायला हवा. मात्र ही दक्षता घेतली नाही तर त्वचेवर रॅशेस येण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणतंही प्रसाधन एक्सपायरी डेट उलटून गेल्यानंतर वापरू नये.

- तीन ते सहा महिने- कोणतंही लिक्विड मेकअप प्रसाधन तीन ते सहा महिन्यांमध्ये संपवावं. यामध्ये लिक्विड फाउंडेशन, आयलायनर, मस्कारा, काजळ इत्यादींचा समावेश होतो. जास्त काळ राहिल्यास त्यांना बुरशी लागण्याची शक्यता असते.
- कोणत्याही प्रसाधनाचा वापर करण्याआधी हात स्वच्छ असणं गरजेचं आहे. कारण प्रसाधनांच्या माध्यमातून हातावरील जंतू त्वचेपर्यंत पोहोचतात आणि त्वचासंसर्गाचं कारण बनतात. क्रीम, सिरम किंवा तेलं विशिष्ट कालावधीनंतर ऑक्सिडाईज्ड होतात. अँटी एजिंग क्रीमही नऊ महिन्यानंतर खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा वस्तू वेळेआधी संपवणं इष्ट आहे.

# महाशब्दकोडे ६१०



**आडवी विधाने**-1) डोळ्याला पट्टी बांधून शिवाशिवी खेळण्याचा लहान मुलांचा एक खेळ 5) गुन्हेगारांच्या गुप्त बातम्या पोलिसांना पुरविणारा 7) शेतीबद्दल सरकारला देण्यात येणारा कर 10) एक सम संख्या 11) गायनातील सूर 12) मजला, मला 13) लगीनघाई, धांदल 16) एखादा विचार जर मनात घोळत असेल तर रात्री झोपेतसुद्धा तशाच प्रकारचे स्वप्न पडते या अर्थाची एक म्हण 18) श्रीविष्णूच्या अंशापासून निर्माण झालेले दोन ऋषी 20) दमयंतीचा प्रियकर 22) हे जग भयंकर प्रलय होऊन बुडणार अशी कल्पना 24) जातीचा गुण 25) ब्राम्हण 26) वेणु, अलगुजा 28) हिंदी भाषेत टोमॅटो 29) घ्यावयाची रक्कम ठरविणे 30) शहाजहानने तयार करविलेले रत्नजडित सिंहासन याच नावाचे एक योगासन सुद्धा आहे 32) थंड, गार 34) अनेकांनी मिळून केलेले 36) तरचा सोबती 38) एखाद्याची केलेली पर्वा, दुर्लक्ष 39) फायदा करून देणारे 41) हातचलाखी, नजरबंदी 42) फुलझाडांवर भ्रमण करून फुलांमधील रस गोळा करणारा 45) फळाच्या आतील मगजदार भाग 46) श्रीमानचे संक्षिप्त रूप (एकाक्षरी) 48) ताप देणारा, सूर्य 49) बोभाटा,गुप्त गोष्टींचा बभ्रा होणे 50) वृक्षाभोवती बांधलेला ओटा 51) तबल्याचा साथीदार 52) आचार्य अत्रे लिखित एक तुफान विनोदी नाटक 54) नसते लचांड, घोटाळ्याचा प्रश्न 57) प्रखर उष्णतेने घशाला पडणारी...59) अग्निस अर्पण केलेले 60) पादुका 61) उंचीने कमी असलेला, ठेंगणा 62) एखाद्या कृत्याचा बरावाईट परिणाम 63) कापसाची एकवीस पदरांची वात 68) एक उंचच उंच वाढणारा वृक्ष 69) तुझे 70) संतुष्टी, समाधान 71) येणारे, प्राप्ती 73) या देवतेने व्यासांच्या महाभारत ग्रंथाचे लिखाण केले होते असे म्हणतात 75) पैसा 76) राजाचा आदेश 77) घरकामास असलेला नोकर 78) चिखलात उगविणारे एक सुंदर फूल 79) मध्ये खंड न पडता एकसारखी पडणारी पावसाची धार 80) कान

**उभी विधाने**-1) राजकीय किंवा औद्योगिक चळवळ 2) मेंढ्या पाळणारी एक जमात 3) कपडे शिवणारा 4) रात्र, निशा 6) बहुत करून, पुष्कळ अंशी 7) निधड्या छातीचा (हिं.) 8) गोड बोलणे, चार वेदांपैकी एक 9) सरकारात जमा होणारा कर, सारा वगैरे 11) अस्तित्वात नसणे 14) सुघटीतपणा, ऐक्य 15) फणसातील मगज 16) हातावर घड्याळ बांधण्याची जागा 17) लग्नकार्यासाठी जमलेली मंडळी 19) पति, नवरा, यज्ञकर्म करणारा 21) संप्रदायविषयक, परंपरागत 23) शिळ्या पदार्थावर चढणारा पांढरा थर 24) लग्नात वधू किंवा वराचा भाऊ 26) क्षुल्लक, तेजोहीन 27) हवा, पवन, वारा 28) एक प्रकारचे हलके रेशमी कापड 29) राहण्याचे ठिकाण, घर 31) आपल्या देशाचे अधिकृत प्रतिनिधीत्व परदेशात करणारा 33) पांढऱ्या फुलांचे एक फुलझाड 34) आकारयुक्त 35) चोप, ताडन 37) अपंग, पांगळा 40) छत्रपती शिवाजी महाराज आणि पेशव्यांचे निशाण 42) निराशा करणे 43) पाकिस्तानातील एक महत्वाचे शहर 44) वडिलांची साळी 47) त्वरीत, फार जलदीने, फटाफट 49) जनावरांचा चारा 50) विधवेचा दुसरा विवाह 53) हत्तीचा रक्षक 55) रानरेडा, रानगाय 56) अनेक दुकानांची जेथे रेलचेल असते आणि खरेदी विक्री चालते असे ठिकाण 58) जोराने चोळणे, मालिश करणे 64) शंभर 65) मंडलाकार भ्रमण पावणारा मोठा वारा 66) खुप, पुष्कळ, भरपूर 67) आज्ञा न पाळणे, अनादर 68) तोलण्याचे साधन, तराजू 71) रोग, व्याधी, दुखणे 73) राष्ट्रभाषेत संदेह, संशय 75) श्रीकृष्णाची सखी 76) महाभारतात कवचकुंडलांचे वरदान मिळालेला योद्धा

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



## आजचा मेन्यू

# भाजणीची चकली

**साहित्य :** चकली भाजणी, तीळ, ओवा, मोहन, हळद, तिखट, हिंग, तेल, मीठ, पाणी.

**कृती :** चकल्यांकरिता तीन वाटी भाजणी घेतली तर आठ चमचे तेल घ्यावे. एका पातेल्यात पाणी घेऊन उकळत ठेवावे. पाण्याला उकळी आली की त्यात मीठ, हिंग, ओवा, तेल, हळद, तिखट घालावे. उलथ्याने चांगले हलवून लगेच भाजणी घालावी व हलवून घ्यावे. त्यावर अर्धा तास झाकण ठेवून द्यावे. अर्ध्या तासाने भाजणी मळून घ्यावी. नंतर चकली पात्राने चकल्या पाडून घ्याव्यात व तेलात तळाव्यात.



# संरक्षण उत्पादनात झेप

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात २०२३-२४ या आर्थिक वर्षात १६.८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे संरक्षण उत्पादनाचे एकूण मूल्य १.२६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. मागील काही वर्षांपासून भारताच्या मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. या वाढीमुळे भारताची निर्यात क्षमतादेखील वाढली आहे. यात डिफेन्स क्षेत्राचाही मोठा वाटा आहे. भारताने २०२३-२४ मध्ये संरक्षण उत्पादनाच्या मूल्यात आतापर्यंतची सर्वाधिक वाढ नोंदवली आहे. २०२३-२४मध्ये संरक्षण उत्पादनांचे मूल्य १ लाख २६ हजार ८८७ कोटी रुपयांवर पोहोचले असून, हा आकडा मागील आर्थिक वर्षातील उत्पादन मूल्याच्या तुलनेत १६.८ टक्के अधिक आहे. क्षमता आणखी वाढवण्यासाठी आणि भारताला एक आघाडीचे जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून पुढे आणण्यासाठी सरकार वचनबद्ध आहोत. यामुळे देशाची सुरक्षा यंत्रणा तर वाढेलच, पण आपल्याला आत्मनिर्भर बनवेल, अशी आशा आहे.

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात २०२३-२४ या आर्थिक वर्षात १६.८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे संरक्षण उत्पादनाचे एकूण मूल्य १.२६ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. मागील काही वर्षांपासून भारताच्या मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. या वाढीमुळे भारताची निर्यात क्षमतादेखील वाढली आहे. यात डिफेन्स क्षेत्राचाही मोठा वाटा आहे. भारताने २०२३-२४ मध्ये संरक्षण उत्पादनाच्या मूल्यात आतापर्यंतची सर्वाधिक वाढ नोंदवली आहे. २०२३-२४मध्ये संरक्षण उत्पादनांचे मूल्य १ लाख २६ हजार ८८७ कोटी रुपयांवर पोहोचले असून, हा आकडा मागील आर्थिक वर्षातील उत्पादन मूल्याच्या तुलनेत १६.८ टक्के अधिक आहे.

केंद्र सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३५ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीसह १ लाख ७५ हजार कोटी रुपयांचे स्वदेशी संरक्षण उत्पादन साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तर, सरकारने २०२३-२४ या आर्थिक वर्षात २१ हजार कोटी रुपयांची संरक्षण निर्यात केली होती, जी मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ३२.५ टक्क्यांनी अधिक आहे. संरक्षण मंत्रालयाच्या नवोन्मेषी संरक्षण उत्कृष्टता उपक्रमातून (आयडेक्स) संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रातील जटिल आणि धोरणात्मक नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जात असून या योजनेसह अनेक अभिनव तंत्रज्ञान विकास प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले. अनेक पेलोड वाहून नेण्यासाठी सक्षम असलेल्या लघु उपग्रहाच्या रचना आणि विकासासाठी स्पेसपिक्सेल टेक्नॉलॉजीजसोबत आयडेक्स सहकार्य करीत आहे. आयडेक्सचा हा उपक्रम संरक्षण परिसंस्थेमध्ये एक निर्णायक टप्पा म्हणून उदयास आला आहे. संरक्षण उत्पादन विभागांतर्गत संरक्षण नवोन्मेषी संघटनेंतर्गत सुरू करण्यात आलेल्या आयडेक्सने आतापर्यंत डिफेन्स इंडिया स्टार्ट-अप चॅलेंजच्या ११ आवृत्त्या लाँच केल्या असून अलीकडेच नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी अभिनव तंत्रज्ञान विकास प्रकल्प सुरू केले आहेत. अगदी अल्पावधीतच आयडेक्सने संरक्षण क्षेत्रात अतिशय यशस्वीरीत्या स्टार्ट अ?सचा वाढत्या समुदायाला प्रोत्साहन देण्यात आघाडी घेतली आहे. आयडेक्स सध्या ४०० हून अधिक स्टार्ट-अ?स आणि एम एस एम ई क्षेत्रात कार्यरत आहे. आतापर्यंत दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या ३५ वस्तूंच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली, याशिवाय आयडेक्सने रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण केल्या आहेत आणि संरक्षण परिसंस्थेच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आयडेक्सच्या ऐतिहासिक ३५० व्या करारावर अलीकडेच स्वाक्षरी झाली. इलेक्ट्रो-ऑप्टिकल, इन्फ्रारेड, सिंथेटिक अपर्चर रडार आणि दीडशे किलोग्रॅमपर्यंत हायपरस्पेक्ट्रल पेलोड्स वाहून नेण्यासाठी सक्षम असलेल्या लघु उपग्रहाच्या डिझाइन आणि विकासासाठी स्पेसपिक्सेल टेक्नॉलॉजीज प्रा.लि.सोबत हा करार करण्यात आला आहे. आयडेक्सने डिसेंबर २०२२ मध्ये १५० व्या करारावर स्वाक्षरी केली होती. आणि अवघ्या १८ महिन्यांच्या कालावधीत आणखी एका करारावर स्वाक्षरी केली. पृथ्वीवरील निरीक्षणाबद्दल विस्तृत माहिती पाठवू शकतील अशा प्रकारचे उच्च-रिझोल्यूशन हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग उपग्रहांची निर्मिती आणि प्रक्षेपण या क्षेत्रात, स्पेसपिक्सेल टेक्नॉलॉजीज कार्यरत आहे. नव्या करारामुळे अंतराळसंबंधित स्पेस इलेक्ट्रॉनिक्समध्ये अधिकाधिक नवोन्मेषाला चालना मिळत आहे. याआधी मोठ्या उपग्रहांद्वारे पाठवण्यात येणाऱ्या अनेक पेलोड्सचा आकार आता कमी केला जात आहे. यामुळे आता मॉड्युलर छोटा उपग्रह आवश्यकतेनुसार अनेक लघु पेलोड्स एकत्रित करू शकेल जेणेकरून ते जलद आणि किफायतशीरपणे तैनात केले जातील तसेच उत्पादन सुलभता, कार्यक्षमता, अनुकूलता आणि पर्यावरणावर पडणारा कमी प्रभाव यासारखे लाभ देखील होऊ शकतील. देशाच्या संरक्षणविषयक धोरणात महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. अधिग्रहणांच्या स्वरूपात झालेला बदल; देशांतर्गत उत्पादनावर अधिक भर; भारतीय संरक्षण उत्पादन संस्था आणि संशोधन व विकास संस्थांमधील परदेशातील अधिग्रहण आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण संबंध आणि संरक्षण निर्यातीद्वारे निव्वळ सुरक्षा प्रदान करणारा देश म्हणून भारत उदयास येत आहे. भविष्यात भारतीय सशस्त्र सेना विभागांद्वारे आणि भारतीय तटरक्षक दलाद्वारे खरेदी केली जाणारी सर्व उपकरणे देशांतर्गत उद्योगातून मिळवावी लागतील.

# स्त्रियांना सुरक्षेची हमी प्रदान करावी

सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा झाली आणि राज्यातील समस्त महिलावर्ग कागदपत्रांची जमवाजमव करू लागला. योजनेचा अर्ज भरण्यासाठी मुदत वाढवून देण्यात आली असली, तरी आतापासूनच अर्ज घेण्यासाठी आणि भरण्यासाठी महिलांच्या रांगा लागू लागल्या आहेत. जन्मतारखेच्या सत्यतेसाठी जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा लागणार असल्याने अनेक विवाहित महिलांनी कागदपत्रांसाठी माहेरची वाट धरली आहे. नवीन सरकारी योजना सुरु करण्यात आली की काही पैशांच्या मोबदल्यात योजनेचे अर्ज भरून ते सरकारदरबारी जमा करण्यास साहाय्य करणारा दलालवर्ग कार्यान्वित होतो तसा या योजनेसाठीही तो कार्यरत झाला आहे. हा अर्ज ऑनलाईन पद्धतीने आपल्या स्मार्टफोनमार्फतही भरता येऊ शकतो याबाबत अनेकांना माहिती नसल्याने सेतू केंद्रांवर अर्ज भरण्यासाठी सध्या गर्दी होऊ लागली आहे.

या योजनेच्या अजासोबत हमीपत्र जोडण्यात आले आहे ज्यामध्ये या योजनेचा लाभ कोणती महिला घेऊ शकते याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. या हमीपत्रानुसार कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखाहून कमी असणारी महिलाच या योजनेचा लाभ घेऊ शकते. महिलेच्या कुटुंबातील कोणताही सदस्य आयकरदाता नसावा तसेच कुटुंबातील कोणताही सदस्य सरकार दरबारी कायमस्वरूपी किंवा कंत्राटी पद्धतीने सेवेत नसावा या प्रमुख सूत्रांसह अन्यही अनेक सूत्र हमीपत्रात नमूद करण्यात आलेली आहेत.

हमीपत्रातील सूत्रांना अनुसरून पात्र ठरणारी महिलाच या योजनेचा लाभ घेऊ शकणार असल्याने भरलेल्या अर्जांची पडताळणी करण्यासाठी पुढील बराच काळ सरकारला द्यावा लागणार हे जवळपास निश्चित आहे. केवळ दर महिन्याला १५०० रुपये मिळणार या अपेक्षेने आज अर्ज भरणाऱ्या महिलांपैकी अनेकांचे अर्ज येत्या काळात सरकारने प्रामाणिकपणे अर्जाची तपासणी केल्यास बाद होऊ शकतात. महिला मतदारांचा टक्का निवडणुकांच्या निकालावर मोठा परिणाम करत असल्याने लोकसभा निवडणुकीतील अपयश भरून काढण्यासाठी विद्यमान सरकारमधील पक्षांनी महिलांसाठी ही योजना आणल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून केला जात असून या योजनेमुळे पुढील काही काळ सरकारच्या तिजोरीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक भार पडणार असल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

रेवडी संस्कृतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच विरोध करत असतात. ह्यमुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनाह्ल म्हणजे रेवडीचे वाटप नाहीतर काय आहे असाही प्रश्न आज विरोधक विचारत आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्यावर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. हा आकडा महाराष्ट्रापेक्षा आकाराने आणि लोकसंख्येने अधिक असलेल्या राज्यांवरील कर्जापेक्षा कितीतरी अधिक आहे. राज्यात पावसाळा सुरु झाला असला, तरी राज्यातील बराच भाग आजही दुष्काळाचा सामना करत आहे. थोड्या थोडक्या कर्जासाठी शेतकरी मृत्यूला कवटाळत आहेत. बेरोजगारीचा प्रश्न आ वासून उभा आहे, अशा परिस्थितीत केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राज्याच्या तिजोरीवर भार टाकणे योग्य नसल्याचे मत अर्थतज्ञ व्यक्त करत आहेत. गरिबी रेषेखाली असणाऱ्या अनेक कुटुंबांतील महिला ज्यांना खऱ्या अर्थाने या योजनेची आज गरज आहे अशांकडे जन्माचे दाखले किंवा कधी शाळेतच न गेल्याने शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नसल्यास अशांना या योजनेचा लाभ घेता येणार का, हाही एक प्रश्नच आहे. काही राजकीय विश्लेषकांच्या मते केवळ शहरातील नव्हे तर आता ग्रामीण भागातील स्त्रियासुद्धा आर्थिकदृष्ट्या सबळ होऊ लागल्या आहेत. त्यामुळे आजच्या स्त्रीला सरकारकडून धनाची नव्हे तर सुरक्षेची हमी हवी आहे. राज्यातील महिला सुरक्षेचा प्रश्न दिवसागणिक गंभीर होत चालला आहे. आज कोणतेच क्षेत्र महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. लहान बालिकेपासून वयोवृद्धाही वासनांधांच्या अत्याचाराला बळी पडू लागल्या आहेत. शिक्षक, डॉक्टर, पोलीस, नातेवाईक ज्यांच्यावर कधीकाळी डोळे झाकून विश्वास ठेवला जात असे, अशांतील नराधम कधी जागा होईल याची शाश्वती नाही. स्त्री अत्याचाराच्या प्रकरणांत न्याय मिळण्याचे प्रमाण अल्प असून बदनामी मात्र मोठ्या प्रमाणात होते, त्यामुळे सरकारला स्त्रियांसाठी काही करायचेच असेल तर स्त्रीला सुरक्षेची हमी प्रदान करावी असे मत महिला विचारवंत व्यक्त करत आहेत. सरकारही यावर विचार करेल का ?

**जगन घाणेकर**
९६६४५५९७८०
घाटकोपर, मुंबई

## बालविवाह रोखण्यासाठी कडक कायदा हवा

**बालविवाह रोखण्यासाठी** कडक कायद्याची गरज आहे. राज्यांमध्ये अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बालविवाह रोखणे, असे विवाह झाले असतील तर त्याविरोधात पुरावे गोळा करणे, लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, बालविवाहाबाबत समुपादेशन करणे आदी गोष्टी या अधिकाऱ्यांना कराव्या लागत आहेत. त्याचबरोबर बालविवाहाची माहिती समोर आल्यास असा विवाह रोखण्याचे अधिकार न्यायदंडाधिकाऱ्यांनाही देण्यात आले. बालविवाहाचा थेट संबंध गरिबीशी आहे. याविरोधात अनेक जनजागृती मोहिमाही राबविण्यात आल्या. आसाममध्ये ज्या पाद्धतीने सक्तीची पावले उचलण्यात आली आहेत, त्यामुळे अशा विवाहांमध्ये कायदेशीर अडथळा निर्माण झाला आहे. अशा पारिस्थितीत लोक आणि धार्मिक नेत्यांना एक कायदेशीर मॅसेज मिळाला. यातून भीतीही निर्माण होईल आणि यामुळे असे विवाह थांबण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

**अजय पोहनकर**
अमरावती

# प्रदूषित हवा आरोग्यास घातकच

आपल्या उत्तम आरोग्यासाठी योगासने कशी महत्त्वाची आहेत हे आपल्या भारत देशाने संपूर्ण जगाला पटवून दिले जात असताना दुसरीकडे त्याच्या अगदी विरुद्ध परिस्थिती देशात असलेली पाहायला मिळते. आपल्या देशात २०२१ साली प्रदूषित हवेमुळे जवळपास एकवीस लाख लोकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक आकडेवारी अमेरिकेतील हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूट या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून समोर आले. वर्षभरामध्ये जर एवढे लोक वायुप्रदूषणाने मृत्युमुखी पडत असतील तर मग भारत सरकार किंवा त्या त्या राज्यातील सरकारे, आरोग्यविभाग यांना त्याची काहीच कल्पना नसणे ही बाब धक्कादायक ठरते. या अहवालातली अतिशयोक्ती जरी सोडून दिली तरी आज भारतात वायुप्रदूषण हे प्रचंड प्रमाणात वाढत आहे, ही बाब नाकारता येणार नाही. म्हणजे ज्या योगासनांचा आपण आग्रह धरतो. त्याच देशामध्ये प्राणायम करण्यासाठी शुद्ध हवा मिळत नाही. तसेच या अहवालात खराब हवेमुळे भारतात रोज चारशेच्यावर किशोरवयातील मुले दगावतात. ती अत्यंत चिंताजनक परिस्थिती ठरते.

जगण्यासाठी ज्या शुद्ध हवेची आवश्यकता असते तर मग बाकीच्या कितीही गोष्टी उपलब्ध करून दिल्या तरी त्याची किंमत शून्यच ठरते. ज्याला आपण जगण्याच्या मूलभूत गरजा असे म्हणतो. त्यात अन्न, पाणी, निवारा याचा समावेश जरी होत असला तरी या तीनही गोष्टींच्या अस्तित्वासाठीच शून्य हवा अधिक मूलभूत ठरते. जगातल्या अनेक देशांमध्ये आपल्या देशाप्रमाणेच प्रदूषित हवामान आहे. परंतु मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण भारताएवढे नाही. अगदी शेजारच्या देशात म्हणजे चीन मध्येसुद्धा हे प्रमाण भारतापेक्षा कमीच आहे. परंतु आशिया खंडाचा विचार केला तर भारताने वायुप्रदूषण हे अत्यंत धोकादायक आहे, ही बाब स्पष्ट होते. आपल्या देशात हवेतल्या प्रदूषणाला रस्त्यावरील सर्वाधिक असलेली वाढती वाहतूक कारणीभूत ठरते.

**विशेष**
**प्रा. मधुकर चुटे**
९४२०५६६४०४

जवळपास वीस टक्के वायुप्रदूषण हे वाहनांमधून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे होते. जे लोकांच्या प्रकृतीवर लगेचच परिणाम करतात. त्याचप्रमाणे रस्त्यावरच्या धुळीकणांमुळेसुद्धा वायुप्रदूषणात भर पडते. या अहवालाचे तज्ज्ञांकडून अतिशय काळजीपूर्वक विश्लेषण होण्याची गरज आहे. या प्रदूषणाने लोकांना हायपर टेन्शनसारख्या व्याधीत अधिक वाढ होते आणि त्यातून हृदयसारख्या झटक्याने सर्वाधिक मृत्यू होतात. तसेच आतड्याचा कर्करोग वाढण्यामागे हे वायूप्रदूषण सर्वाधिक कारणीभूत ठरते.मधुमेह वाढण्यासाठीसुद्धा हे प्रदूषण बऱ्याच प्रमाणात त्रासदायक ठरते. एवढेच नव्हे तर नेत्रविकार होण्यासाठी प्रदूषित हवा सर्वाधिक कारणीभूत ठरते. २०२१ मध्ये हवेच्या प्रदूषणाने एकवीस लाखाच्या आकड्याने मोठ्या प्रमाणात मनुष्यशक्तीचा नाश होतो. त्यात आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे या एकवीस लाखामध्ये जवळपास आठ लाख लहान मुलांचा समावेश असल्याचे या अहवालात म्हटले गेले आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने लगेचच दखल घेण्याची गरज आहे.

देशातील विविध राज्य सरकारांच्या आरोग्य विभागानेसुद्धा आपापल्या राज्यांमध्ये वायुप्रदूषणाची स्थिती काय आहे त्यातून होणारे मृत्यू किती प्रमाणात आहेत याचा अतिशय गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. विशेषकरून देशातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, बंगलोर ही महानगरे वायुप्रदूषणासाठी सर्वाधिक प्रसिद्ध आहेत. राजधानी दिल्लीतली हवा ही बाराही महिने धोकादायक स्थितीत असते. दिल्लीच्या परिसरामध्ये शेतांमधला कचरा जाळण्याचे काम हिवाळ्यात होत असते आणि त्या काळात या राजधानीतले प्रदूषण इतक्या प्रमाणात वाढते की शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय राज्य सरकारला तसेच शिक्षण संस्थांना घ्यावा लागतो. विद्यार्थ्यांनादेखील मास्क लावून शाळेत येण्याचा सल्ला द्यावा लागतो. दिल्लीइतकीच मुंबईतील हवा देखील प्रदूषित असते. यावरून हवा प्रदूषणाची तीव्रता किती धोकादायक आणि चिंताजनक आहे याची कल्पना येते.

वायू प्रदूषणाचे दुष्परिणाम हे स्लो पॉयझनिंगसारखे असते. कारण त्यातून निर्माण होणारे विविध आजार, विकार, व्याधी या हळूहळू किंवा कालांतराने वाढत जातात. ज्यावेळेला त्या लाखात येतात. त्यावेळी त्या व्याधी किंवा आजार चांगला होण्याची वेळ निघून गेलेली असते. जगात भारताची एकूण लोकसंख्या प्रचंड मोठी असल्याने मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाणही जास्त असते. परंतु अनेक प्रकारच्या निसर्गसंपदेने परिपूर्ण असलेल्या भारतात हवेचे हे जीवघेणे तांडव सुरु राहावे याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. भारतात प्रचंड वेगाने होणारे शहरांचे नागरीकरण होत आहे. शहरांची वेगाने होणारी निर्मिती ही प्रदूषणाला जास्त कारणीभूत ठरते. कारण या शहरीवाढीबरोबर औद्योगिकीकरण, वाहनांचे वाढते प्रमाण, मोकळ्या मैदानाचा ऱ्हास, किंवा निसर्गात आवश्यक असणारी बागबगीचे, अभयारण्ये यागोष्टीसुध्दा अस्तित्वात राहात नाही. शहरांमधून कितीही झाडे लावली तरी त्याच्या शंभरपट प्रदूषण निर्माण होत राहते. महानगरात प्रचंड वेगाने बांधकामे सुरु आहेत. मोकळी मैदाने जवळपास नाहीशी झालेली आहेत. त्यामुळे शहरी भागातील हवा मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाली असल्याची पाहायला मिळते.

**नागपूर**

# तरुणाच्या हाताला काम हवे

निवडणुकीच्या तोंडावर सरकार फुकट्या घोषणांचा पाऊस पाडत आहे. मतपेढी सुरक्षित राखण्यासाठी फुकट्या घोषणा करत आहे. फुकट्या घोषणांपेक्षा तरुणाच्या हाताला काम देण्याची गरज आहे. देशात बेकरीचे प्रमाण वाढत आहे. अनेक तरुण उच्च शिक्षित असूनही रोजगाराअभावी त्यांच्या हाताला काम नाही. आर्थिक आणि व्यावसायिक घडामोडींचे प्रमाण वाढूनही देशातील बेरोजगारीचे प्रमाण वाढून अडीच वर्षांच्या उच्चांकी पातळीवर गेले आहे. बेरोजगारी वाढण्यात ग्रामीण भागाचा मोठा वाटा असून, महिन्यात बेरोजगारीचे प्रमाण ४.६२ टक्क्यांनी वाढली आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या (सीएमआयई) ताज्या आकडेवारीनुसार, देशातील बेरोजगारीचे प्रमाण ऑक्टोबरमध्ये १०.०५ टक्क्यांवर पोहोचले आहे. बेरोजगारीचे हे मे २०२१नंतरचे सर्वाधिक प्रमाण आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये हे प्रमाण ७.०९ टक्के होते. ग्रामीण भागात वाढते प्रमाण सीएमआयईच्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भागातील बेरोजगारीचे प्रमाण वेगाने वाढत असून, ऑक्टोबरमध्ये ते १०.८२ टक्क्यांवर पोहोचले. सप्टेंबरमध्ये हेच प्रमाण ६.२ टक्के होते. याच काळात शहरी बेरोजगारीमध्ये किरकोळ घट होऊन ती ८.४४ टक्क्यांवर पोहोचली. देशातील १.७० लाखांहून अधिक कुटुंबांच्या केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे ह्यसीएमआयईह्लने बेरोजगारीची आकडेवारी जाहीर केली आहे.

सीएमआयईच्या मते, जागतिक स्तरावरील अनिश्चिततेमुळे विविध संकेत मिळत असूनही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत आहे. आर्थिक वर्ष २०२३ आणि २०२४मध्ये देशाचा विकासदर सहा टक्क्यांहून अधिक राहण्याची शक्यता आहे. असे असले, तरी त्यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांची निर्मिती होण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे आगामी काळात बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता अधिक आहे. केंद्र सरकारने नुकत्याच जारी केलेल्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२२-२३मध्ये देशाचा बेरोजगारीचा दर ३.२ टक्के होता.

**प्रासंगिक**
**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
९५६१५९४३०६

सरकारतर्फे प्रत्येक तिमाहीमध्ये देशव्यापी आणि शहरी बेरोजगारीचा दर जाहीर केला जातो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ पर्यंत १० लाख सरकारी नोकऱ्या देण्याची घोषणा केली आहे. आकडेवारी पाहिली असता गेल्या आठ वर्षांमध्ये नोकरीसाठी अर्ज केलेल्यांपैकी केवळ ०.३ टक्के जणांनाच नोकरी मिळाली आहे. शेती क्षेत्राची घसरती कामगिरीदेखील बेरोजगारीत वाढविण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. पावसाचे आणि भूजलाचे घटलेले प्रमाण यामुळेही शेतीतील बेरोजगारी वाढली आहे. सीएमआयईचे व्यवस्थापकीय संचालक महेश व्यास यांच्या मते सध्या देशातील बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. नोकऱ्यांच्या बाजारपेठेत येणाऱ्यांचे प्रमाण मोठे असून, प्रत्यक्षात मिळणाऱ्यांचे प्रमाण अतिशय अल्प आहे.

भारतातील निम्मी लोकसंख्या ३० वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. भारतात बेकरीचा प्रश्न अतिशय गहाण व तितकाच गंभीर आहे. देशातील तरुणांना रोजगार देण्यात व गरीबी व बेकारी कमी करण्यात आता पर्यन्त सरकरला यश आले नाही.वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत भारतात रोजगार नाही.तरुणांच्या हाताला काम नाही.भारत हा तरुणांचा देश आहे.संपूर्ण जगाला रोजगार देण्याची क्षमता भरताजवळ आहे.येथील उच्च शिक्षित तरुण विदेशात जावून रोजगारव नोकरी करत आहे.मात्र आमचे मायबाप सरकार तरुणांना रोजगार देण्यात कमी पडत आहे. येत्या काही वर्षांत भारताची भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनणार आहे. या पार्श्व वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्याच्या दृष्टीने युवकांना रोजगार देणे. व त्यांना व्यावसायिक बनविणे तितकेच आवश्यक आहे.

निसर्ग आणि लोकसंख्या यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. नैसर्गिक क्षमता आणि पुरवठा यांच्यात व्यस्त प्रमाण दिसू लागले की, बेकारीसारख्या अनेक समस्या डोके वर काढू लागतात. हा संदर्भ लोकसंख्या आणि संसाधनांशी संबंधित असला तरी त्याचे रहस्य रोजगार आणि सुशासन यांच्याशीदेखील संबंधित आहे. रोजगार तयार केले जातात आणि त्यांना संधी समतूल्य केले जाते, तर अशा संधी देऊन सुशासन करण्याच्या बाजूने प्रशासन असते, हे स्पष्ट आहे.

**वर्धा**

# अंधश्रद्धेमुळेच हाथरसची दुर्घटना

मागील काही वर्षात एखादी मोठी दुर्घटना घडली नाही आणि त्यात काही निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला नाही असा एकही महिना आपल्या देशात जात नाही. दुर्घटना आणि मृत्यू यांची बातमी पूर्वी केंव्हातरी ऐकायला मिळायची पण अलीकडे दुर्घटनांची मालिकाच सुरू आहे. गेल्या काही वर्षात तर सातत्याने दुर्घटना घडत आहेत आणि त्यात अनेक निष्पापांना जीव गमवावा लागत आहे. अर्थात या सर्व दुर्घटना मानव निर्मित असतात हे विशेष. अशीच एक मोठी दुर्घटना उत्तर प्रदेशमधील हाथरास फुलरई गावातील मुगलगुडी येथे घडली. या गावात एका सत्संगा दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला असून २०० हून अधिक गंभीर जखमी झाले. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. या सत्संगात दोन लाख भाविकांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे या सत्संगात ८० हजार लोकांनाच समाविष्ट करून घेण्याची परवानगी होती. म्हणजे ज्या ठिकाणी हा सत्संग झाला त्या ठिकाणची क्षमता ८० हजार लोकांचीच होती. क्षमतेपेक्षे तिप्पट भाविक या सत्संगाला उपस्थित होते. आयोजकांनी इतक्या भाविकांना प्रवेश दिलाच कसा असा प्रश्न पडतो. बरे ज्या ठिकाणी सत्संग झाला त्या ठिकाणी इतरही अनेक सोयी सुविधांचा अभाव होता. येथे बॅरेकेटिंग नव्हते. गर्दी नियंत्रित करण्यासाठी स्वयंसेवकांची व्यवस्था नव्हती.

**दृष्टिकोन**
**श्याम ठाणेदार**
९९२२५४६२९५

सत्संगाच्या ठिकाणी भाविकांसाठी योग्य प्रवेश व्यवस्था नव्हती. सत्संगाचा ठिकाणी आपत्कालीन गेट नव्हते. इतकेच नाही तर या ठिकाणी वैद्यकीय सुविधांचा मोठा अभाव होता. इतक्या मोठ्या गर्दीच्या ठिकाणी अनेक रुग्णवाहिका हव्या होत्या मात्र त्या ठिकाणी त्या नव्हत्या. सत्संग ज्या ठिकाणी होता तिथे ना पंख्यांची सोय होती ना कूलरची. पोलिसांची संख्या देखील अपुरी होती. इतक्या असुविधा ज्या ठिकाणी होत्या त्या ठिकाणी मोठी दुर्घटना घडणारच हे वेगळे सांगायला नको. या मोठ्या दुर्घटनेस आयोजकच जबाबदार आहेत. आयोजकांनी इतक्या मोठ्या संख्येत भाविकांना प्रवेश दिलाच कसा? ज्या ठिकाणी सत्संग होता त्या ठिकाणी सर्व सुविधा पुरवण्याची जबाबदारी आयोजकांची आहे यात त्यांनी हलगर्जीपणा केला हे उघड आहे. इतके बेजबाबदार आयोजक फक्त भारतातच असू शकतात. या दुर्घटनेस आयोजकच जबाबदार आहेत. आयोजकांच्या हलगर्जीमुळेच १२१ भाविकांना आपला जीव गमवावा लागला. या १२१ भाविकांच्या मृत्यूस जबाबदार धरून आयोजकांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल व्हायला हवा. या दुर्घटनेस जितके आयोजक जबाबदार आहेत तितकेच सत्संगाला उपस्थित असणारे भाविक आणि त्यांची अंधश्रद्धा जबाबदार आहे. आपल्या देशात बुवा बापूंची बजबजपुरी माजली आहे. या बुवा बापूंमुळे समाजात अंधश्रद्धा पसरत आहे. भोळ्या भाबड्या लोकांच्या श्रद्धेचा वापर करून ते स्वतःची पोतडी तर भरतच आहेत त्या सोबतच समाजात अंधश्रद्धाही पसरवत आहेत. लोकही या बुवा बापूंच्या मागे लागून स्वतःची बुद्धी गहाण ठेवत आहेत. अशिक्षितच नाही तर सुशिक्षित नागरिकही बुवा बापूंच्या नादी लागत आहेत त्यामुळे समाजात अंधश्रद्धा वाढत आहे. महाराष्ट्राप्रमाणे संपूर्ण देशात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू करायला हवा. केंद्र सरकारने यासाठी तातडीने पावले उचलायला हवीत. नागरिकांनी आपल्या सदसदविवेक बुध्दीचा वापर करून या बुवा, बापूंपासून दूर राहायला हवे.

**दौंड, जि. पुणे**

## लोकसंवाद

### रोजगाराच्या संधी आणखी वाढाव्या

**लोकसभेतील प्रचारातील** एक महत्त्वाचा मुद्दा होता बेरोजगारी. दिवसेंदिवस अनेक तरुण शिक्षित होत आहेत व ते नोकरीच्या शोधात आहेत. असे चित्र उभे राहिले आहे. विरोधी पक्षांनी सुद्धा या बेरोजगारीचा मुद्दा प्रचारात मोठ्या प्रमाणात समोर आणला होता. या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी आपली ताकद वाढविली होती आज सरकारी नोकरीतील संधी हळूहळू कमी होत आहेत. साहजिकच नोकऱ्यावर मर्यादा येत आहेत.

मोदी सरकारने आपल्या तिसऱ्या कार्यकाळात नोकरी देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी स्वतः सर्व कॅबिनेट मंत्र्यांना बोलवून त्यांना रोजगार वाढवण्यासाठी धोरणे बनविण्याच्या सूचना दिल्या आहेत अशी बातमी नुकतीच वाचली. बुधवारी पंतप्रधान मोदी यांनी वेगवेगळ्या विषयावर कॅबिनेट समित्या स्थापना केल्या आहेत.

या कॅबिनेट कमिटीमध्ये रोजगार व कौशल्य विकासाचा समावेश असून अनेक वरिष्ठ मंत्र्यांचा या कमिटीत समावेश आहे. यामध्ये अर्थ, रेल्वे, संरक्षण, रस्ते वाहतूक गृहखाते आदी मंत्र्यांचा समावेश आहे. पंतप्रधान मोदींचा भर एका वर्षात ५० लाख नोकऱ्या तयार करण्यावर आहे. सध्या संरक्षण, रेल्वे व पोस्ट या खात्यात नोकरीच्या अनेक संधी आहेत. विशेष म्हणजे वस्त्रोद्योग मंत्रालयाला संपूर्ण नेटवर्क तयार करण्याच्या सूचना सुद्धा दिल्या आहेत . सर्व कॅबिनेट मंत्र्यांना रोजगार वाढवा असे थेट सांगण्यात आले आहे. सर्व सचिवांना सुद्धा याबाबत सूचना दिल्या आहेत. दरवर्षी ५० लाख नोकऱ्या देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याचा अर्थ पाच वर्षात अडीच कोटी नोकऱ्या देण्याचे उद्दिष्ट देण्यात आली आहे. यातील जरी ६० ते ७० टक्के उद्दिष्ट जरी यशस्वी पणे पूर्ण केले तरीही ती एक मोठी उद्दिष्ट पूर्ती होणार आहे.

**शांताराम वाघ**
पुणे

### सहकार चळवळीतील योगदानावर प्रकाश

**१६ डिसेंबर १९९२** रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ठराव ४७/९० मध्ये घोषित केले. जुलै १९९५चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकारी दिवस म्हणून घोषित केला गेला, जो आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या स्थापनेच्या शताब्दी निमित्त आहे. सन १९९५पासून संयुक्त राष्ट्रसंघाचा आंतरराष्ट्रीय सहकारी दिन संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय सहकाराच्या पुढाकाराने साजरा होऊ लागला. आंतरराष्ट्रीय सहकारी दिन हा सन १९२३पासून आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीद्वारे जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी साजरा केला जाणारा सहकारी चळवळीचा वार्षिक उत्सव आहे. जगभरातील सहकारी संस्था हा दिवस विविध पद्धतीने साजरा करतात आणि दरवर्षी आयोजक संस्था उत्सवासाठी एका थीमवर सहमत असतात. बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शनच्या १५व्या वर्धापन दिनानिमित्त सन २०१०ची थीम कोऑपरेटिव्ह एंटरप्राइज महिलांना सक्षम बनवते, अशी होती. यावर्षी ६ जुलै हा दिवस सहकार चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी साजरा केला जात आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी सहकार संस्था सामंजस्याने कशा प्रकारे कार्य करतात याबद्दलही या निमित्ताने जनजागृती केली जाते.युनायटेड नेशन्स जनरल असेंब्ली-युएनजीएने दि.१६ डिसेंबर १९९२ रोजी जुलै १९९५चा पहिला शनिवार आंतरराष्ट्रीय सहकार दिन म्हणून घोषित करण्याचा ठराव मंजूर केला. आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीच्या स्थापनेची शताब्दी म्हणून ही तारीख निवडण्यात आली. याला कूप्स डे असेही म्हणतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिन, आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीची स्थापना आणि जगाला एक चांगले स्थान बनवण्याच्या दिशेने सहकार संस्था कशा प्रकारे कार्य करतात, याचा उत्सव साजरा करतात. आंतरराष्ट्रीय सहकार दिन उपक्रम आणि चर्चा आयोजित करून साजरा केला जातो. यामध्ये विविध सहकार संस्थांचे कार्य दर्शविणाऱ्या लघुपटांच्या स्क्रीनिंगचा समावेश आहे. या दिवशी रेडिओ कार्यक्रम, वर्तमानपत्रे आणि इतर विविध माध्यमांचा वापर या क्षेत्रातील उपलब्धींवर प्रकाश टाकण्यासाठी केला जातो. सामुदायिक स्तरावर त्यांचे लक्ष असूनही, सहकारी संस्था त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक मॉडेलचे फायदे जगभरातील लोकांपर्यंत पोहोचवण्याची आकांक्षा बाळगतात. त्यांच्या मते, जागतिकीकरणामुळे वाढलेली संसाधनांची असमानता, संपत्तीचे अधिक शाश्वत वितरण होण्यासाठी मूल्यांच्या संचाद्वारे नियंत्रित करणे आवश्यक आहे. सहकार चळवळ ही लोकशाही आणि स्थानिक पातळीवर स्वायत्त आहे.

**गोविंदा निकोडे**
९४२३७१४८८३
रामनगर वॉर्ड, गडचिरोली

### दृष्टिक्षेप

## मनोज जरांगे यांना पोलिस संरक्षण

**वृत्तसंस्था/मुंबई**

मनोज जरांगे-पाटील यांच्या सुरक्षेसाठी एक अधिक एक सशस्त्र पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या वाहन ताफा सुरक्षेसाठी एक अधिक तीन सशस्त्र पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात ड्रोनद्वारे सर्वेक्षण होत असल्याचे समजताच स्थानिक पोलीस पथक आंतरवाली येथे गेले. तेथील शिवारात पाहणी केली असता पोलीस पथकास ड्रोन आढळून आले नाहीत. तथापि, याबाबत संशयास्पद वाटणाऱ्या बाबींची चौकशी करण्यासाठी तीन स्वतंत्र पथके पोलीस अधीक्षकांनी तयार केली असून चौकशी सुरू आहे, अशी माहिती मंत्री देसाई यांनी दिली. विधानसभेतील चर्चेदरम्यान आंतरवाली सराटी (जि. जालना) येथे ड्रोनद्वारे सर्वेक्षण केले जात असल्याचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला होता. यासंदर्भात सविस्तर अहवाल जिल्हा पोलीस प्रशासनाकडून प्राप्त करून त्याबाबत सभागृहास अवगत करण्यात येईल, असे मंत्री देसाई यांनी सभागृहास आश्वस्त केले होते. त्यानुसार आज गुरुवारी विधानसभेत याप्रकरणी मंत्री देसाई यांनी माहिती दिली.

## आयटीआयमधील ओबीसी विद्यार्थ्यांना शुल्क प्रतिपूर्ती - अतुल सावे

**वृत्तसंस्था/मुंबई**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आयटीआय) केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्याची योजना आहे. तांत्रिक अडचणींमुळे सदरचा निधी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यास महाआयटीकडून विलंब झाला होता. मात्र, आता याबाबत तांत्रिक अडचणी दूर झाल्यामुळे महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत दिली. आ. सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री विक्रम काळे, अभिजित वंजारी यांनी सहभाग घेतला. मंत्री सावे म्हणाले की, या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी सन २०२१-२२ करिता १४.४४ कोटी व सन २०२२-२३करिता २१.६० कोटी रुपयांची तरतूद इतर मागास बहुजन संचालनालय, पुणे यांना वितरीत करण्यात आली असून त्यांच्यामार्फत महाआयटी कार्यालयास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आयटीआय मध्ये केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्याची ही योजना असल्याने खासगी आयटीआयना अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## सर्वसामान्य रेल्वे प्रवाशांच्या सुविधांवर रेल्वेचे लक्ष

**वृत्तसंस्था/मुंबई**

सामान्य प्रवाशांचे जीवन सुलभ करण्यासाठी, भारतीय रेल्वेने पुढील दोन वर्षांसाठी सुमारे १० हजार विना- वातानुकूलित डब्यांच्या निर्मितीची योजना आखली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, आर्थिक वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ मध्ये, ५३०० पेक्षा जास्त सामान्य डब्यांसह सुमारे १० हजार कोच अंतिम केले जात आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, रेल्वेने अमृत भारत सामान्य कोचसह २६०५ सामान्य श्रेणींचे डबे, अमृत भारत शयनयान कोचसह १४७० विना- वातानुकूलित शयनयान, अमृत भारत एस एल आर डब्यांसह ३२३ एसएलआर कोच, ३२ उच्च क्षमतेची पार्सल व्हॅन आणि ५५ आसनी डब्बे तयार करण्याची योजना आखली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये, रेल्वेने अमृत भारत सामान्य डब्यांसह २७१० सामान्य कोच, अमृत भारत शयनयान कोचसह १९१० विना- वातानुकूलित शयनयान, अमृत भारत एसएलआर डब्यांसह ५१४ एसएलआर कोच, २०० उच्च क्षमतेची पार्सल व्हॅन आणि २०० पॅन्री व्हॅन आणि कार तयार करण्याची योजना आखली आहे. रेल्वे सेवेची मागणी गतिमान आहे आणि हंगामी फरक, प्रवासी वाहतूक वाढ, इत्यादींवर अवलंबून घटते/वाढते, त्यामुळे डब्यांची आवश्यकता या घटकांवर आधारित आहे आणि त्यामुळे ते वार्षिक कोच उत्पादन कार्यक्रमात समाविष्ट करण्यात येते. तसेच कोचचे उत्पादन हे सामान्यतः आवश्यकतेनुसार असते.

## गावठी पिस्टलसह दोन सराईत गुन्हेगारांना अटक

**वृत्तसंस्था/जळगाव**

चाळीसगाव पोलिसांच्या गस्तीपथकाने बनावटी गावठी पिस्टल (कट्टा) जवळ बाळगणाऱ्या दोघांना अटक केली आहे. याप्रकरणी चाळीसगाव पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे व अपर पोलिस अधीक्षक कविता नेरकर व उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय येरुळे यांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्ड वरील गुन्हेगारांच्या हालचालीवर रात्र गस्त व पेट्रोलींग दरम्यान नजर ठेवून त्यांना दररोज चेक करण्यात येते. पोलिस निरीक्षक संदिप पाटील आणि त्यांचे पथक रात्रगस्त पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, दोन संशयीत इसम एका काळ्या रंगाच्या,पल्सर मोटारसायकलवर चाळीसगांव शहरात संशयीत रित्या फिरत आहेत. त्यावरुन वर नमूद पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी चाळीसगांव शहरात शोध रात्री १.३० वाजेच्या सुमारास चाळीसगांव शहर पोलिस स्टेशनच्या जवळच रोडवर आरोपी भाग्यवान उर्फ माया लक्ष्मण गायकवाड वय २४ वर्षे रा. चिकुंदरा ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद व विकास संपत म्हस्के वय २५ वर्षे रा. बालाजी नगर, आशा टेलर समोर, भोसरी, पुणे यांना पळून जाण्याची संधी न देता ताब्यात घेतले असता, त्यांच्या कब्जात गावठी बनावटीच्या २ पिस्टल व ४ जिवंत काडतूस, २ मॅगझिन, पल्सर मोटारसायकल असा एकुण १ लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला.

# भारत-चीन परराष्ट्रमंत्र्यांची शांततेवर चर्चा

## पूर्व लडाखच्या वादावर लवकर तोडगा काढण्यावर विचारमंथन

**वृत्तसंस्था/अस्ताना**

भारत आणि चीनने पूर्व लडाखमधील उर्वरीत समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी आणि संबंध स्थिर आणि पुनरुज्जीवित करण्यासाठी दुप्पट प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात कझाकस्तानची राजधानी अस्ताना येथे शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ) शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर एक बैठक झाली.

जयशंकर म्हणाले की वास्तविक नियंत्रण रेषा (एलएसी)चा आदर केला पाहिजे. दोन्ही नेत्यांमधील संभाषणात जयशंकर यांनी सीमा व्यवस्थापनासाठी भूतकाळात दोन्ही बाजूंनी स्वाक्षरी केलेल्या संबंधित द्विपक्षीय करारांचे आणि नियमांचे पूर्णपणे पालन करण्याची गरजही व्यक्त केली. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, जयशंकर आणि वांग यांनी पूर्व लडाखमधील एलएसीवरील प्रलंबित समस्यांवर लवकर तोडगा काढण्यासाठी सखोल चर्चा केली जेणेकरून



द्विपक्षीय संबंध स्थिर व्हावे आणि संबंधांची पुनर्निर्मिती केली जावी. बैठकीत, परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी भारताच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार केला. ते म्हणाले, दोन्ही बाजूंमधील संबंध परस्पर आदर, हित आणि परस्पर संवेदनशीलतेवर आधारित असले पाहिजेत.

दोन्ही देशांमधील सामान्य संबंधांसाठी सीमावर्ती भागात शांतता आणि स्थिरता महत्त्वाची आहे, असा भारताचा विश्वास आहे. एलएसीबाबत दोन्ही मंत्र्यांनी दोन्ही बाजूंच्या राजनैतिक आणि लष्करी अधिका-यांमधील बैठका सुरू ठेवण्यास आणि प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी चर्चा करण्यास सहमती दर्शविली, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितले. भारत-चीन सीमा प्रकरणांवर समन्वय (डब्ल्यूएमसीसी) लवकरच भेटले पाहिजे. दोन्ही मंत्र्यांनी सहमती दर्शवली की सीमावर्ती भागात सध्या तणाव वाढवणे कोणाच्याही हिताचे नाही.

परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी पूर्व लडाखमधील उर्वरित भागातून सैन्य पूर्णपणे काढून टाकण्याची आणि सीमेवर शांतता पुनर्संचयित करण्यासाठी दुप्पट प्रयत्न करण्यावर भर दिला जेणेकरून द्विपक्षीय संबंध सामान्य होण्याच्या मार्गात जे काही अडथळे असतील ते कायम दूर राहतील,असे मंत्रालयाने म्हटले आहे. भारत आणि चीन यांच्यातील मध्य पूर्व लडाखमध्ये सुरू असलेल्या सीमावादाच्या दरम्यान या नेत्यांमध्ये ही बैठक झाली. मे २०२० पासून भारत आणि चीनच्या सैन्यांमध्ये संघर्ष सुरू आहे. भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला दहशतवादाला आश्रय देणा-या देशांना उघडकीस आणून एकटे पाडण्यास सांगितले.

## प्रत्येक जिल्ह्यात ५०० ई-रिक्षा, जिल्हा वार्षिक योजनेतून निधी

### अजित पवार यांची घोषणा

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या योजनांसह नवीन योजनांच्या अंमलबजावणीसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. महिलांना स्वयंरोजगारासाठी ई-पिंक रिक्षा योजनेचा विस्तार, श्री ज्योतिबा मंदिर व परिसर विकास उत्कर्ष प्राधिकरणाची स्थापना, जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज यांचे समाधीस्थळ असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे विकास आराखडा तयार करुन त्यास आवश्यक निधी, यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद येथील शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेस २ कोटींचा निधी, जावळी तालुक्यातील शहीद तुकाराम ओंबाळे स्मारकास निधी, कोयना येथील पुनावळे येथे जलपर्यटनासाठी निधी देण्यात येणार आहे, अशा घोषणा



उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेला विधानसभेत उत्तर देताना केल्या.

उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, राज्याचा सर्वांगीण विकास व्हावा, प्रत्येक समाजघटकाला विकासाच्या प्रवाहात संधी मिळावी, शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा, सर्वसामान्य नागरिक अशा सर्वांच्या अडचणी दूर व्हाव्यात, ही राज्य सरकारची इच्छा आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक घटकाच्या जास्तीत जास्त अपेक्षा पूर्ण करण्याचा, प्रत्येक समाजघटकाला न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून केला आहे. महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवत असताना आर्थिक आघाडीवर देखील राज्य सुस्थितीत रहावे, यासाठी सरकारचा प्रयत्न आहे. या सर्व गोष्टी नजरेसमोर ठेऊन अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. त्यामुळे वारकरी, महिला, शेतकरी, दुर्बल घटक, युवा पिढी या सर्वांचा हा अर्थसंकल्प आहे. शेतक-यांना बळ देणारा हा अर्थसंकल्प आहे. महिलांना सशक्त करणारा हा अर्थसंकल्प आहे, असे स्पष्टीकरणही त्यांनी केले. राज्य सरकारचा पारदर्शक प्रशासनावर भर असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार म्हणाले की, लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य

## पुसद येथील शिक्षण प्रसारक मंडळाला दोन कोटींचा निधी

**वृत्तसंस्था/मुंबई**

यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद येथील शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था १९१४पासून कार्यरत असून ही संस्था १०० वर्षांहून अधिक काळ शिक्षणप्रसाराचे कार्य करीत आहे. या संस्थेद्वारा संचलित कोषटवार दौलतखान विद्यालय व गोधाजीराव मुखरे कनिष्ठ महाविद्यालय या संस्थेच्या इमारत बांधकाम व मूलभूत सोयीसुविधांकरिता २ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडून बेरोजगारी कमी करण्यासाठी राबविण्यात येणा-या विविध उपाययोजनांबाबत सांगताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, बेरोजगारीचा दर कमी होत असून सन २०२०-२१ मध्ये ३.७ टक्के, २०२१-२२ मध्ये ३.५टक्के आणि २०२२-२३ मध्ये ३.१टक्के त्याचा दर होता. राज्यात वेगवेगळे उद्योग उभे रहात असून या माध्यमातून रोजगार निर्मिती होत आहे. मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून युवकांना खात्रीशीर रोजगार मिळणार आहे, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

## अमरावती विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची देयके अदा करण्यासाठी तरतूद

### मंत्री दीपक केसरकर यांची माहिती

**वृत्तसंस्था/मुंबई**

अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची विविध देयके अदा करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या सर्व देयकांचा तातडीने निपटारा केला, जाईल, अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी विधानपरिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य किरण सरनाईक यांनी पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून वरील मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. त्याला उत्तर देताना मंत्री केसरकर म्हणाले की, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांची देयके आर्थिक तरतूद नसल्याने प्रलंबित होती. आता निधीची तरतूद करण्यात आली असून देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल. या देयकांच्या प्रस्तावात आढळून येणा-या त्रुटींची पूर्तता



लवकर होण्याच्या दृष्टीने त्रुटींची एक चेकलिस्ट तयार केली जाईल, जेणेकरुन एकदाच सर्व त्रुटींची माहिती संबंधिताना होईल. यासंदर्भात प्राप्त तक्रारींचे अवलोकन करुन आवश्यकता असल्यास कार्यवाही करण्यात येईल. तसेच वारंवार त्रुटी काढल्या जाणार नाहीत, यासाठीची नियंत्रणात्मक व्यवस्था केली जाईल, देयकांचा लवकरात लवकर निपटारा करण्यात येईल, असे मंत्री केसरकर यांनी यावेळी सांगितले.

आदिवासी, डोंगराळ, दुर्गम भागातील कोणतीही शाळा बंद करण्यात येणार नाही. शिक्षण भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून न्यायप्रविष्ट विषयांमुळे काही शिक्षक रूजू होऊ शकले नाहीत. प्रत्येक शाळेत उत्तम पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी शासन निर्णय घेत आहे. राज्यात दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचे केसरकर यांनी यावेळी सांगितले.

## महागाई विरोधात विधिमंडळाच्या पायऱ्यांवर 'मविआ'ची निदर्शने

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यात वाढलेल्या महागाईच्या विरोधात पावसाळी अधिवेशनाच्या आठव्या दिवशी विधिमंडळ परिसरात महाविकास आघाडी आक्रमक झाली. विरोधी पक्षाच्या आमदारांनी सामान्य माणूस कमवतो पाई पाई, त्याला लुटून खाते महायुतीच्या काळातील महागाई, सरकारने लुटली सरकारी तिजोरी जनतेच्या हाती दिली महागाईची शिदोरी अशा गगनभेदी घोषणा देत सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

विरोधी पक्षनेत्यांच्या नेतृत्त्वाखाली महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवनाच्या पाय-यांवर जोरदार



निदर्शने केले. भाजी महागली कडधान्य महागले महागाईने मध्यमवर्गीय कोलमडले, सरकारने लुटली सरकारी तिजोरी जनतेच्या हाती दिली महागाईची शिदोरी, सामान्य माणूस कमवतो पाई पाई, त्याला लुटून खाते महायुतीच्या काळातील महागाई, महागाईने जनता त्रस्त महायुती सरकार वसुलीत व्यस्त अशा विविध घोषणा लिहिलेले फलक हाती घेत वाढत्या महागाई विरोधात महाविकास आघाडी आक्रमक होत गगनभेदी घोषणा देत महायुती सरकारला घेरले.

सरकार आहे वसुलीत मस्त महागाईने जनता त्रस्त, खोके सरकार हाय हाय, महागाईवर नियंत्रण न ठेवणा-या सरकारचा धिक्कार असो, बियाणांचा दर वाढवणा-या सरकारचा धिक्कार असो, महागाई हाय हाय, केंद्रसरकार हाय हाय अशी जोरदार घोषणाबाजी करत विधानभवन परिसर दणाणून सोडला.

## राज्यात पुढील पाच दिवस धो-धो बरसणार

### हवामान विभागाचा सावधानतेचा इशारा

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यात जोरदार पाऊस बरसत असून पुढील पाच दिवसही अशीच परिस्थिती राहणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यात पुढील पाच दिवस धो-धो बरसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई-ठाणे, पालघर जिल्ह्यात आज मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, कोल्हापूरमध्ये हवामान विभागाने अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर, विदर्भातही पावसाची शक्यता आहे. येथील चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळमध्ये वादळी वा-यासह



पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्याच्या काही भाग वगळता इतर जिल्ह्यांमध्ये पाऊस बरसेल.

जुलै महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने जोर धरला आहे. जूनमध्ये पावसाने दडी मारल्यानंतर चिंता वाढली होती. जून महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने यावर्षी वरुणराजा रुसला की काय अशी परिस्थिती होती. पण, जुलै महिना सुरु होताच पावसाने राज्यात जोरदार एन्ट्री केली आणि सारेख सुखावले. जुलै महिन्याच्या १ तारखेपासूनच मान्सूनने राज्यात जोर धरला असून या महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होऊन जून महिन्याची कसर भरुन निघणार आहे. मान्सूनने अखेर राज्यात सर्वदूर हजेरी लावली आहे. मुंबई-पुण्यासह संपूर्ण राज्य मान्सूनने गेल्या काही दिवसात व्यापलं आहे. जुलै महिन्याच्या पहिले चार दिवस मुंबईसह राज्यात जोरदार पाऊस झाला. तर आता पुढील पाच दिवसही राज्यात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

आजही मुंबईत सकाळपासूनच पावसाला सुरुवात झाली आहे. तर, येत्या काही तासात मुंबईत मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. तर, पुढील ५ दिवस कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांसह विविध भागांना पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागाकडून अनेक जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे.

## सर्वेशची उंच उडीसाठी पॅरिस ऑलिम्पिकसाठी निवड

**वृत्तसंस्था/नाशिक**

निफाड तालुक्यातील देवगाव येथील सर्वेश अनिल कुशारे याची उंचउडीसाठी पॅरिस ऑलिम्पिकसाठी निवड झाली आहे.हरियाणातील पंचकुला येथे २९ जूनला झालेल्या स्पर्धेत सर्वेश ने २.२५ मीटर उंच उडी मारून प्रथम क्रमांक पटकावत जागतिक क्रमवारीत २४ व्या स्थानावर झेप घेत घेतली यापूर्वी तो ३६ व्या स्थानी होता. देवगाव येथील श्री. डी. आर. भोसले विद्यालयात माध्यमिक शिक्षण घेत असताना सर्वेशने २०१० पासून उंचउडीला सुरुवात केली होती.क्रीडाशिक्षक रावसाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने नियमित सराव केला.२०११ मध्ये जाधव यांनी मक्यापासून तयार केलेल्या भुशाच्या पोत्यावर फॉसबरी प्रकारची उडी मारण्याची प्रॅक्टिस सर्वेशने सुरू केली.या काळात त्याने तालुका,जिल्हा व राज्यस्तरावर अनेक बक्षिसे पटकावली आहेत.

सध्या पुण्यात भारतीय लष्करामध्ये सेवेत असलेल्या सर्वेशने बारावीपर्यंत देवगाव येथे शिक्षण घेतल्यानंतर उंचउडीच्या सरावासाठी वापरली जाणारी अत्याधुनिक मॅट उपलब्ध नसल्याने सांगलीमध्ये महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्याने प्रवेश घेतला.

# पीक विमा : पर्यायी योजनेसाठी अभ्यास समितीची नेमणूक - धनंजय मुंडे

**वृत्तसंस्था/मुंबई**

पीक विमा योजनेस पर्यायी योजनेसाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समितीची नेमणूक करण्यात आलेली असून ही समिती देशातील इतर राज्यांमध्ये राबवली जाणारी पीक विमा योजना तसेच ज्या राज्यांमध्ये पीक विमा योजनाच लागू नाही अशा राज्यांमध्ये शेतक-यांना कोणत्या पद्धतीने नुकसानी बाबत लाभ दिला जातो याचा परिपूर्ण अभ्यास करून याबाबतचा अहवाल लवकरच शासनास सादर करेल, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विधानसभेत बोलताना दिली.

राज्याचे मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री तसेच कृषिमंत्री म्हणून मी स्वतः पीक विमा कंपन्यांच्या सोबत सातत्याने बैठका घेऊन मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीचा विमा तातडीने वितरण केला जावा, यासाठी वारंवार पाठपुरावा करत असतो. त्यानुसार यावर्षी राज्यात अग्रिम मध्येच विक्रमी पीक विमा वाटप करण्यात आले आहे. मात्र तरीही विविध पीक विमा कंपन्यांचे विमा नुकसान देण्याबाबतचे धोरण आणि दप्तर दिरंगाई याबाबत शेतक-यांच्या व ब-याच लोकप्रतिनिधींच्या नेहमीच तक्रारी येत असतात त्यावरून पीक विमा योजनेवरती आपण सर्व समाधानी आहोत असे नाही, त्यामुळेच शेतक-यांना अधिकचा आधार व अडचणीच्या काळात दिलासा मिळावा या दृष्टीने पीक विमा योजनेला पर्यायी योजना आणण्यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास समितीची नेमणूक करण्यात आली आहे.

विधानसभेत २९३ च्या प्रस्तावात विविध सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर दिले. यावेळी सन २०२३ च्या खरीप हंगामात पावसाने झालेल्या नुकसानी पोटी अग्रिम २५ टक्के प्रमाणे पीक विमा वितरण करण्यात आले. याद्वारे राज्यात विक्रमी ७ हजार कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला, तर यापैकी ४ हजार कोटींपेक्षा जास्त विमा रकमेचे वितरण पूर्ण झाले व उर्वरित रक्कमेचे वितरण सध्या सुरू आहे. विशेष म्हणजे २०२६ पासून आजपर्यंतची विमा वितरणाची ही आकडेवारी रेकॉर्ड ब्रेक असून यामध्ये अंतिम पीक कापणी अहवाला नंतर सरासरीच्या हिशोबाने येणारी पिक विमा रक्कम याची त्यात वाढ होणार असून अंतिम पीक कापणी नंतरचे पीक विम्याचे वितरण सुद्धा जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण केले जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी सभागृहात सांगितले.

## माऊलीच्या पालखीत सिलिंडरने घेतला पेट

**पुणे :** सासवड-जेजुरी रस्ता, वाळुंज फाटा येथे गुरुवारी सकाळी सुमारे १० वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गस्थ होत असताना पुढे दिंडी क्रमांक ७८ मधील वारकऱ्यांचा स्वयंपाक सुरु असताना अचानक घरगुती सिलेंडरने पेट घेतला. त्यावेळी मोठा आवाज झाला. तिथे असलेल्या वारकरी व अग्निशमन दलाने आग विझवण्याचा प्रयत्न केला.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली होती. संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सासवडकडून जेजुरीकडे रवाना झाली आहे. या दरम्यान सकाळी साधारण दहाच्या सुमारास दिंडी क्रमांक ७८ मध्ये स्वयंपाक सुरू असताना घरगुती सिलेंडरने अचानक पेट घेतला.

## ऊस रसापासून इथेनॉल निर्मितीस परवानगीसाठी अमित शहांना भेटणार

### उपमुख्यमंत्री पवार यांची माहिती

**वृत्तसंस्था/मुंबई**

ऊस उत्पादक शेतक-यांचे नुकसान टाळण्यासाठी ऊसरसापासून इथेनॉल निर्मितीस परवानगी देण्याचे धोरण केंद्र सरकारने कायम ठेवावे, या मागणीसाठी याच महिन्यात केंद्रीय सहकारमंत्र्यांची भेट घेण्यात येईल. केंद्र सरकार ऊस उत्पादक शेतक-यांच्या हिताचाच निर्णय घेईल याची खात्री आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत व्यक्त केला.

विधानसभा सदस्य जयंत पाटील आणि राजेश टोपे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर उत्तर देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ऊसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीस प्रोत्साहन देण्याचे केंद्राचे धोरण होते. त्यासाठीच्या प्रकल्पनिर्मितीस सहा टक्के व्याजदराने कर्जही उपलब्ध करण्यात आले. परंतु नंतरच्या काळात साखरेचे दर नियंत्रित ठेवणे आणि साखरेचा तुटवडा टाळण्यासाठी केंद्राने इथेनॉल निर्मितीबाबतच्या धोरणात बदल केला. परंतु आता राज्यात आणि देशात विक्रमी साखरेचे उत्पादन झाले असल्याने ऊसरसापासून इथेनॉल निर्मितीस बंदी घालण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. यासंदर्भात केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्याशी अनौपचारिक चर्चा झाली असून त्यांनीही सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे विधीमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर महिन्याभरात केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येईल. गेल्या काही वर्षात एफआरपीमध्ये वाढ झाली. त्याच प्रमाणात एमएसपीही वाढण्याची गरज आहे. ऊसउत्पादक शेतकरी आणि ग्राहक या दोघांच्या हिताचा विचार करुन यासंदर्भात निर्णय होईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

हे दैनिक, **लोकशाही पब्लिकेशन्स प्रा. लि.** करिता **प्रकाशक - सौ. प्रज्ञा संजय हेडा** यांनी, **मुद्रक - श्री. अरुण श्यामराव जोशी** यांच्या, देश पब्लिकेशन, इ-30 /2, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स मागे, हिंगणा एम.आय.डी.सी. नागपूर - 440016 येथे मुद्रित करून, थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह - II, 148, युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ, नागपूर - 440010 येथे प्रसिद्ध केले. **RNI No.- MAHMAR/2010/35482. व्यवस्थापकीय संचालक - * सौ. प्रज्ञा संजय हेडा** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.) **दूरध्वनी क्र.** 0712-2424244, 0712-4043332.
**E-Mail : editorial@lokshahivarta.in.**
(लोकशाही वार्तामधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. तसेच लोकशाही वार्ताशी संबंधित कुठलेही वाद केवळ नागपूर न्यायालयाच्या कार्यकक्षेतच राहतील.)

# मला पश्चाताप नाही- ईशा देओल

**मुंबई-** कायम सिनेमांमुळे चर्चेत राहाणारी ईशा गेल्या काही दिवसांपासून अभिनेता सनी देओल आणि बॉबी देओल यांच्यासोबत सुधारलेल्या नात्यामुळे आणि भरत तख्तानी याच्यासोबत झालेल्या घटस्फोटामुळे चर्चेत आली आहे. भरत तख्तानीसोबत घटस्फोट घेतल्यानंतर तिने पहिल्यांदा मौन सोडले असून, मला आता कोणताही पश्चाताप नाही, असे वक्तव्य तिने केले आहे.

जुन्या दिवसांच्या आठवणी माध्यमांना सांगत ईशा म्हणाली, माझी विस्मयकारक वर्षे उत्साहाने, निरागसतेने भरलेली होती. हे फक्त २० वर्षांची मुलगी अनुभवू शकते. मला आता कोणत्याही गोष्टीचा पश्चाताप नाही. मी जे काही केले त्यात मी समाधानी आहे.


अभिनेते धर्मेंद्र आणि अभिनेत्री हेमा मालिनी यांची मुलगी ईशा देओलने २००२मध्ये प्रदर्शित झालेल्या कोई मेरे दिल से पूछे सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. काही हिट सिनेमे बॉलिवूडला दिल्यानंतर ईशाने अभिनय विश्वाचा निरोप घेतला. दरम्यान, एक काळ असा होता, जेव्हा सर्वत्र ईशा देओल हिच्या चर्चा असायच्या. त्या काळात स्वतःच्या सौंदर्याने आणि ट्रेंडसेटिंग फॅशन पिक्सने खळबळ माजवणाऱ्या ईशाला नुकताच तिच्या करिअरमधील जुने दिवस आठवले. ईशाने तिचा बालमित्र भरत तख्तानी याच्यासोबत लग्न केले. लग्नानंतर दोन मुलींना जन्म दिला. आता यावर्षी भरत आणि ईशा यांचा घटस्फोट झाला. जेव्हा तिला विचारण्यात आले की, लग्न आणि मातृत्वाचा प्रवास तिच्या आयुष्यात खूप लवकरच आला का?

# शाहरुखला जीवन गौरव पुरस्कार

## स्वित्झर्लंडमध्ये सन्मानित होणारा पहिलाच भारतीय अभिनेता

**मुंबई-** शाहरुख खानने आपल्या फिल्मी करिअरमध्ये अनेक मोठे पुरस्कार पटकावले आहेत. आता आणखी एक मोठी कामगिरी होणार आहे. स्वित्झर्लंडमध्ये होणाऱ्या लोकार्नो फिल्म फेस्टिव्हलमध्ये शाहरुख खानला सन्मानित करण्यात येणार आहे. १००हून अधिक चित्रपटांमध्ये योगदान दिल्याबद्दल शाहरुख खानला लोकार्नो चित्रपट महोत्सवातून जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले जाईल. हा पुरस्कार मिळवणारा शाहरुख खान हा पहिला भारतीय अभिनेता आहे.

लोकार्नो फिल्म फेस्टिव्हल ७ ते १७ ऑगस्ट दरम्यान आहे, ज्यामध्ये शाहरुख खानचा देवदास चित्रपट दाखवला जाणार आहे. लोकार्नोचे कलात्मक दिग्दर्शक जिओना ए. नाझारो यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकार्नोमध्ये शाहरुखसारख्या कलाकाराचे स्वागत करणे आमच्यासाठी स्वप्नासारखे आहे. त्याने त्याच्या चाहत्यांशी कधीही संपर्क गमावला नाही. शाहरुख एक उत्कृष्ट कलाकार आहे, जो नेहमी स्वतःला आव्हान देण्यासाठी तयार असतो.



### 'टीम इंडिया'च्या विजयोत्सवाने थक्क

सुपरस्टार शाहरुख खानने एक्सवर पोस्ट शेअर करीत टीम इंडियाच्या सगळ्या खेळाडूंचे कौतुक केले. शाहरुख म्हणाला, टीम इंडियाच्या खेळाडूंना इतके आनंदी आणि भावुक झालेले पाहून मन अभिमानाने भरून आले आहे. सगळ्या भारतीयांसाठी हा एक अद्‌भुत क्षण आहे. आमची मुले आम्हाला इतक्या उंचीवर घेऊन जातात हे पाहून अभिमान वाटतो. त्यांच्यामुळे सगळ्यांचे दुःख दूर झाले आहे. दरम्यान, गुरुवारी टीम इंडिया मायदेशी आल्यावर दिल्ली ते मुंबई असा प्रवास करीत हे सगळे खेळाडू मरिन ड्राइव्ह परिसरात दाखल झाले. याचठिकाणी ओपन बसमधून भारतीय संघाच्या विजयी परेडला सुरुवात झाली. सगळ्या खेळाडूंचे चाहत्यांनी दणदणीत स्वागत केले. या सगळ्यांमुळे भारावलेल्या शाहरूखने टीम इंडियाचे कौतुक केले.

जगभरातील त्याचे चाहतेही त्याच्याकडून आणि त्याच्या चित्रपटांकडून अशीच अपेक्षा करतात. दरम्यान, शाहरुख खान मुलगी सुहाना खानसोबत किंगमध्ये दिसणार आहे. हा एक ॲक्शन ड्रामा चित्रपट आहे.

# 'सालार २'चे शूटिंग लवकरच

**हैदराबाद** - सालार पार्ट १च्या प्रचंड यशानंतर दिग्दर्शक प्रशांत नील लवकरच सालार २च्या शूटिंगला सुरुवात करणार आहे. सालारच्या पहिल्या भागाने तिकीट खिडकीवर ७०० कोटींची जबरदस्त कमाई केली होती. ओटीटी प्लॅटफॉर्मवरील सर्वात यशस्वी चित्रपटांपैकी एक म्हणून तो उदयास आला. त्यानंतर या चित्रपटाच्या सिक्वेलची घोषणा करण्यात आली होती.

आता सालार २चे शूटिंग १० ऑगस्टपासून सुरू होणार आहे. २० टक्के शूटिंग आधीच झाले आहे. प्रभास आणि पृथ्वीराज यांच्यात हे शूट झाले. चित्रपटाचे पुढचे बहुतांश शूटिंग रामोजी फिल्म सिटीमध्ये होणार आहे. पहिल्या भागात प्रभासशिवाय पृथ्वीराज सुकुमारन, श्रेया रेड्डी, श्रुती हसन, मीनाक्षी चौधरी आणि इतर अनेक कलाकारांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. दुसऱ्या भागाचे लेखन प्रशांत नील यांनी केले असून, त्याचे दिग्दर्शनही प्रशांतच करणार आहे. होंबळे फिल्म्स अंतर्गत विजय किरगंडूर निर्मित करणार आहेत. या चित्रपटात प्रभासशिवाय पृथ्वीराज सुकुमारन, श्रुती हासन आणि जगपती बाबू दिसणार आहेत. प्रभासचे अजून बरेच चित्रपट यायचे आहेत. प्रभासच्या आगामी चित्रपटांबद्दल बोलायचे झाले तर, या यादीत बाहुबली ३, स्पिरिट, राजा साहेब आणि दिग्दर्शक हनु राघवपुडी यांच्या पीरियड ड्रामा चित्रपटाचा समावेश आहे. दरम्यान, प्रभासचा कल्की २८९८ एडी हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाला चाहत्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.



# तेलाची अख्खी बाटली डोक्यावर!

## तब्बूने सांगितला दिग्दर्शकाचा किस्सा

**चेन्नई** - औरो मे कहाँ दम था या चित्रपटाच्या निमित्ताने तब्बू सध्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. याच निमित्ताने दिलेल्या मुलाखतीत तिने विरासत चित्रपटाच्या शुटिंगदरम्यानचा एक किस्सा सांगितला. तब्बू ग्रामीण भागातील मुलगी दिसावी यासाठी प्रियदर्शन यांनी तेलाची बाटली डोक्यावर ओतली होती, असा धमाल किस्सा तिने सांगितला.

तब्बूने सांगितले की, प्रियदर्शन यांना मी एकदम ग्रामीण भूमिकेत दिसायला हवी होती. माझे केस त्यांना तेलकट हवे होते. त्यामुळे हेअरस्टायलिस्टने मला सांगितले की, थोडे जेल घेऊन डोक्याला लाव त्यामुळे ते तेलकट दिसतील. मी जेव्हा सेटवर पोहोचले तेव्हा ते म्हणाले की, मी तुला केसांना तेल लावायला सांगितले होते. मी म्हणाली, हो थोडेसे. ते आता चमकत आहेत. यानंतर ते गेले आणि नारळ तेलाच्या बाटलीसह आले. ते मागे उभे राहिले आणि सगळी बाटली माझ्या डोक्यावर ओतली!

केसांना तेल म्हणजे मला हे अपेक्षित आहे, असे ते म्हणाले. पण त्यानंतर अनेक गोष्टी सहज झाल्या. मला कोणतीही हेअरस्टाईल करण्याची गरज नव्हती. मी पाच मिनिटांमध्ये तयार व्हायचे. केसांना तेल लावून सेवटर पोहोचायचे, असे ती म्हणाली.

विरासत हा तामिळ चित्रपटाचा रिमेक होता. या चित्रपटात अनिल कपूर, तब्बू आणि पूजा बत्रा यांनी प्रमुख भूमिका निभावल्या होत्या. तब्बूने चित्रपटात ग्रामीण भागातील साध्या मुलीची भूमिका निभावली होती.

# लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या आठवणींना उजाळा

**मुंबई-** अनिल कपूर सध्या बिग बॉस ओटीटी या कार्यक्रमात व्यस्त आहेत. वयाची साठी ओलांडली असली तरी अनिल कपूर फिट अँड फाईन आहेत. बिग बॉस ओटीटीच्या निमित्ताने घेतलेल्या एका मुलाखतीमध्ये अनिल कपूर यांनी मराठीचा सुपरस्टार दिवंगत लक्ष्मीकांत बेर्डे यांची आठवण सांगितली. यावेळी अनिल कपूर यांनी त्यांचा आवडता मराठी सिनेमा कोणता हेही सांगितले. सध्या सलमान खानऐवजी अनिल कपूर बिग बॉस ओटीटी ३च्या सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळत आहेत.

मराठी आणि हिंदी चित्रपटात काम करून लक्ष्मीकांत बेर्डे यांनी प्रेक्षकांचे खूप मनोरंजन केले. प्रेक्षकांनीही त्यांच्यावर भरभरून प्रेम केले. याच लक्ष्मीकांतची आठवण सांगताना अनिल कपूर भावुक झाले होते. लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत मी बेटा सिनेमात काम केले होते. त्यांच्याबरोबर काम करताना एक वेगळी मजा आली. लक्ष्मीकांत बेर्डे खूप मस्त माणूस होते, असे अनिल कपूर म्हणाले. एकदा लक्ष्मीकांत बेर्डे यांनी मला फोन केला. हमाल दे धमाल हा मराठी सिनेमा ते करीत होते. या सिनेमात मी पाहुण्या कलाकाराची भूमिका साकारावी, अशी त्यांची इच्छा होती. मी त्यांना लगेच होकार कळवला. हमाल दे धमाल सुपरहिट झाला. सिल्व्हर ज्युबिली झाला. माझा पहिलाच मराठी चित्रपट आणि तोही सिल्व्हर ज्युबिली झाला. हे भाग्य मला लक्ष्मीकांत बेर्डे आणि या सिनेमामुळे मिळाले, असे ते म्हणाले. हमाल दे धमाल सिनेमा जेव्हा बघितला तेव्हा मला खूप मजा आली. मराठीतला हाच माझा फेव्हरेट सिनेमा आहे. त्यामध्ये मी काम केले, म्हणून तो माझा आवडता सिनेमा आहे असे नाही.

# मिर्झापूर'चा तिसरा सीझन झाला लीक!

**मुंबई** - मिर्झापूरचा दुसरा सीझन संपल्यानंतर आता पुढे काय होणार, याची उत्सुकता अनेकांना लागली होती. तिसऱ्या सीझनला चांगला प्रतिसाद मिळत असतानाच, निर्मात्यांना मोठा धक्का बसला आहे. मिर्झापूर रीलीज झाल्यानंतर काही तासांतच ही वेबसीरिज ऑनलाईन लीक झाली. बहुप्रतिक्षित वेबसीरिज मिर्झापूरचा तिसरा सीझन स्ट्रीम होण्यास नुकतीच सुरुवात झाली आहे.

या वेबसीरिजसाठी अनेकांनी प्राईम व्हिडिओचे सब्स्क्रिप्शन घेतले होते. तर, आता दुसरीकडे ही संपूर्ण वेबसीरिज एचडी क्वालिटीमध्ये लीक झाली आहे. संपूर्ण वेबसीरिज लीक झाल्याने निर्मात्यांसह कलाकार, क्रू यांनाही धक्का बसला आहे. चित्रपट आणि वेबसीरिज लीक झाल्याने सगळ्यात जास्त नुकसान हे निर्मात्यांना सहन करावे लागते. चित्रपट, वेबसीरिजच्या माध्यमातून होणाऱ्या कमाईवरदेखील परिणाम होतो. लोक ओटीटी प्लॅटफॉर्मला पैसे देऊन सब्स्क्रिप्शन घेण्याऐवजी ऑनलाईन मोफत डाउनलोड करून पाहतात. या पायरसीचा मोठा फटका निर्मात्यांना बसतो. मिर्झापूर या सीझनमध्ये दहा एपिसोड्स आहेत आणि प्रत्येक एपिसोड ४५ मिनिटांचा आहे.

मुन्ना भैय्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जागी गुड्डू पंडितकडे मिझार्पूरची सूत्रे आहेत. कालीन भैय्याची पत्नी बीना त्रिपाठी त्याला साथ देत आहे. आता कालिन भैय्या कसा सूड उगवणार, गुड्डू पंडितवर पलटवार करणार का, हे सगळे या सीझनमध्ये आहे. मिर्झापूर ३मध्ये अली फजल, पंकज त्रिपाठी, श्वेता त्रिपाठी, रसिका दुग्गल, हर्षिता गौर, प्रियांशू पैन्युली, अंजुम शर्मा, शीबा चड्ढा, राजेश तेलंग आणि ईशा तलवार आहेत.


## ई-लिलाव सूचना

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि, राळेगाव शहरातील व्यापारी संकुल मधील एकूण २० दुकान गाळ्याचे तीन वर्षाच्या कालावधी करिता भाडे पट्टीवर दुकान गाळ्यांची जाहीर ई-लिलाव घेण्यात येत आहे सदर ई लिलावाची सविस्तर माहिती नगर पंचायत कार्यालय, राळेगांव व महाराष्ट्र शासनाचे www.eauction.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०२/०७/२०२४ ते १९/०७/२०२४ पासून उपलब्ध आहे.

(श्री रविंद्र शेराम) अध्यक्ष, नगर पंचायत राळेगांव

(श्री. जानराव गिरी) उपाध्यक्ष, नगर पंचायत राळेगांव

(श्री. अनूप अग्रवाल ) मुख्याधिकारी, नगर पंचायत राळेगांव


# 'बिग बॉस मराठी'वर चाहते संतप्त

**मुंबई-** एका मोठ्या अंतरानंतर बिग बॉस मराठीचा सीझन यंदा येत आहे. त्यामुळे चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.अशातच कलर्स मराठी वाहिनीकडून या शोबाबत अद्याप बिग बॉसची तारीख जाहीर केलेली नसल्याने, चाहते संतप्त झाले आहेत.

बिग बॉस मराठीचे प्रोमो येत असले, तरी तारीख जाहीर करायला काय हरकत आहे, असा सवाल चाहत्यांनी केला आहे. एका यूझरने म्हटले की, 'एखादा व्यक्ती तुमच्यावर प्रेम करतो तर त्याची इतकी परीक्षा बघू नका. दुसऱ्या यूझरने म्हटले की, मोठी गद्दारी करताय तुम्ही प्रेक्षकांच्या मनाशी. खेळताय तुम्ही. आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, अरे काय चालले आहे? करा आता सुरू! दरम्यान, हिंदीमधल्या अफाट यशानंतर बिग बॉस हा कार्यक्रम मराठीतही सुरू झाला. बिग बॉस मराठीचा आवाज संपूर्ण महाराष्ट्राच्या घराघरांत जाऊन पोहोचला. प्रेक्षक या कार्यक्रमावर बेहद फिदा झाले.

# प्रिया मराठे पुन्हा खलनायिकेच्या भूमिकेत

**मुंबई-** अभिनेत्री प्रिया मराठेने अनेक गाजलेल्या मराठी, हिंदी मालिकांमध्ये काम केले आहे. प्रियाने आतापर्यंत विविध प्रकारच्या भूमिका तसेच खलनायिका साकारल्या आहेत. लवकरच प्रिया मराठे सोनी मराठी वाहिनीवरील तू भेटशी नव्याने या मालिकेत झळकणार आहे. या मालिकेत प्रिया मराठे पुन्हा एकदा खलनायिका साकारणार आहे. रागिणी अग्निहोत्री, असे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव आहे.

प्राध्यापिका असणारी रागिणी अभिमन्यूच्या प्रेमात पडते आणि त्याला मिळवण्यासाठी वाट्टेल ते करायला तयार असणारी रागिणी पुढे काय आणि कशाप्रकारे षडयंत्र रचते ? ते मालिकेत पाहता येणार आहे. रागिणीच्या येण्याने अभिमन्यू आणि गौरीच्या आयुष्यात काय उलथापालथ होणार? गोड बोलून रागिणी आपला डाव कसा साधणार? हे दाखवताना प्रेमाच्या कसोटीवर कोण खरे उतरणार? याची रंजक कथा या मालिकेत आहे.

तू भेटशी नव्याने या मालिकेच्या घोषणेपासूनच ही एआय मालिका नेमकी कशी असेल? याची उत्सुकता प्रेक्षकांना लागून राहिली आहे. मालिका विश्वात एआयवर आधारित असलेली ही जगभरातली पहिलीच मालिका आहे. ही मालिका येत्या ८ जुलैपासून सोनी मराठी वाहिनीवर भेटीला येणार आहे. मालिकेचे दिग्दर्शक आणि निर्माते अजय मयेकर आहेत.

आपल्या भूमिकेबद्दल प्रिया म्हणाली की, जर भूमिकेचे कथेतील महत्त्व जास्त असेल, तर ती भूमिका करणे मला आवडते. त्या भूमिकेचं कथेतील स्थान जास्त महत्त्वाचे असते, जेणेकरून मला तिथे अभिनयासाठी जास्त चांगला वाव मिळेल. भूमिका स्वीकारताना ती भूमिका काय आणि किती महत्त्वाची आहे याकडे लक्ष असते.



# 'नाच गो बया'वर थिरकली पूजा

**मुंबई-** नाच गो बया हे नवे गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. या गाण्याच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला तिच्या कामातून, त्रासातून वेळात वेळ काढत एक दिवस स्वतःसाठी जगायला लावण्यास भाग पाडायला अभिनेत्री पूजा सावंत आहे. पूजाला या गाण्यात अक्षया नाईक, आकांक्षा गाडे, ताश्वी भोईर, निक शिंदे आणि आयुष संजीव यांची साथ आहे.

या गाण्यात सगळेच धुडगूस घालताना दिसतात. लयभारी म्युझिक आणि माऊली फिल्म प्रॉडक्शन प्रस्तुत नाच गो बया या गाण्याची संगीताची आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिद्ध संगीतकार प्रशांत नकती यांची आहे. दिग्दर्शनात प्रशांत यांचे पदार्पण असून, या गाण्याची संकल्पनाही त्यांचीच आहे. हे गीत त्यांनी शब्दबद्ध केले आहे. याआधीही प्रशांत यांच्या प्रत्येक गाण्याने लोकप्रियता मिळवत मिलियन व्ह्यूजचा टप्पा गाठला. आता नाच गो बया या गाण्यातून त्यांनी प्रत्येक महिलेला स्वतःसाठी एक दिवस जगायला भाग पाडले आहे. अनिल पाटील यांनी गाण्याच्या निर्मितीची धुरा सांभाळली आहे. रोहित राऊत आणि मुग्धा कऱ्हाडे यांनी त्यांच्या दमदार आवाजात हे गाणे गायले आहे. नृत्य दिग्दर्शन राहुल गायकवाड यांचे आहे.



पूजाने या गाण्याबाबतचा अनुभव सांगताना म्हटले की, स्त्री या विषयावर आधारित असलेल्या या गाण्यात मला नृत्य करायची संधी मिळाली ही खूप अभिमानास्पद बाब आहे. महिला हा जिव्हाळ्याचा विषय आहे. म्हणूनच सर्व महिलांना त्यांच्या कामातून एक दिवस सुट्टी मिळावी आणि त्यांनी त्यांचा तो दिवस जगावा अशी माझी इच्छा आहे. त्यामुळे प्रत्येक महिला या गाण्यावर थिरकत तिचा तो दिवस साजरा करेल याचीही मला खात्री आहे. महिलांबाबत बोलताना पूजा म्हणाली, आई, मुलगी, बहीण, पत्नी, प्रेयसी आणि मैत्रिण अशा निरनिराळ्या रूपात आपण स्त्रीला ओळखतो खरे, परंतु, स्त्रीचे रूप मर्यादित नाही, तर या स्त्रीत्वाची व्याख्या याहीपेक्षा अधिक मोठी आहे. स्त्रीचा आदर सन्मान करणे हे प्रत्येक पुरुषाचे कर्तव्य आहे. स्त्री ही कायम कर्तव्याचे ओझे घेऊनच जगत आली आहे.


**नगरपंचायत बिडगाव झ तरोडी (खु) पांढुर्णा, ता. कामठी, जि नागपूर**

**विक्रीपत्र / आममुखत्यार पत्र / विशेष मुखत्यार पत्र फेरफार बाबत जाहीरनामा**

याद्वारे सूचित करण्यात येत की, खालील मालमत्ता धारकांनी / अर्जदारांनी या कार्यालयात मालमत्ता रेकोर्डवरून नावात फेरफार करणेकरिता विक्रीपत्रानुसार / दस्ताऐवजानुसार अर्ज सादर केलेला आहे. नगरपंचायत अंतर्गत करण्यात येत असलेल्या खालील फेरफारवर काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाच्या असतील त्यांनी प्रसिद्धी दिनांकापासून ७ दिवसाचे आत आपल्या हरकती मूळ दस्ताऐवाजासह लेखी स्वरुपात नगरपंचायत बिडगाव - तरोडी ( खु ) पांदुर्णा कार्यालयात सादर कराव्यात. मुदतीनंतर येणारे आक्षेप / अजार्चा विचार करण्यात येणार नाही. यांची नोंद घ्यावी.

| अ.क्रं | एरिया | मालमत्ता क्रं | प्लॉट क्रं. | सोसायटीच नाव व ख. क्रं. | रेकॉर्डवरून खारीज करावयाचे नाव | रेकॉर्डला दाखल करावयाचे नाव | सादर केलेले दस्ताऐवज | क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पांदुर्णा | 502 | ८३ | अरुण नामदेव आंबटकर | लक्ष्मी रायमल्लु बधीनी | ननकीदेवी बिनोदकुमार सिंह चंदेल | विक्रीपत्र | ११००. |
| २ | पांढुर्णा | २८४ | ६ | प्रेमराज तुळसिराम बडोले | प्रेमराज तुळसिराम बडोले | हेमराज सखाराम खंडाईत | विक्रीपत्र | १२७५.५ |
| ३ | पांदुर्णा | ६२ | - | - | (1) कल्पना रोशन वाटकर 2) नलू विनोद चापके | साधना विनोद खोडके | विक्रीपत्र | १०९८.२ |
| ४ | पांढुर्णा | २८६ | ई 67 | अशोक आनंदराव धापोडकर | संजय शंकररावजी फरकाडे | महादेव मारोतराव गोतमारे | विक्रीपत्र | १७०० |
| ५ | तरोडी खुर्द | १०५१३ | १०५ | मा चंडिका बिल्डर्स तर्फे दत्ता डो. वाडकर | सुधाकर दूधराम बनवाडे | 1) किरण रामकृष्ण आष्टनकर 2) घनश्याम रा. आष्टनकर | विक्रीपत्र | १२००. |
| ६ | तरोडी खुर्द | १०५१४ | ५४ | रामकृष्ण रूपचंद सारंगपुरे | सुनिता कृष्णाजी घोटेकर | रविंद्र तुकाराम दलाल | आमुखत्यार | १०००. |
| ७ | तरोडी खुर्द | ५६७६ | 437,438 | राजु मनोहर काळमेघ व इतर २ | गोविंदा शंकरराव शिंदे | 1) मनीषा गो. शिंदे 2) लक्ष्मण गो. शिंदे 3) वेदांती गो. शिंदे | वारसान | २४००. |
| ८ | तरोडी खुर्द | ७४५१ | 34,35 | प्रतीक माधवराव नंदापूरकर व इतर (3) | प्रकाश नथुजी करणकोटे | संदीप दुलीचंद बावणे | विक्रीपत्र | १०००. |
| ९ | तरोडी खुर्द | ५३२६ | २९ | अनिल अजाब कांबे व इतर | 1) अनिल अ . कांबे 2) भाऊराव दौ. सोनपिंपळे 3) अनिल हलबाजी (5) | गुलाबराव सुखदेवराव बानाईत | विक्रीपत्र | ३००१. |
| १० | पांढुर्णा | ४५१ | ६८ | अरुण नामदेव आंबटकर | अरुण नामदेव आंबटकर | उत्तमसिंह रतिराम कटरे | विक्रीपत्र | ११००. |

प्रशासक
नगरपंचायत बिडगाव - तरोडी (खु) पांदुर्णा



**नगरपंचायत बिडगाव झ तरोडी (खु) पांढुर्णा, ता. कामठी, जि नागपूर**

**विक्रीपत्र / आममुखत्यार पत्र / विशेष मुखत्यार पत्र फेरफार बाबत जाहीरनामा**

याद्वारे सूचित करण्यात येत की, खालील मालमत्ता धारकांनी / अर्जदारांनी या कार्यालयात मालमत्ता रेकोर्डवरून नावात फेरफार करणेकरिता विक्रीपत्रानुसार / दस्ताऐवजानुसार अर्ज सादर केलेला आहे. नगरपंचायत अंतर्गत करण्यात येत असलेल्या खालील फेरफारवर काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाच्या असतील त्यांनी प्रसिद्धी दिनांकापासून ७ दिवसाचे आत आपल्या हरकती मूळ दस्ताऐवाजासह लेखी स्वरुपात नगरपंचायत बिडगाव - तरोडी ( खु ) पांदुर्णा कार्यालयात सादर कराव्यात. मुदतीनंतर येणारे आक्षेप / अजार्चा विचार करण्यात येणार नाही. यांची नोंद घ्यावी.

| अ.क्रं | एरिया | मालमत्ता क्रं | प्लॉट क्रं. | सोसायटीच नाव व ख. क्रं. | रेकॉर्डवरून खारीज करावयाचे नाव | रेकॉर्डला दाखल करावयाचे नाव | सादर केलेले दस्ताऐवज | क्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बिडगाव | 10101/2 | ३ | पवनसिंह सरजूसिंह राजपूत ( 102/3 ) | अशोक सदाशिवराव जीवतोडे | वंदना अशोकराव जीवतोडे | बक्षिसपत्र | ४०५०. |
| २ | बिडगाव | १३०८१ | २ | न्यु गृहलक्ष्मी हाऊसिंग एजन्सी तर्फे पार्टनर | रविंद्र शंकरसिंह तोमर | संतोष यशवंत जगाते | विक्रीपत्र | १४२०. |
| ३ | बिडगाव | ३८ | - | - | महादेव हरिचंद गाढवे | 1) जयश्री महादेव गाढवे 2 ) गणेश म. गाढवे 3) देविका म. गाढवे | वारसान पत्र | ५७४.९ |
| ४ | बिडगाव | ९३३८ | ३९ | दौलत बाजीराव इरखेड | वंदना सुरेशराव जिचकार | रूपराव सदाशिव येलेकर | विक्रीपत्र | ६००. |
| ५ | बिडगाव | १०८७९ | ५५ | विकास हाऊसिंग एजन्सी लँड डेव्हलपर्स तर्फे पार्टनर | सुरेश हरिभाउ पंचबुधे | उमदेवी खुशालराव चुटे | विक्रीपत्र | १०००. |
| ६ | बिडगाव | ११११९० | २१ | पवनसिंह सरजूसिंह राजपूत ( 52 / 1,2,4 ) | वंदना अशोकराव जीवतोडे | कविता संजय कोल्हे | विक्रीपत्र | ११७५.१ |
| ७ | बिडगाव | १५२१ | १४७ | गोपाळ व महादेव काळे व इतर ( 3 ) | रामेश्वर धोंडुजी गेडाम | बेबी विकास लांबट | विक्रीपत्र | ६००. |
| `८ | बिडगाव | ९४८९ | ४६ | गोपाळ व महादेव काळे व इतर ( 3 ) | योगेश प्रकाश मंगर | पिंटू नीलकंठ वांढरे | आमुख्त्यार | ६००. |
| ९ | बिडगाव | ७४९३ | १२४ | शिवपाल पर्वत कातुरे | 1) गीता नितिन पिरोले 2) वसंताजी तुकाराम नगरधने | वसंताजी तुकाराम नगरधने | विक्रीपत्र | १०००. |
| १० | पांढुर्णा | ५५० | ३६ | आनंदराव सीताराम खापरे व इतर ( 3 ) | बबन मारोतराव खोडे | गौरव जीवनलाल कावळे | विक्रीपत्र | १०५०. |
| ११ | पांदुर्णा | १९० | ७ | दिनेश कवडु ठाकरे | दिनेश कवडु ठाकरे | गणेश कवडूजी भलावी | विक्रीपत्र | १३५०. |

प्रशासक
नगरपंचायत बिडगाव - तरोडी (खु) पांदुर्णा

# वर्ल्डकप विजेत्या शिलेदारांचा विधिमंडळात गौरव

## महाराष्ट्र सरकारकडून प्रत्येकी एक कोटींचे बक्षीस

**वृत्तसंस्था/मुंबई**

टी-२० विश्वचषक जिंकलेल्या टीम इंडियाचे गुरुवारी मुंबईत लाखो चाहत्यांच्या उपस्थितीत जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी मरीन ड्राईव ते वानखेडे स्टेडियम रस्त्यावर विश्वविजेत्या संघाचे ओपन बसमधून विजय परेड काढण्यात आली. टीम इंडियाच्या विश्वविजेत्या संघात चार खेळाडू मुंबईचे आहेत. यामध्ये कर्णधार रोहित शर्मा, सुर्यकुमार यादव, यशस्वी जैस्वाल आणि शिवम दुबे यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या खेळाडूंना प्रत्येकी एक कोटी रूपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. शुक्रवारी महाराष्ट्र विधिमंडळात विश्वविजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.



विधिमंडळात झालेल्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आनि अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती निलम गोऱ्हे यांच्यासह मंत्री, सर्वपक्षीय आमदार उपस्थित होते. या कार्यक्रमात भाषण करण्यासाठी रोहित शर्मा ज्यावेळी आला तेव्हा सर्व आमदारांनी त्याचा जयघोष केला. मुंबईचा राजा रोहित शर्मा अशा घोषणांनी सभागृह निनादून गेले. रोहितने त्याचे भाषण मराठीत केले. आपल्या भाषणाची सुरूवात त्याने सर्वांना मोठा नमस्कार असे म्हणून केली. सीएम सर धन्यवाद तुम्ही आम्हाला इथे आमंत्रित केले. बर वाटले सर्वांना पाहून. सीएम साहेबांनी आताच मला सांगितले की अशा प्रकारचा कार्यक्रम कधी झाला नाही इकडे. अशा कार्यक्रम आमच्यासाठी होतो आहे याचा आनंद आहे. तुम्हा सर्वांना पाहून आम्हाला आनंद झाला आहे. गुरुवारी मुंबईत आम्ही जे पाहिले ते सर्वांसाठी स्वप्न होते. आमचे स्वप्न होते की वर्ल्डकप भारतात आणायचा होता. ११ वर्ष आम्ही थांबलो होतो वर्ल्डकपसाठी. २०१३ साली शेवटची आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. मी संघातील सहकाऱ्यांचा आभारी आहे. हे माझ्यामुळे किंवा सूर्या किंवा शिवम किंवा यशस्वीमुळे झाले नाही. सर्व खेळाडूंच्या अथक परिश्रमामुळे हे शक्य झाले आहे. मी लकी देखील आहे की मला जी टीम भेटली ती जबरदस्त होती. प्रत्येक सामन्यात सर्वांनी योगदान दिले त्यामुळे आपण जिंकलो, असे रोहित म्हणाला. रोहित शर्माने आपल्या भाषणावेळी सूर्यकुमारच्या ऐतिहासिक कॅचचा उल्लेख केला. रोहित शर्मा म्हणाला, सूर्या म्हणाला की तो बॉल माज्या हातात येऊन बसला. मी म्हणतो बरं झालं सूर्याच्या हातात बॉल बसला. जर बसला नसता तर मी त्यालाच बसवला असता, अशी मिश्कील टीप्पणी त्याने केली. रोहितपूर्वी सूर्याने देखील मराठीतून भाषण केले होते. त्यावेळी मिलरच्या कॅचचा उल्लेख झाला.

# पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नीरज चोप्राकडे मोठी जबाबदारी

## भारताच्या २८ सदस्यीय ॲथलेटिक्स संघाचे करणार नेतृत्व

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

ऑलिम्पिक आणि जागतिक चॅम्पियन भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्रा २६ जुलैपासून सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या २८ सदस्यीय ॲथलेटिक्स संघाचे नेतृत्व करेल. टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या आणि सध्याचा विश्वविजेता असलेल्या नीरजने पॅरिस ऑलिम्पिकच्या तयारीसाठी डायमंड लीगच्या अंतिम टप्प्यात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे.

भारतीय ॲथलेटिक्स संघात १७ पुरुष आणि ११ महिला खेळाडूंचा समावेश आहे. चोप्रा व्यतिरिक्त, यामध्ये आशियाई क्रीडा चॅम्पियन अविनाश साबळे, तेजिंदरपाल सिंग तूर आणि धावपटू ज्योती याराजी यांसारख्या इतर प्रमुख खेळाडूंचाही समावेश आहे. पुरुषांच्या ४ हजार ४०० मीटर रिले संघात मुहम्मद अनस, मुहम्मद अजमल, अमोज जेकब आणि राजेश रमेश यांचा समावेश आहे. या संघाने नुकतेच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत अमेरिकन संघाला मागे टाकून खळबळ उडवून दिली होती. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ट्रॅक आणि फील्ड स्पर्धा १ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट दरम्यान होणार आहेत. टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राने गेल्या महिन्यात पावो नूरमी गेम्समध्ये उत्कृष्ट कामगिरी केली होती. नीरजने ऑलिम्पिकपूर्वी झालेल्या या स्पर्धेमध्ये ८५.९७ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाला गवसणी घातली होती. या स्पर्धेत आधी नीरज पिछाडीवर होता, पण तिसऱ्या प्रयत्नात त्याने शानदार पुनरागमन केले आणि आपली आघाडी शेवटपर्यंत राखण्यात यश मिळवले.

**भारतीय ॲथलेटिक्स संघ खालीलप्रमाणे**

**पुरुष :** अविनाश साबळे (३ हजार मीटर स्टीपलचेस), नीरज चोप्रा, किशोर कुमार जेना (भालाफेक), तजिंदरपाल सिंग तूर (शॉट पुट), प्रवीण चित्रवेल, अब्दुल्ला अबुबकर (तिहेरी उडी), अक्षदीप सिंग, विकास सिंग, परमजीत सिंग बिश्त (२० किमी चालणे), मुहम्मद अनस, मुहम्मद अजमल, अमोज जेकब, संतोष तमिलरासन, राजेश रमेश (४,४०० मीटर रिले), मिजो चाको कुरियन (४,४०० मीटर रिले), सूरज पनवार (मिश्र मॅरेथॉन चालणे), सर्वेश अनिल कुशारे (उंच उडी).

**महिला :** किरण पहल (४०० मी. धावणे), पारुल चौधरी (३,००० मीटर स्टीपलचेस आणि ५,००० मीटर), ज्योती याराजी (१०० मीटर अडथळा शर्यत), अन्नू राणी (भालाफेक), आभा खटुआ (शॉट पुट), ज्योतिका श्री दांडी, सुभा व्यंकटेशन, विठिया रामराज, पूवम्मा एमआर , प्राची, प्रियंका गोस्वामी (२० किमी चालणे).

# त्रिशा-गायत्रीची उपांत्यपूर्व फेरीत धडक



**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीने गुरुवारी कॅनडा ओपन २०२४ बॅडमिंटन महिला दुहेरी स्पर्धेत दुसऱ्या फेरीत नतास्जा एंथोनीसेन आणि एलिसा तिटोर्सेंटोनो या डॅनिश-डच जोडीचा पराभव केला. मार्किन-मॅकफेल सेंटरमध्ये स्पर्धा करताना, २०२२ च्या राष्ट्रकुल स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या भारतीय जोडीने पहिला गेम गमावला परंतु यानंतर शानदार पुनरागमन करत ४८ मिनिटांमध्येच १७-२१, २१-७, २१-८ ने सामना जिंकला. सातव्या मानांकित त्रिशा आणि गायत्रीचा शुक्रवारी उपांत्यपूर्व फेरीत सीह पेई-शान आणि हंग एन-त्जु यांच्याशी सामना होईल. २०२४ मधील भारतीय जोडीची ही पहिली सुपर ५०० उपांत्यपूर्व फेरी असेल. गेल्या महिन्यात, त्रिशा-गायत्री यांनी सिंगापूर ओपन २०२४ या बीडब्ल्यूएफ या सूपर ७५० स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. दरम्यान, दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू आणि जागतिक चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेते एचएस प्रणॉय आणि लक्ष्य सेन यांनी पॅरिस २०२४ ऑलिम्पिकच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर कॅनडा ओपन २०२४ मध्ये सहभाग घेतलेला नाही.

# मुंबईकर कधीच निराश करत नाहीत

## भव्य-दिव्य स्वागत सोहळ्याने रोहित शर्मा झाला भावुक

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर काल अभूतपूर्व गर्दी दिसून आली. क्रिकेट चाहत्यांच्या उत्साहाने स्टेडियम पूर्ण भरून गेले होते. २०२४च्या टी २० विश्वचषकात टीम इंडियाने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी चाहते येथे जमले होते. बीसीसीआयने भारतीय संघाला १२५ कोटी रुपयांच्या बक्षिसाचा धनादेश सुपूर्द केला. या सत्कार समारंभात विराट कोहली, रोहित शर्मा, राहुल द्रविड आणि जसप्रीत बुमराह यांनी आपल्या भावना क्रिकेट चाहत्यांसोबत शेअर केल्या. यावेळी रोहितने मुंबईचे आणि मुंबईकरांचे मनापासून आभार मानले आणि कौतुक केले.

मुंबई कधीही निराश करत नाही. आमचे जोरदार स्वागत झाले.



संघाच्या वतीने आम्ही चाहत्यांचे आभार मानतो. विजयानंतर आता मला खूप आनंद वाटतो आहे. सर्वात खास क्षण तो होता जेव्हा भारतीय कर्णधार म्हणून मी टी २० विश्वचषक उंचावला. फायनलमध्ये शेवटचे षटक टाकल्याबद्दल आणि भारताच्या विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल हार्दिक पांड्याचेही विशेष कौतुक.

शेवटचे षटक टाकल्याबद्दल त्याला सलाम. तुम्हाला कितीही धावांची गरज असली तरी ते षटक टाकण्यासाठी नेहमीच खूप दडपण असते. त्याने ते करून दाखवले त्यासाठी त्याचे कौतकच आहे, असे रोहित शर्मा म्हणाला. दरम्यान, या सोहळ्यानंतर खेळाडूंनी चाहत्यांशी संवाद साधला, त्यांना सह्या दिल्या आणि त्यांच्यासोबत सेल्फी काढले. स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या लोकांना खूप आनंद झाला. मरीन ड्राईव्ह येथून टी २० विश्वचषक विजेत्या संघाच्या विजय परेडने जल्लोषाची सुरुवात झाली, ती वानखेडे स्टेडियमवर संपली. या वेळेत लाखो क्रिकेट चाहते मरिन ड्राइव्ह आणि वानखेडे स्टेडियमवर जमले आणि जल्लोष केला.

# ठाण्यातील दोन खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी

**वृत्तसंस्था/ठाणे**

आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्ट, पंच, प्रशिक्षिका पूजा सुर्वे आणि मानसी सुर्वे यांच्या ठाण्यातील फिनिक्स जिम्नॅस्टिक्स अकादमातील दोन जिम्नॅस्ट खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नॅशनल गेम्स मध्ये पदक पटकावल्याबद्दल राज्य शासनाने त्याची दखल घेत संयुक्ता प्रसेन काळे हिला ४० लाखांचे तर किमया कार्ले हिला १० लाखांचे पारितोषिक देऊन गौरविले आहे. जिम्नॅस्ट किमाया कार्ले हिने इजिप्शियन फारो चषक २०२४ मध्ये एक अनोखा विक्रम रचला आहे. १७ वर्षीय किमया एफआयजी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन स्पर्धांमध्ये अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेली पहिली भारतीय जिम्नॅस्ट ठरली. किमयाने हूप आणि बॉल या दोन्ही अंतिम फेरीत अनुक्रमे २५.५० आणि २५.०० गुणांसह ७ वे स्थान पटकावले.

# भारतीय क्रिकेट संघाचा मोठा चाहता आहे 'वॉल्व्हरिन'

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

सध्या 'डेडपूल व्हर्सेस वॉल्व्हरिन' सिनेमाची उत्सुकता शिगेला आहे. मार्व्हल्स आणि 'डेडपूल - वॉल्व्हरिन' फ्रँचायझीचे चाहते या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. थोड्यात दिवसांमध्ये हा सिनेमा रिलीज होणार आहे. या सिनेमाची टीम काही दिवसांपूर्वी प्रमोशनसाठी भारतात आली होती. त्यावेळी एका मुलाखतीत प्रश्न विचारले असता वॉल्व्हरिनची भूमिका साकारणारा अभिनेता जॅकमॅनने त्याचा आवडता खेळाडू म्हणून रोहित शर्माचा उल्लेख केला होता.




अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान हॉलिवूड स्टार ह्यू जॅकमनने भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्माचे कौतुक केले. प्रसिद्ध अभिनेत्याने आपली क्रिकेटची आवड व्यक्त केली आणि रोहित शर्माच्या प्रतिभेचे कौतुक केले. जेव्हा डेडपूल अँड वॉल्व्हरिन अभिनेत्याला टीम इंडियामध्ये तुमचा आवडता क्रिकेटर कोण आहे, असे विचारण्यात आले तेव्हा एक क्षणही न घालवता अभिनेता म्हणाला, सध्या मला रोहित आवडतो. असं म्हणताच 'डेडपूल' फेम रायन रेनॉल्ड्सलाही आश्चर्यचकित झाला. जो मुलाखतीदरम्यान उपस्थित होता. तेव्हा ह्यू म्हणाला, तुम्ही वर्ल्डकप जिंकला याचा मला आनंद आहे.

# हिजबुल्लाहने इस्त्रायलवर सोडले २०० रॉकेट

## कमांडरच्या हत्येच्या बदल्यासाठी दिले प्रत्युत्तर

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

इस्त्रायलने केलेल्या हल्यामध्येहिजबुल्लाहचा वरिष्ठ कमांडरचा मृत्यू झाला. या घटनेचा बदला म्हणून लेबनीज अतिरेकी संघटना हिजबोलाने इस्त्रायली लष्करी तळावर २०० हून अधिक रॉकेट सोडले आहेत. इराण-समर्थित दहशतवादी गटाने गुरुवारी केलेला हल्ला लेबनॉन-इस्त्रायल सीमेवर अनेक महिन्यांच्या संघर्षातील सर्वात मोठा हल्ला आहे. अलिकडच्या आठवड्यात या भागात तणाव शिगेला पोहोचला होता.

इस्त्रायल माध्यमांच्या वृत्तानुसार, इस्त्रायलच्या उत्तर गॅलीली आणि व्यापलेल्या गोलान हाइट्समध्ये हिजबोलाच्या रॉकेट आणि ड्रोनने बॉम्बफेक केल्यानंतर आणि आकाश धुराने भरल्यानंतर १० ठिकाणी मोठ्या आगीचे लोट जळत आहेत.दरम्यान, लेबनॉनच्या हिजबुल्लाहने बुधवारी एका वरिष्ठ हिजबुल्ला कमांडरच्या हत्येला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायली लष्कराला लक्ष्य करून २०० हून अधिक रॉकेट सोडले आहेत. यावर इस्त्रायली लष्कराने सांगितले की, लेबनॉनमधून अनेक रॉकेट आणि ड्रोन सोडण्यात आले होते, परंतु त्यातील अनेक रॉकेट मध्यभागी नष्ट करण्यात आले. इस्त्रायलच्या सुरक्षा दलांनी या हल्ल्यात किती जीवितहानी झाली याबाबत कोणतीही माहिती दिली नाही. इस्त्रायली सरकारच्या न्यायिक सल्लागाराने नेतन्याहू यांना गाझा कैद्यांना ठेवलेल्या नेगेवमधील डिटेंशन सेंटर बंद करण्याची विनंती केली आहे, असे इस्त्रायली दैनिक मारिवने वृत्त दिले आहे. हिजबुल्लाहच्या हल्ल्यानंतर इस्त्रायलनेही प्रत्युत्तर देत दक्षिण लेबनॉनमधील अनेक शहरांवर हल्ले केले.

# गाझात ठार झालेल्या पॅलेस्टिनींची संख्या ३८ हजारांवर

**वृत्तसंस्था/देर अल-बलाह**

गेल्या ९ महिन्यांपासून सुरू असलेल्या इस्त्रायल-हमास दरम्यानच्या संघर्षात ठार झालेल्या पॅलेस्टिनी नागरिकांची संख्या आता ३८ हजारांवर पोहोचली आहे. हमासचे नियंत्रण असलेल्या गाझा पट्टयातल्या आरोग्य मंत्रालयाने ही माहिती दिली. गेल्या २४ तासात इस्त्रायलच्या माऱ्यात ठार झालेल्या ५८ पॅलेस्टिनींचे मृतदेह रुग्णालयात आणण्यात आले. त्यामुळे मृतांची एकूण संख्या ३८ हजार ११ इतकी झाली आहे, असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.

# सुनक यांच्या पक्षाचे १४ वर्षांचे सरकार गेले

## राजीनाम्याची घोषणा; ब्रिटनमध्ये लेबर पार्टी ४०० पार

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

ब्रिटनमध्ये झालेल्या निवडणुकीचा निकाल जवळपास हाती आला आहे. १४ वर्षांपासून सत्तेत असलेल्या कंझर्व्हेटिव्ह पक्षाला ब्रिटिशांनी सत्तेबाहेर फेकले आहे. तर लेबर पार्टीला ४०० पार नेऊन ठेवले आहे. भारताशी संबंध असलेल्या ऋषी सुनक यांचा दारुण पराभव झाला आहे. ब्रिटनमध्ये एक्झिट पोल खरे ठरले असून सुनक यांचा पक्ष आतापर्यंत १११ जागाच जिंकू शकला आहे.

आतापर्यंत आलेल्या निकालानुसार लेबर पार्टी ४०५ जागा जिंकली आहे. ६५० पैकी ६२४



जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. लेबर पार्टीला सत्तेत येण्यासाठी १४ वर्षांचा वनवास सहन करावा लागला आहे. याचबरोबर लिबरल डेमोक्रेट्सने ६० जागा, स्कॉटीश नॅशनल पार्टीने सात आणि रिफॉर्म यूकेने चार जागा जिंकल्या आहेत. तर ग्रीन पार्टीने एकच जागा जिंकली आहे. धक्कादायक निकालामध्ये ब्रिटनच्या माजी पंतप्रधान लिझ ट्रस यांचा समावेश आहे. त्यांना पश्चिम नॉरफॉकमध्ये पराभूत व्हावे लागले होते. सुनक यांच्यापूर्वी त्या पंतप्रधान होत्या. ऋषी सुनक मात्र उत्तर इंग्लंडमधून विजयी झाले आहेत. सुनक यांनी पत्रकार परिषद घेऊन आपला पराभव स्वीकार केला आहे. तसेच पराभवाची जबाबदारी घेतली आहे. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये ६५० खासदार असतात. बहुमताचे सरकार स्थापन करण्यासाठी पक्षाला ३२६ जागांची आवश्यकता असते. पराभवाचे संकेत मिळाल्यानंतर पंतप्रधान ऋषी सुनक यांनी राजीनामा देण्याची घोषणा केली आहे. ब्रिटनच्या निकालांवरून स्कॉटलंडमध्येही लेबर पार्टीच्या नेत्यांनी सरकार उलथविले जाणार असल्याचा दावा केला आहे. २०२६ मध्ये तिथेही निवडणुका होणार आहेत. यावेळी लेबर पार्टी ३० हून अधिक जागा जिंकेल असा दावा स्कॉटीश नेते अनस अन्वर यांनी केला आहे.

# भारत-अमेरिकेमध्ये विमान प्रवाशांच्या बायोमेट्रिक्स डेटाची आता देवाण-घेवाण

## फ्लाइटच्या सुरक्षेसाठी उभय देशांतील सहमती

**वृत्तसंस्था/वॉशिंग्टन**

भारत-अमेरिकेमध्ये विमान प्रवाशांच्या बायोमेट्रिक्स डेटाची आता देवाण-घेवाण होणार आहे. फ्लाइटच्या सुरक्षेसाठी उभय देशांत आता सहमती झाली आहे.

भारत आणि अमेरिकेदरम्यान वन स्टॉप स्क्रिनिंग करार होणार आहे. त्यामुळे भारतीय प्रवाशांच्या सामानाची वारंवार तपासणी केली जाणार नाही. उदाहरणार्थ, न्यूयॉर्कला जाणाऱ्या



विमान फेरीसाठी नवी दिल्ली विमानतळावरच प्रवाशाचे सामान तपासले जाईल. पुढे हा प्रवाशी न्यूयॉर्कहून अमेरिकेतील इतर शहरात कनेक्टिंग फ्लाइटने जात असला तरीही त्याची तपासणी होणार नाही. २०३० पर्यंत भारत व अमेरिकेत दरवर्षी २६ लाख प्रवाशी प्रवास करतील. प्रवाशांचा बायोमेट्रिक डेटा आता दोन्ही देशांच्या सरकारकडे असेल. भारतातर्फे आयबीकडे तर अमेरिकेत कस्टम बॉर्डर कन्ट्रोलकडे हा डेटा राहील. दोन्ही सरकारी संस्थाच परस्परांना माहितीची देवाण-घेवाण करतील. डेटा तिसऱ्या संस्थेकडे नसेल. वैयक्तिक गोपनीयतेचेदेखील उल्लंघन त्यामुळे होणार नाही. अलीकडेच भारत-अमेरिका एव्हिएशन समिटदरम्यान यूएस ट्रान्सपोर्टेशनचे प्रमुख डेव्हिड पिकोस्के म्हणाले, दोन्ही देश सायबर सुरक्षेचा डेटाही परस्परांना देतील. भारत व अमेरिका विमानसेवा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रवाशांचा बायोमेट्रिक्स डेटा परस्परांना दिला जाणार आहे. दोन्ही देशांत यावर सहमती झाली आहे. त्यामागे विमान प्रवाशांची वाढती संख्या तसेच सुरक्षेचाही मुद्दा समोर आला. बायोमेट्रिक्स डेटामुळे प्रत्येक विमान प्रवाशाची माहिती दोन्ही देशांकडे राहील. बायोमेट्रिक्स डेटामध्ये बोटांचे ठसे, डोळे आणि चेहऱ्याचा तपशील हे समाविष्ट असेल. ही माहिती एक वर्षापर्यंत सुरक्षित असेल. भारताने १९८५चा कनिष्क फ्लाइटचा अपघात अनुभवला आहे.

# बोईंग स्टारलायनरचा अंतराळातील मुक्काम वाढणार

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्ससह त्यांच्या सहकाऱ्यांना अंतराळात घेऊन जाणारे बोईंग स्टारलायनर अंतराळयान अनेक महिने अंतराळात राहू शकते. त्यामुळे अमेरिकन अंतराळ संस्था नासा या मिशनचा विस्तार करण्याचा विचार करत असल्याचे वृत्त वृत्तसंस्थेने दिले आहे.

नासाचे कमर्शियल क्रू प्रोग्राम मॅनेजर स्टीव्ह स्टिच यांनी सांगितले की, यूएस स्पेस एजन्सी स्टारलाइनरच्या मोहिमेचा कालावधी ४५ दिवसांवरून ९० दिवसांपर्यंत वाढवण्याचा विचार करत आहे. नासाने बोईंगच्या स्टारलायनर स्पेसक्राफ्टच्या पहिल्या क्रू चाचणीसाठी केवळ १ आठवड्याची योजना आखली होती. परंतु, मिशनमध्ये अडथळे निर्माण झाल्याने बोईंग स्टारलायनर अंतराळयानाला परतीच्या प्रवास लाबण्याची अधिक शक्यता आहे. त्यामुळे भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स आणि अन्य अंतराळवीरांना घेऊन गेलेले स्टारलायनर मिशनचा कालावधी ४५ दिवसांवरून ९० दिवसांपर्यंत वाढवण्याचा विचार नासा करत आहे, असे देखील वृत्तात म्हटले आहे. बोईंगच्या स्टारलायनर प्रोग्राम मॅनेजर मार्क नप्पी यांच्या माहितीनुसार स्पेसक्राफ्टमधील हेलियम प्रणाली ज्या पद्धतीने तयार करण्यात आली होती ती अपेक्षितरित्या काम करत नाही. परिणामी सध्याच्या घडीला विल्यम्स आणि त्यांच्यासमवेत असणाऱ्या अंतराळयात्रींना सुखरूप पृथ्वीवर परत आणण्यासाठीच नासाचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, उपलब्ध माहितीनुसार स्टारलायनरची इंधनक्षमता ४५ दिवसांची आहे. ही क्षमता वाढवण्याचे प्रयत्न सध्या नासाकडून सुरू आहेत.

# लिट्टे प्रमुख प्रभाकरनच्या नावावर करोडोंची वसुली करतोय माफिया

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**


राजीव गांधी यांच्या हत्येचा सूत्रधार वेलुपिल्लई प्रभाकरनच्या कुटुंबाने आरोप केला आहे की, एलटीटीईचा नेता जिवंत असल्याचा दावा करून काही लोक तामिळींकडून कोट्यवधी रुपयांची वसूली करत आहेत. प्रभाकरनचा मोठा भाऊ मनोहरन याचा मुलगा कार्तिक मनोहरन याने सांगितले की, एक माफिया टोळी प्रभाकरनचे नाव ब्रँड म्हणून वापरत आहे.

याद्वारे ही टोळी परदेशात राहणाऱ्या तामिळींकडून निधी गोळा करत आहे. कार्तिकने सांगितले की, प्रभाकरनच्या नावावर जे पैसे घेतले जात आहेत, ते ना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचत आहेत, ना गरीब तामिळींपर्यंत. परदेशातील भारतीयांनी या फसवणुकीपासून दूर राहावे. १९८३ मध्ये श्रीलंका सोडल्यापासून मनोहरन यांचे कुटुंब प्रसिद्धीच्या झोतात राहिले नाही. गेल्या वर्षी २३ नोव्हेंबर रोजी स्वित्झर्लंडमधील अनिवासी भारतीयांनी प्रभाकरनची मुलगी द्वारका प्रभाकरनचे व्हिडिओ भाषण जारी केले होते.

# माघार घेणार नाही, डेमोक्रॅटिक पक्षाचा मीच अधिकृत उमेदवार - ज्यो बायडेन

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी डेमोक्रॅटिक पक्षाचा अधिकृत उमेदवार आपणच असल्याचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी ठामपणे सांगितले आहे. या निवडणुकीतून माघार घेण्यासाठी आपल्यावर कोणताही दबाव नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. एकच दिवस आगोदर माघार घेण्यासाठी बायडेन यांच्यावर डेमोक्रॅटिक पक्षातून दबाव येत असल्याचे वृत्त माध्यमांनी प्रसिद्ध केले होते. मात्र बायडेन यांनी दिलेले स्पष्टीकरण हे या वृत्ताला विसंगत आहे.



गेल्या गुरुवारी अटलांटा येथे झालेल्या पहिल्या खुल्या वादविवादामध्ये बायडेन यांची कामगिरी खूपच सुमार झाली होती. त्यानंतर बायडेन यांची प्रसिद्धी खालावली आणि त्यांच्या स्वतःच्या पक्षाच्या सदस्यांकडून त्यांनी माघार घेण्याची मागणी केली जाऊ लागली. मीच डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार आहे. माज्यावर कोणाचाही दबाव नाही. मी माघार घेणार नाही. मी अखेरपर्यंत या शर्यतीत असणार आहे. आपण ही निवडणूक जिंकणार आहोत. फक्त एवढेच लक्षात घेतले पाहिजे. निवडणूक निधीमध्ये योगदान द्या आणि आपण नोव्हेंबरमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांना पराभूत करू, अशा शब्दात निवडणूक प्रचारासाठी डेमोक्रॅटिक पक्षाच्या सदस्यांना उद्देशून लिहीलेल्या ई-मेलमध्ये बायडेन यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

# राहुल गांधींचा कष्टकरी मजुरांशी संवाद

## फावडे आणि थापी घेत कामही केले

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी दिल्लीतील गुरु तेग बहादूर नगरात रोजंदारीवर काम करणा-्या कामगारांची भेट घेतली आहे. देशाचा कणा असलेल्या मजूर कामगारांना त्यांच्या मेहनतीचा योग्य तो मोबदला मिळवून देणे आणि त्यांच्या जीवनाचा उचित सन्मान करणे हे काँग्रेसचे धेय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी सर्व कामगारांशी चर्चा केली, त्यांचे प्रश्न त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि रोजंदारी कामगारांच्या संघटनांविषयी त्यांनी बातचित केली. याबद्दलची एक पोस्ट काँग्रेसच्या एक्स अकाऊंटवर शेअर करण्यात आली आहे.

असंघटित कामगार देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. रोजंदारीवर काम करणा-या या कामगारांसाठी काँग्रेसने जाहीरनाम्यामध्ये अनेक वेळा अनेक योजना जाहीर केल्या आहेत. मनरेगासारखी योजना या निवडणुकीच्या प्रचारात शहरातही राबवण्याचा मनोदय राहुल गांधी यांनी व्यक्त करून दाखवला होता. दरम्यान, गुरु तेग बहादूर नगरमधील या कामगारांसह भेटीचे फोटो राहुल गांधींनी सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये राहुल गांधी स्वतः बांधकाम करणा-या या कामगारांसह काम करताना दिसले. त्यांनी कामगारांचे फावडे आणि थापी हे साहित्य घेऊन प्रत्यक्ष काम केले असल्याचे या फोटोमध्ये दिसत आहे. राहुल गांधी यांनी याआधीही अशाप्रकारे कामगारांच्या भेटी घेतल्या आहेत. या भेटीनंतर राहुल गांधी म्हणाले,आपल्या देशात मजूर कामगारांना कोणताही सन्मान दिला जात नाही. त्यांच्या मेहनतीचा आदर केला जात नाही, हे मी याधीही सांगितले आहे. रोज या मजुरांना कामाच्या शोधात फिरावे लागते. या महागाईच्या काळात रोजंदारी करून मिळणा-या तुटपुंज्या कमाईत जीवन जगताना या मजूर कामगारांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागतो.